म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. ला.
दा. क. १५४९९
IRBK-0115499

राजपूत कथातरंगिणी .......... द्वितीय लहरी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
वा. क्र. ............ नों. दि ............
१५४९८

प्रकाशक
भा. ल. कुलकर्णी
साहित्य प्रसार केन्द्र
सीताबर्डी, नागपूर

प्रथमावृत्ती
वर्षप्रतिपदा, शके १८९६
२४ मार्च १९७४

सर्व हक्क
सौ. विजया सहस्रबुद्धे

मूल्य : रुपये पाच

मुद्रक
द्वि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय
रुईकर पथ, नागपूर २

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ५९८९० नों. दि. २७/९/०८
वि. ग्रा. क्र.

माझे काका

ती. स्व. गणेश रघुनाथ सहस्त्रबुद्धे

उपाख्य नाना

व ती. सौ. चन्द्रकला उपाख्य मनूकाकू

यांस

सादर सर्मपित

IRBK-0115499

# १ दिनेश्वर चंद्रावतीला पोहोचला

चंद्रावतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक काळा घोडा वाऱ्याच्या वेगाने धावत होता. घोड्याचे पाय केव्हा जमिनीला लागतात आणि केव्हा वर उचलले जातात हे कळत नव्हते. घोड्याचे कान उभे होते. त्याच्या मानेवरची आयाळ कधी इकडे तर कधी तिकडे उडत पडत होती. वेगामुळे त्याचे डौलदार शेपूट त्याच्या शरीरासारखेच आडवे झाले होते. ते जणू खाली पडतच नव्हते. घोड्याचा वेग अधिकाधिक वाढत होता.

पण घोड्यावर बसलेल्या दिनेश्वराला त्याहूनही जास्त वेगाने घोड्याने पळावे असे वाटत होते. तो घोड्याला मारीत नव्हता. किंबहुना त्याच्याजवळ चाबूक नव्हताच. चाबूक असता तरी दिनेश्वराने घोड्याला कधी मारले नसते. पण घोडा दिनेश्वराची भाषा समजत होता. इतकेच नव्हे तर दिनेश्वराच्या मनात चाललेले विचारही त्याला कळत होते की काय कोण जाणे ! तो स्वतःच आपला वेग वाढवीत होता.

मैदान ओलांडल्यावर चंद्रावती नगरीतील उंच उंच वाडे दिसू लागले. दिनेश्वराने समाधानाचा श्वास सोडला. घोड्याच्या मानेवर थोपटून तो त्याला म्हणाला, "मित्रा गरुडा, आज तू

आपले नाव सार्थ केलेस. कोणत्याही प्रकारे कष्ट होऊ न देता अगदी आकाशातून उडवत तू मला आणलेस. स्वाराला त्रास होऊ न देता खाचखळगे कसे ओलांडायचे ते तू उत्तम जाणतोस. तुझा वेग तर अगदी असामान्य आहे आणि दमही मोठा आहे. मित्रा, चल आता अगदी थोडी मजल राहिली आहे. आणखी दोन घटकांत आपण वेशीच्या आत पोहोचू. मग मी तुला पुष्कळ विश्राम देईन. अरे, चंद्रावती म्हणजे माझे मूळचे गाव. इथे माझे बालपण गेलेले. इथे माझे शेकडो मित्र आहेत. घरोघरी माझ्या ओळखी आहेत. तेथे गेल्यावर तुझी इतकी उत्तम व्यवस्था करतो की, तुझा सगळा शीण दोन दिवसांत नाहीसा होईल.

"आधी आपण माझ्या मावसभावाकडे जाऊ. तो राजवाड्यात काम करतो. त्याच्याकडे आपल्याला सगळे वर्तमान कळेल. चल, चल बेटा लवकर."

घोडा वेगाने धावू लागला. नगराजवळच्या उद्यानामधून तो जात होता. मधेच फुर्र-फुर्र करून तो आपला आनंद व्यक्त करीत होता आणि घोडेस्वाराला त्याच्या चांगल्या वागणुकीबद्दल धन्यवाद देत होता.

त्या विस्तीर्ण चंद्रावती नगरीचे सुंदर दृश्य पाहताच दिनेश्वर काहीसा सुखावला होता. पण पुन्हा चिंताक्रांतही झाला होता. आपण पुष्पावती महाराणीसमोर कसे जाऊ शकू ? त्यांना कसे पाहू शकू ? त्यांना काय काय कळले असेल ? वल्लभीवर झालेल्या आक्रमणाची वार्ता येथे पोहोचली असेल काय ? तशीच महाराजांच्या मृत्यूची आणि वल्लभी नगरीची धूळधाण झाल्याची ? देवींना काय काय कळले असेल बरे ? त्यांनी ते

सगळे कसे सहन केले असेल ? असे अनेक प्रश्न त्याच्यापुढे उभे राहिले. पण त्याचबरोबर त्याला वाटले आपण एकदाचे चंद्रावतीला आलो. आता निदान महाराणीची तरी नीट व्यवस्था करता येईल. एवढ्या सगळ्या प्रवासात दिनेश्वर आपल्या अंगावरील जखमा पार विसरला होता. आता त्या त्याला थोड्या थोड्या जाणवू लागल्या.

काहीशा काळजीत, काहीशा समाधानात दिनेश्वर आपल्या मावसभावाकडे पोहोचला. पण तेथे पोहोचताच ऐकलेल्या पहिल्याच बातमीने त्याच्यावर जणूकाही वज्राघात केला. त्याला कळले की दोनच दिवसांपूर्वी देवी पुष्पावती वल्लभी नगरीकडे निघून गेल्या आहेत. "हाय रे दैवा ! आता आणखी काय होणार आहे !' असे म्हणून तो मटकन् खालीच बसला. पण मग लगेच सावरला. तो लगेच महाराज आदित्यनारायणसिंह परमार यांना भेटला.

दिनेश्वराला पाहताच वृद्ध आदित्यनारायणसिंहांनी त्याला ओळखले व थोडेसे भयचकित होऊन त्यांनी विचारले, 'हे काय दिनेश्वर, तू यावेळी येथे कसा ? वल्लभीची काय वार्ता आहे ? पर्शियनांचा पराभव झाला काय ? वल्लभी राज्याचा जय झाला ना ? महाराज ध्रुवभट सप्तम शीलादित्य यांचे सर्व क्षेम कुशल आहे ना ? माझी मुलगी तर वल्लभी नगरीवर आक्रमण झाल्याची वार्ता ऐकताच अतिशय घाबरली. तिला झोप येईनाशी झाली. थोडीशी झोपली तरी काही भयानक स्वप्न पडून ती दचकून जागी व्हायची आणि रडू लागायची. वल्लभीला जायचा तिने एकच ध्यास घेतला. मी नानाप्रकारे तिला समजाविले, पण तिने माझे ऐकले नाही. तिने आपला हट्ट चालू ठेवला. शेवटी परवा सकाळी थोडीशी सेना बरोबर देऊन मी तिला वल्लभी येथे पाठविले.

तिला आई नाही. मी विकलांग होऊन शय्येवर पडलो आहे. माझी दोन्ही मुले कशी दिवटी आहेत ते तुला ठावूकच आहे. त्यामुळे मी तिच्याबरोबर दोनशे सैनिक पाठवा असे सांगितले होते. पण, "आम्ही तीस सैनिक पाठविले आहेत. तीस पुष्कळ झाले" असे ते मला म्हणाले. आता खरोखर किती पाठविले आहेत कोण जाणे ? पण ती गेल्यापासून माझ्या मनाला फार अस्वस्थ वाटत आहे. ती संग्रामपूरच्या दक्षिणेकडून व चरणतीर्थावर मुक्काम करून पुढे जाणार होती. तू कधी आलास ? कोणत्या रस्त्याने आलास ? तिची व तुझी गाठ पडली नाही का ? सांग, दिनेश्वर, लवकर सांग . . ."

दिनेश्वर म्हणाला, "महाराज काय सांगू, आणि कसे सांगू ? आपण आपले मन घट्ट करा. वल्लभी नगरीचा नाश झाला. महाराज ध्रुवभट सप्तम शीलादित्य, हे जग सोडून गेले. त्यांचे सगळे अमात्य व सामंत मारले गेले. सगळी वल्लभी नगरी उध्वस्त झाली. महाराजांच्या आज्ञेवरून त्यांचा शेवटचा निरोप पुष्पावती देवींना सांगण्यासाठी आणि पुष्पावती देवींची व त्यांच्या उदरी येणाऱ्या बालकाची सेवा करण्यासाठी मी येथे धावत आलो. आपण म्हणता त्याच रस्त्याने मी वल्लभीहून चंद्रावतीला आलो. पण मला कोठेही देवी दिसल्या नाहीत किंवा त्यांचे सैनिकही दिसले नाहीत."

"काय म्हणतोस तरी काय तू दिनेश्वरा ! एवढे मोठे वल्लभीचे राज्य नष्ट झाले ? आमचे पराक्रमी जावई मारले गेले ? आणि आता मुलीचाही ठावठिकाणा लागत नाही ! त्या रस्त्यावरही तुला ती का बरे भेटली नाही ? माझ्या आदेशा-विरुद्ध यांनी रस्ताही बदलला की काय ?"

तोच एक सैनिक वेगाने आत आला व महाराजांना प्रणाम करून म्हणाला, "महाराज घात झाला ! प्रमार कुलकन्यका व वल्लभीच्या पट्टाभिषिक्त महाराणी पुष्पावती देवी यांना घेऊन आम्ही जात होतो तोच एकाएकी पर्शियन सैनिकांनी आमच्यावर आक्रमण केले. आम्ही सर्वांनी तलवारी उपसल्या. अल्पगिरीच्या पायथ्याशी आमचे घनघोर युद्ध झाले. त्यांची संख्या मोठी होती. पण आपले सगळे वीर फार शौर्याने लढत होते. मी स्वत: दोघांना मारले. तेवढ्यात माझ्या डोक्यावर कोणीतरी मागून येऊन प्रहार केला आणि मी बेशुद्ध होऊन पडलो. सकाळी माझे डोळे उघडले तेव्हा मी उठून बसलो. आसपास पाहिले तेव्हा मला असे दिसले की, आपले सगळे सैनिक तेथे मरून पडले आहेत. मी कसाबसा उठलो व मार्गाला लागलो. काही अंतर चालल्यावर मला एके ठिकाणी एक घोडे चरताना दिसले. ते कोणाचे आहे याचा विचार न करता व माझ्या शारीरिक स्थितीचाही विचार न करता मी सरळ घोड्यावर चढलो व एकसारखा वेगाने घोडा पिटाळीत तुमच्यासमोर येऊन उपस्थित झालो आहे. महाराज, माझ्या सर्वांगात वेदना होत आहेत. मला पाणी. . . . पाणी !" तो सैनिक तेथेच बेशुद्ध होऊन पडला. महाराजांनी सेवक पाठवून वैद्यराजांना आणविले व त्याच्या औषधपाण्याची व्यवस्था केली.

त्यांनी लगेच कुंवर भद्रनारायणसिंहाला बोलाविले. ते ज्येष्ठ राजकुमार होते. त्यांना सगळा वृत्तांत सांगताच ते म्हणाले, "तिला जायला कोणी सांगितले होते ? तिच्या हट्टीपणाचे तिला असेच फळ मिळायला हवे होते. मी दहा सैनिक तिचा शोध करण्यासाठी पाठवितो. मी स्वत: तिच्या शोधासाठी गेलो असतो पण काय करावे, फार पूर्वीपासून आमचा आज शिकारीचा बेत

ठरला होता. तिकडेच मी जात आहे. तेथे विलंब होऊन उपयोग नाही." दुसरा भाऊ राजकुमार चंद्रनारायणसिंह वारंवार निरोप पाठवूनही आला नाही. कोणी एक कर्नाटक देशातील प्रसिद्ध नर्तिका त्याने बोलाविली होती. तिचे नृत्य पाहण्यात तो मग्न होता.

दिनेश्वर म्हणाला, "महाराज, आपण आपले सैनिक अवश्य पाठवावे पण मला आधी आपण दोन चांगले घोडे द्यावेत. मी आणि माझा हा मावसभाऊ शितिकंठेश्वर, परत आलेल्या या सैनिकाला बरोबर घेऊन आम्ही पुढे जातो आणि महाराणींचा शोध घेतो.

घोडे मिळताच ते दोघे त्या सैनिकाला बरोबर घेऊन राजवाड्याबाहेर पडले आणि घोड्यावर आरूढ होऊन वायुवेगाने वल्लभीच्या वाटेने जाऊ लागले. वाटेत लागणाऱ्या गावात शिरून तेथील अधिकाऱ्यांना व लोकांना विचारीत ते पुढे जाऊ लागले.

## २ संकटांचा वर्षाव

पुष्पावती वडिलांच्या आग्रहामुळे चंद्रावतीला आली होती. वडील वृद्ध झाले होते, आजारी होते व मुले त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे फार दु:खी होते. पुष्पावतीची आई फार लहानपणी वारली होती. पुष्पावतीचे संगोपन तिच्या वडिलांनी केले होते. तिच्या अनेक सावत्र आया होत्या. पण त्यांच्या मत्सराची झळ त्यांनी पुष्पावतीला लागू दिली नाही. सगळ्या राजवाड्यात जणूकाही वडिलांना पुष्पावतीचा आणि पुष्पावतीला वडिलांचा आधार होता. वडील केव्हा इहलोक सोडून जातील

याचा भरवसा नाही, त्यापूर्वी त्यांच्याजवळ काही दिवस आपण राहून यावे अशा विचाराने ती चंद्रावती येथे आली होती. वल्लभी येथे असताना तिचे मन वडिलांसाठी तळमळत होते. पण चंद्रावतीला आल्यावर तेच मन पतीसाठी तळमळू लागले.

चंद्रावतीला ती सहा महिने राहण्यासाठी आली होती. ती गरोदर होती. माहेरी बाळंतपण करायचे, शक्य तितकी वडिलांची सेवा करायची, निदान त्यांच्याशी मनमोकळेपणाने गप्पागोष्टी करायच्या, बाळंतपणानंतर एक दोन महिने विश्रांती घ्यायची व मग वल्लभीला परतायचे असे तिने ठरविले होते. पण चंद्रावतीला येताच, तिच्या मनात नाना प्रकारच्या शंकाकुशंकांचे वादळ सुरू झाले. आपले काहीतरी चुकले असे तिला एकसारखे वाटू लागले. रात्री काहीतरी भयानक स्वप्ने पडावीत, तिने दचकून जागे व्हावे व मग काही केल्या झोप लागू नये असे रोज घडू लागले. एकसारखे अपशकून होऊ लागले. पर्शियन यवनांची एक भली मोठी सेना भारतात शिरली असून ती वल्लभीकडे जात आहे अशी वार्ता तिने ऐकली. ती कानी येताच तिने ताबडतोब वल्लभी येथे जायचे ठरविले. तिच्या वडिलांनी व भावांनी तिला नानाप्रकारे समजाविले. पण तेवढ्यात पुन्हा समाचार आला की पार्शिक यवनांनी वल्लभीवर निश्चितच आक्रमण केले आहे. आता तर पुष्पावतीला चंद्रावतीत राहणे अशक्य झाले. दुसरेच दिवशी ती वल्लभीला जाण्यासाठी निघाली. तिच्यासाठी एका मोठ्या पालखीची योजना करण्यात आली होती. वेळोवेळी बदलता यावेत म्हणून बारा भोई तिच्या पालखीबरोबर चालले होते. तिच्या सासरचे दोन सेवक व दोन दासी तिच्याबरोबर होत्या. माहेरचाही एक म्हातारा सेवक व एक बालपणीची सखी नंदिनी यांनाही

तिने आपल्याबरोबर घेतले होते. पालखीपुढे दहा घोडेस्वार व पालखीच्या मागे दहा घोडेस्वार असे एकंदर वीस घोडेस्वार तिच्याबरोबर होते.

त्या दिवसाचा सगळा प्रवास चांगला झाला. रात्रीचा मुक्काम त्यांनी विल्वग्राम येथे केला. ते गाव प्रमारांच्या राज्यात असल्यामुळे तेथील अधिकाऱ्यांनी पुष्पावतीनी चांगली व्यवस्था ठेवली. दुसऱ्या दिवशी पुन्हा पुढील प्रवास सुरू झाला. तिसऱ्या प्रहरी त्यांनी अरण्यमय भागात प्रवेश केला. तोच एकाएकी एक भयानक सर्प पालखीजवळ सरसरत आला. तेव्हा भोयांची व सेवकांची एकच गडबड उडाली. सासरहून आलेल्या गुणवर्धन नावाच्या सेवकाचा त्या धावपळीत त्या सर्पावर पाय पडला. सर्पाने त्याला दंश केला व तो जागच्या जागीच ठार झाला. त्याची अंत्यक्रिया करण्यात संध्याकाळ झाली. पुढील मुक्काम जवळच आहे अशा कल्पनेने ते सर्वजण वेगाने चालू लागले. परंतु मशालींच्या उजेडात रस्ता चुकले आणि भलत्याच दिशेला लागले. ते सर्व जण जेव्हा दोन कोस अंतर चालून गेले तेव्हा त्यांना अगदी दाट झाडी लागली. आपण मार्ग चुकलो आहे अशी शंका त्यांच्यापैकी प्रत्येकाला येऊ लागली.

तेवढ्यात त्यांना एक माणूस भेटला. सेनाधिकाऱ्याने त्याला विचारले, "चरणतीर्थाकडे हाच रस्ता जातो ना ?"

तो मनुष्य हसून म्हणाला, "हो, हो, हाच रस्ता जातो. तुम्ही थोडेसे चुकलात खरे पण जा आता सरळ की, दोन तीन घटकांत तुम्ही चरणतीर्थाला जाऊन पोहोचाल." असे म्हणून तो जिकडून आला होता तिकडेच वेगाने धावत गेला व लवकरच अदृश्य झाला.

त्या माणसाचे हसणे व बोलणे ऐकून पुष्पावतीला काही शंका आली. तिने ती आपल्या सेवकाला बोलून दाखविली. सेनाधिकारी कल्याणसिंहाला तिच्यासमोर बोलाविण्यात आले.

कल्याणसिंह म्हणाला, "तो कोणीतरी वेडपट होता. तो केवळ हसत हसत बोलत होता, म्हणून देवींनी कोणतीही शंका मनात बाळगू नये. शिवाय काहीही संकट आले तरी आम्हा वीस वीरांसमोर शत्रूच्या अगदी ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील हे आपण पक्के समजावे व निश्चिंत असावे."

पालखी पुढे चालू लागली. एक घटका झाली असेल तोच जवळच कोठेतरी वाघांच्या डरकाळ्या ऐकू आल्या. सगळ्यांच्या अंगावर काटा उभा राहिला. सगळ्यांनीच एकेक मशाल पेटवून हातांत धरली व दुसऱ्या हातात तलवारीही सिद्ध ठेवल्या. घोड्यांचे कान ताठ उभे झाले व ते थबकत दिबकत चालू लागले. एक घटका निघून गेली. पालखी वेगाने पुढे चालू लागली. घोडेही नीट चालू लागले. सैनिकांच्या तलवार धरलेल्या मुठी किंचित ढिल्या झाल्या व त्यांनी तलवारी खांद्यावर टेकविल्या. पुढे एक वळण लागले व एकदम खोल उतार सुरू झाला. तो एक कोरडा नाला होता. ते सर्वजण नाल्याच्या मध्यभागी येताच, "थांबा, एक पाऊल पुढे टाकाल तर खबरदार" अशी जोराची ललकारी त्यांना ऐकू आली. चहूबाजूंनी पन्नास भाले त्यांच्यावर रोखले गेले. प्रमार सैनिकांनी लगेच आपल्या तलवारी सरसावल्या व दरोडेखोरांवर घोडे फेकले. तेथे तुमुल युद्ध झाले. प्रमार सैनिकांनी मोठाच पराक्रम केला. पण रात्रीची वेळ, अपरिचित प्रदेश, दरोडेखोरांची संख्या तिपटीने मोठी, शिवाय त्यांच्यापैकी काहीजण उंच झाडावर

वसून बाण मारीत होते. अशा सगळ्या गोष्टींमुळे प्रमार सैनिक एका मागोमाग धरणीवर कोसळू लागले. आता प्रमारांचा पूर्ण पाडाव होणार इतक्यात वाघांच्या भयानक डरकाळ्या ऐकू येऊ लागल्या. सगळे रान त्यांनी दणाणून सोडले. तेथील सगळेजण कावरे–बावरे होऊन क्षणमात्र इकडे तिकडे पाहतात, तोच काळे, पिवळे पट्टे असलेले प्रचंड चार वाघ तेथे आले व त्यांनी समोर दिसेल त्याच्यावर झडप घातली. भोई पालखी खाली ठेवूनच पळू लागले. तेव्हा एक वाघ त्यांच्या मागे धावला. दरोडेखोरांची पांगापांग झाली. अनेक मशाली विझल्या. घोडे स्वैर उधळले.

## ३ साधू महाराजांच्या झोपडीत

पुष्पावतीने प्रसंग ओळखला. ती शांत चित्ताने विचार करीत होती व योजना आखत होती. तिने कमरेला पट्टा बांधला व पालखीच्या तळाशी ठेवलेली मोठी तलवार काढून तिने त्या पट्ट्यात खोचली. दोन लहान छुरिकाही तिने त्याच पट्ट्यात पुढच्या बाजूस खोचल्या. एका हातात तिने वाघनखे खोचून घेतलीत व दुसऱ्या हातात एक लहानसा पण धारदार पात्याचा परशू घेऊन ती पालखीबाहेर आली आणि नंदिनीला म्हणाली, “नंदिनी, तू आता पालखीत बैस. पालखीत आणखी दोन शस्त्रे आहेत. जमेल तसे स्वतःचे संरक्षण कर.”

नंदिनी डोळे विस्फारून दबलेल्या आवाजात म्हणाली, “देवी, अशा स्थितीत तुम्ही कोठे जाता ? मी तुम्हाला एकटी

कशी जाऊ देईन ? आधी माझे तुकडे तुकडे होतील मगच तुमच्या नखाला धक्का लागेल."

पुष्पावती म्हणाली, "नंदिनी, घाबरू नकोस. वाघांच्या रूपाने ईश्वराने मला ही पळण्याची संधीच धाडली आहे असे समज." झाडीपलीकडे काहीतरी आवाज आला. नंदिनी पट्दिशी पालखीत जाऊन बसली. पुष्पावती अतिशय वेगाने एका झाडाआड लपली व मग हळूहळू दूर निघून गेली. दरोडेखोरांनी भोयांना पकडून आणल्याचे व भोयांनी पालखी उचलल्याचे तिने झाडाआडून पाहिले. एका दरोडेखोराने पालखीत डोकावून पाहिले. आतील बाई रडत होती. त्याचे बहुधा समाधान झाले असावे.

पुष्पावती थोडा वेळ तेथेच थांबली. मग पालखी गेली त्याच्या विरुद्ध दिशेला ती चालू लागली. घटकाभर चालल्यानंतर ती पाऊलवाटेवर आली. त्या वाटेने ती अर्धा कोस चालत गेली. तोच तिला एक घोडा उभा असलेला दिसला. त्याच्यावर खोगीरवगैरे कसलेला होता. चकमकीत पडलेल्या एखाद्या प्रमार सैनिकाचा उधळून आलेला तो घोडा होता. आता तो अगदी शांत उभा होता. जणूकाही तो तिचीच वाट पाहत होता.

पुष्पावती त्याच्याजवळ आली. तिने त्याच्या पाठीवरून हात फिरविला. जणूकाही तिने त्याची परवानगीच विचारली. घोड्यानेही मान हालविली. जणू त्याने तिला आश्वासन देऊन म्हटले, "मी तुला अवश्य संकटमुक्त करीन. माझ्यावर विश्वास ठेव." पुष्पावती घोड्यावर आरूढ झाली आणि घोडा वायुवेगाने धावू लागला. तो कोठे जात होता, तिला काहीएक माहीत नव्हते. कित्येक घटका घोडा पळत राहिला. अरण्य आता विरळ झाले

होते. पहाट व्हायला आली होती. रानफुले विकसित झाल्यामुळे त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. पहाटेचे वारे वाहू लागले होते. दिशा किंचित प्रकाशत होत्या.

पुष्पावतीला एक झोपडी दिसली. झोपडीसमोर अंगण होते. अंगणात धुनी जळत होती. जवळच एक साधू बसला होता. तो खड्या सुरेल आवाजात प्रभू रामचंद्राचे भजन म्हणत होता. पुष्पावतीने झोपडीजवळ घोडा उभा केला. खाली उतरून साधू-जवळ जाऊन ती म्हणाली, "महाराज, मी आपल्या भजनात बाधा आणत आहे त्याबद्दल मला क्षमा असावी. परंतु मी अतिशय थकले आहे. मला पाणी हवे आहे."

त्या वृद्ध साधूने वळून तिच्याकडे पाहिले आणि हात जोडून म्हटले, "माते, तुझे स्वागत असो. तहानलेल्याला पाणी देणे, भुकेलेल्याला अन्न देणे आणि गरजवंताची गरज दूर करणे हीच खरी प्रभूची पूजा होय. माते, तुझ्या रूपाने उषादेवीच येथे आली आहे असे मी समजतो. आत ये, आसनस्थ हो. तुला हातपाय धुवायला मी ऊनपाणी देतो. त्याने चांगले हातपाय धू. ऊन ऊन दूध पी आणि विश्राम कर."

त्या साधूचे ते प्रेमळ बोल ऐकून आतापर्यंत टिकवून ठेवलेले तिचे धैर्य खचले. तिचे डोके गरगरू लागले, हातपाय लटलट कापू लागले. ती तेथेच खाली बसली आणि आडवी झाली.

साधू धावतच पुढे आला. त्याने तिला सावरून धरले. तिच्या तोंडावर कोमट पाणी शिंपडले आणि तिला म्हटले, "बाळे, ऊठ, घाबरू नकोस. सर्व काही ठीक होईल." साधूने तिला उठविले व झोपडीत नेले. दर्भासनावर एक मोठे व्याघ्रचर्म घालून त्याने

तिच्यासाठी शय्या तयार केली. तेथे तिला नेऊन बसविले. मग त्याने दोनतीन भांड्यांत चांगले गरम पाणी आणून दिले आणि एक वस्त्राचा तुकडा दिला. एका पात्रात तो ऊन ऊन दूध घेऊन आला व ते तिच्यासमोर ठेवून म्हणाला, "माते, तू आता आपले हातपाय चांगले शेकत शेकत धू. ऊन ऊन दूध पी आणि विश्राम कर. येथे तुला कसलीही भीती नाही. तू सगळी चिंता टाकून दे. तुझ्या नशिबी दैवाने भीषण आपत्ती लिहिली होती. ती तुझ्यावर कोसळली आहे. पण त्याला कोण काय करणार ? यापुढे मात्र सर्वकाही चांगले होणार आहे असे तू निश्चित समज. आणखी घटकाभराने आमची भक्तमंडळी येथे येतील. मग मी कोणातरी वृद्ध व अनुभवी स्त्रीला तुझ्या सेवेसाठी बोलावून घेईन. तोपर्यंत तू शांत पडून राहा. जे व्हायचे होते ते सगळे होऊन गेले आहे. त्याचा विचार करू नकोस. मी आता माझ्या नित्यकर्माला लागतो."

ऊन पाण्याने हातपाय शेकल्यामुळे पुष्पावतीला पुष्कळ बरे वाटू लागले. साधू महाराजांनी ठेवलेले दूध ती हळूहळू प्याली आणि तिला बरीच हुशारी वाटू लागली. व्याघ्रचर्मावर ती आडवी झाली आणि लवकरच तिला गाढ झोप लागली.

ती जेव्हा जागी झाली तेव्हा झोपडीबाहेर चाललेले संभाषण तिच्या कानी पडले.

"महाराज, आपण सांगितल्याप्रमाणे मी माझ्या आईला घेऊन आलो आहे. शिधासामग्रीही आणली आहे. आई आत जाऊन बसली आहे. आपण ध्यान लावून बसला होता म्हणून मी वाट पाहत उभा होतो. महाराज, त्या बाई कोणीतरी मोठ्या घरच्या दिसतात."

साधू म्हणाले, “होय, म्हणूनच तर मुद्दाम मी तुझ्या आईला बोलावणे पाठविले. ती कोण आहे, कोण जाणे ! पण तिची मुद्रा पाहताच मला असे भासले ही कोणीतरी तेजस्विनी आहे. म्हणूनच माझ्या तोंडून एकदम उद्‌गार बाहेर पडले की, “ढगांना व अंधःकाराला बाजूला सारून ही साक्षात् उषादेवीच येत आहे.” तिच्या उदरी जन्माला येणारा बालक सूर्यासारखा तेजस्वी असेल, हेमंत तू आता जा व नित्यापेक्षा दुप्पट दूध व फळे घेऊन ये आणि काय हवे, नको ते आईला विचारून ये.

हेमंत म्हणाला, “आई आत त्यांच्याजवळ बसली आहे. त्या झोपल्या आहेत. मी थोडया वेळाने पुन्हा येऊन विचारपूस करून जाईन.” हेमंत गेला. संभाषण थांबले. पुष्पावतीने डोळे उघडून पाहिले, तो जवळच एक वृद्धा बसली होती. तिचे वय साठीजवळ असावे. तिचे केस पांढरे होते. वर्ण गौर होता. बांधा सडसडीत व उंच होता. तिची मुद्रा शांत व प्रेमळ होती. पुष्पावतीला ती मूर्तिमंत वत्सलताच भासली.

ती एकदम उठून बसली व म्हणाली, “आई, तुम्ही केव्हा आलात ? हे उबदार पांघरूण माझ्या अंगावर कोणी घातले ? मला फारच गाढ झोप लागली होती.” ती वृद्धा म्हणाली, “ताई आपण थोडा वेळ पडून राहा. तुम्ही स्वतःला फार जपायला हवे. एक दोन दिवस मी तुमची प्रकृती पाहीन. तुम्हाला योग्य ते औषध देईन व मग मी सांगेन त्याप्रमाणे हळूहळू हालचाल सुरू करा.”

त्या वृद्धेने आपल्याबरोबर आणलेले अन्न तिला खायला दिले व काही औषध मधातून चाटविले. पुष्पावतीला लवकरच पुन्हा चांगली झोप लागली.

## ४ पुष्पावती व दिनेश्वर यांची भेट

दिनेश्वराने त्या आलेल्या सैनिकाला आपल्याबरोबर घेतले व ते तिघे जण घोड्यावर बसून वायुवेगाने, चंद्रावती नगरीबाहेर पडले. ज्या रस्त्याने पालखी गेली होती त्या रस्त्याने ते जाऊ लागले. चरणतीर्थाच्या अलीकडे ते थांबले. तेथे तीन रस्ते फुटले होते. चरणतीर्थाकडे डाव्या बाजूचा रस्ता जात होता. तो सैनिक म्हणाला, "येथेच आम्ही रस्ता चुकलो. आमच्या बरोबरचा एक-जण साप चावून मेल्यावर आम्ही दुःखी झालो होतो. मोठा अपशकून झाल्यासारखे सगळ्यांना वाटत होते. मृताची उत्तरक्रिया करता करता खूप उशीर झाला. रात्र झाली. सगळ्यांची बुद्धी गांगरली आणि डावीकडे वळण्याऐवजी आम्ही उजवीकडे वळलो."

मग तिघेही उजवीकडे वळले आणि लवकरच नाल्यात पोहोचले. नाल्यात घोर युद्ध झाल्याच्या खाणाखुणा दिसत होत्या. तो सैनिक एका झाडाकडे बोट दाखवून म्हणाला, "येथेच मी बेशुद्ध पडलो होतो. बाकीच्या सगळ्या लोकांची पदचिन्हे नाल्याच्या पलीकडे दिसत आहेत. पण हा एकच घोडा इकडे निराळ्याच बाजूला गेलेला दिसतो आहे. चला, आपण या घोड्याच्या पदचिन्हांमागे जाऊन पाहू."

लगेच त्या तिघांनीही घोड्यावर बसून त्या दिशेने मार्ग आक्रमणे सुरू केले. लवकरच ते साधुमहाराजांच्या झोपडीपाशी येऊन पोहोचले. झोपडीबाहेर एक घोडा उभा होता. सैनिकाने ओळखला. तो म्हणाला, "अहो, हा पाहा घोडा येथे उभा आहे. हा

माझाच आहे. त्या दरोडेखोरांपैकी कोणीतरी येथे लपला असेल. पण आपण तर तिघेच आहोत, ते न जाणो कितीजण असतील. येथे आपणांस काहीतरी वार्ता कळेल हे निश्चित. पण आधी आपल्याजवळ सैन्यबळ हवे."

तेवढ्यात दिनेश्वराची दृष्टी झोपडीजवळ बसलेल्या साधू महाराजांकडे गेली. तो लगेच पुढे झाला. पादत्राणे काढून ठेवून त्याने साधू महाराजांना प्रणाम केला व तो म्हणाला, "महाराज, आम्ही आमच्या महाराणीच्या शोधार्थ निघालो आहोत. चंद्रावतीच्या प्रमारांची राजकन्या व वल्लभीचे महाराज ! हाय ! हाय ! ! ते आता कैलासवासी झाले आहेत. देवींना अजून ते माहीतही नाही. ध्रुवभट सप्तम शीलादित्यांच्या पत्नी महाराणी पुष्पावतींच्या शोधार्थ आम्ही निघालो आहोत. काल रात्री त्यांच्याबरोबर असलेल्या सैनिकांवर दरोडेखोरांनी आक्रमण केले. त्यामुळे त्या सगळ्यांची वाताहत झाली. हा घोडा येथे दिसला म्हणून आम्ही आपल्या चरणांजवळ आलो. आपण आम्हास काही साहाय्य केल्यास आपले आमच्यावर मोठे उपकार होतील."

वृद्ध साधू म्हणाला, "मला असे वाटते की, मी तुम्हाला पुष्कळच साहाय्य करू शकेन. या घोड्यावर बसून आज पहाटे जी स्त्री येथे आली तीच तुम्ही म्हणता ती राणी पुष्पावती असावी. तिच्या मुद्रेवरचे राजतेज असाधारण आहे."

दिनेश्वर म्हणाला, "होय महाराज, आमच्या महाराणी तशाच आहेत."

"ती स्त्री तरुण व गरोदर आहे."

"तर महाराज त्या निश्चितच आमच्या देवी आहेत. त्या कोठे आहेत ते लवकर सांगा." दिनेश्वर उठून उभा राहिला व पुन्हा मटकन् खाली बसला आणि म्हणाला, "अरेरे! पण मी त्यांच्या-समोर कसा जाऊ? त्यांना मी काय सांगू? ईश्वरा, कोण हा भयंकर प्रसंग तू माझ्यावर आणलास!!"

साधू महाराज म्हणाले, "वत्सा, शांत हो. त्याच आहेत, किंवा कसे ते या झोपडीत जाऊन पाहा. देवी तेथे निजल्या आहेत आणि तू म्हणतोस तसे असेल तर त्यांच्यावर ओढवलेला अनर्थ त्यांना सध्या कळता कामा नये. आधी त्याच आहेत किंवा काय हे तू पाहून घे."

दिनेश्वर उठला व झोपडीकडे जाऊ लागला. त्याने एक पाऊल पुढे टाकले व तो तेथेच थबकला, कारण झोपडीच्या दारात महाराणी पुष्पावतीदेवी उभ्या होत्या. त्या म्हणाल्या, "दिनेश्वरा, मी तुझे सगळे बोलणे ऐकले. तेव्हा महाराजांचा मृत्यू कसा झाला, तेवढे फक्त मला सांग."

दिनेश्वर म्हणाला, "देवी, काय सांगू ती करुणकथा. आता पूर्ण विजय मिळणार इतक्यात आकस्मिक रीतीने नशिबाचे पारडे फिरले आणि आपला पराजय झाला. स्वत: महाराजांनी अकाटच्या-यनाच्या मुख्य छावणीवर आक्रमण केले. स्वत: अकाटच्यायनाशी लढून त्यांनी त्याला ठार मारले व त्याची अधिकांश सेना कापून काढली. पण त्या युद्धात महाराजांच्या बरगड्यांवर फार मोठा घाव बसला. आतल्या आत मुका मार बसला असावा व बहुधा रक्तस्रावही विपुल झाला. असावा महाराज वारंवार बेशुद्ध पडू लागले. त्यांना पालखीत बसवून आपले सेनापती नगरात आणत होते. परंतु

एकाएकी नगरावर यवनांचा ध्वज फडकू लागल्यामुळे ते जवळच्या कमलनेर गावात आश्रयासाठी गेले. लवकरच त्या गावावर यवन-सेनेची धाड आली. आपल्या थोड्याशा सेनेसह विक्रमसिंहांनी मोठ्या धैर्याने यवनांचा सामना केला. बाहेरच्या रणगर्जना ऐकून त्या विकलांग अवस्थेतही महाराज उठून उभे राहिले आणि शस्त्र घेऊन बाहेर गेले व शत्रूवर तुटून पडले. तेवढ्यात दुरून कोणीतरी त्यांना बाण मारला. तो छातीत लागून ते खाली पडले व गत-प्राण झाले.

मृत्यूपूर्वी महाराजांनी तुमची वारंवार आठवण काढली. तुम्हाला देण्यासाठी आपल्या गळ्यातील हार, बाहूवरचे कंकण व त्यांना त्यांच्या वडिलांपासून मिळालेली तलवार, या गोष्टी त्यांनी मजजवळ दिल्या व म्हटले, "दिनेश्वरा, देवींना जप. मीच त्यांच्या उदरी येत आहे असे समज. देवींच्या सांगण्याप्रमाणे जर मी वागलो असतो. . . ." हे सगळे सांगता सांगता दिनेश्वराच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

पुष्पावती म्हणाली, "दिनेश्वरा, रडू नकोस. मदिरेच्या धुंदीत कोणा नीच कपटी माणसाकडून त्यांचा वध न होता, ते लढता लढता गतप्राण झाले व त्यांना वीरोचित मरण आले हेच मी माझे परम सौभाग्य समजते. वास्तविक पाहता त्यांची तलवार हृदयाशी कवटाळून मला अग्निप्रवेश करायला हवा. परंतु त्यांचा वंश माझ्या उदरात वाढत आहे. त्यामुळे मला तसे करता येत नाही. हर हर ईश्वरा, काय ही माझी स्थिती केलीस !" असे म्हणून पुष्पावती मोठ्याने आक्रंदन करू लागली व झंझावातात सापडलेल्या वेलीसारखी थरथर कापू लागली.

तिच्या सेवेसाठी आणलेल्या वृद्धेने तिला आपल्या छातीशी धरले व तिचे परोपरीने सांत्वन केले.

ती बरीच शांत झाल्यावर वृद्ध साधूनेही तिला उपदेश केला व म्हटले, "बाळे, रडू नकोस. दु:ख करू नकोस. ईश्वराची लीला अतर्क्य आहे. तुझ्यासारख्या सद्‌गुणी मुलीवर ओढवू नये असा प्रसंग ओढवला आहे. पण तू शांततेने सगळे सहन कर. मी तुला आशीर्वाद देतो की, तुला फार सद्‌गुणी पुत्र होईल व तो तुझ्या कुलाची कीर्ती दिगंती नेईल !"

## ५ स्थानांतर

पुष्पावती तेथंच राहू लागली. दिनेश्वरही तेथेच राहिला. हेमंताने आणि त्याच्या आईने पुष्पावतीची उत्तम सेवा केली. दिनेश्वराने आपल्या मावस भावाबरोबर पुष्पावतीची सर्व हकीकत तिच्या वडिलांना कळविली. त्यांनी ससैन्य पालखी पाठविली. पण पुष्पावतीने ती परत पाठविली. एखाद्या गरीब स्त्रीसारखी ती राहू लागली. पण तिचे तेथे राहणे अनेकांना ठाऊक झाले होते. तिच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ते योग्य नव्हते. तेव्हा साधू महाराजांशी विचारविनिमय करून दहा कोसांवर असलेल्या वटग्राम नावाच्या ठिकाणी साधू महाराजांच्या शिष्याकडे तिला नेण्यात यावे असे ठरले. तिच्याबरोबर दिनेश्वर, हेमंत, हेमंताची आई यांनी जावे व मग हेमंताने परत यावे परंतु हेमंताच्या आईने व दिनेश्वराने तेथेच राहावे अशी सगळी योजना ठरली. ही गोष्ट

सगळ्यांनी गुप्त ठेवावी, तिची कोठेही वाच्यता करू नये असेही ठरले.

एके दिवशी पहाटे साधू महाराजांच्या आश्रमातून दोन घोडी बाहेर पडली. एकावर पुष्पावती बसली होती व दुसऱ्यावर हेमंताची आई बसली होती. हेमंत व दिनेश्वर बाजूने पायी चालले होते. दोन्ही घोडी अगदी हळूहळू चालली होती. पुष्पावतीची प्रकृती अगदी चांगली होती. वाटेतील मुक्कामाची व विश्रामाचीही नीट व्यवस्था झालेली होती.

हेमंताची आई एकसारखे बोलत होती. मधूनमधून हास्य-विनोदही करीत होती. हेमंत तिला मोकळेपणाने साथ देत होता. पुष्पावतीच्या मनावरचे दडपण दूर व्हावे व तिने प्रसन्न असावे, असा त्या दोघांचा एकसारखा प्रयत्न चालला होता. पुष्पावतीच्या ते लक्षात आले होते. आपण प्रसन्न आहोत असे ती दाखवीत होती. पण आतल्या आत तिला कसली तरी काळजी वाटत होती. दिनेश्वरही वरकरणी हसत होता, बोलत होता, उत्तरप्रत्युत्तरही करीत होता पण मध्येच कसल्या तरी विचारात बुडून जात होता.

त्यांचा सकाळचा प्रवास फार चांगला झाला. ठरल्याप्रमाणे तुलसीपूर नावाच्या गावात हेमंताच्या एका नातेवाईकाकडे त्यांचे जेवण झाले आणि पुष्पावतीने पुरेशी विश्रांती घेतल्यानंतर ते पुढल्या प्रवासासाठी निघाले. हा मार्ग जरा कठीण होता. वाटेत लहानसे अरण्य होते व पहाडी भागही होता. पहाड चढून गेले की, पठारावर एक गाव होते. तेथे रात्रीचा मुक्काम व्हावयाचा होता. हे अंतरही थोडे जास्त होते. म्हणून सर्वजण लगबगीने निघाले. पुष्पावतीची प्रकृती ह्यावेळी फार चांगली होती, त्यामुळे

सगळ्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती. घोडे ऐटीत चालले होते. हेमंत मध्येच एखादे गाणे म्हणत होता.

साधा रस्ता संपला. चढण सुरू झाली. पाठीला हिसके देत देत घोडे वर चढू लागले. त्यांना पाहून भ्यालेले ससे इकडेतिकडे पळू लागले व मध्येच थांबून गवतातून डोके वर करून त्यांच्याकडे पाहू लागले. अंगावर ठिपके असलेल्या हरिणांचा एक लहानसा कळप त्यांच्या समोरून उड्या मारीत निघून गेला. ते सुंदर दृश्य पाहून पुष्पावती जेव्हा मोकळेपणाने हसली तेव्हा सर्वांनाच फार आनंद झाला.

वर चढता चढता पुष्पावतीचा घोडा थोडासा अडखळला आणि थांबला. किंचित झटका लागून पुष्पावती पुढे वाकली आणि लगेच सावरली. तिचा घोडा पुढे चालू लागला पण तिच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता लोपून तिच्या कपाळावर लहानशी आठी दिसू लागली. हेमंतच्या आईच्या ते लक्षात आले. तिने चट्दिशी विचारले, "देवी, तुम्हाला काही त्रास होत आहे काय ?"

पुष्पावती म्हणाली, "नाही, त्रास काही नाही पण माझ्या तोंडाला थोडी कोरड पडली आहे."

हेमंताच्या आईने लगेच दोन्ही घोडे थांबविले आणि बरोबर घेतलेल्या सुरईतले थोडेसे पाणी तिला प्यायला दिले आणि आपल्या औषधाच्या बटव्यातून लवंग, खडीसाखर आणि काही औषधीगोळ्या काढून तिला तोंडात ठेवावयाला दिल्या. घोडी पुन्हा पुढे चालू लागली. चढण चढू लागली. पुष्पावतीच्या कपाळा-वरील आठी अधिक स्पष्ट दिसू लागली.

हेमंताची आई म्हणाली, “देवी काही त्रास होत असेल तर मोकळेपणाने सांगा. संकोच धरू नका. अजून आपणास परत फिरता येईल.”

पुष्पावती म्हणाली, “मघापासून माझ्या पोटात थोडे थोडे दुखू लागले आहे. आता थांबेल मग थांबेल असे मला वाटले होते पण ते एकसारखे वाढतच आहे.”

हेमंताची आई म्हणाली, ‘‘तर मग खाली उतरून जरा थांबू या.”

लगेच हेमंताची आई खाली उतरली. तिने व दिनेश्वराने आधार देऊन पुष्पावतीला खाली उतरविले आणि एका झुडुपाखाली कांबळे टाकून त्यावर पुष्पावतीला बसविले. उशाशी एक दगड घेऊन पुष्पावती तेथेच थोडीशी आडवी झाली.

ते दृश्य पाहून दिनेश्वराला भडभडून आले. तो मनातल्या मनात म्हणाला, अरेरे ! काय ही दैवाची विचित्र गती ! थोड्याच दिवसांपूर्वी जी गाद्यागिरद्यांवर लोळत होती, ती आज उशाला दगड घेऊन कांबळ्यावर पहुडली आहे. जिच्या एका हाकेसरशी शेकडो दास–दासी धावून येत असत, ती आज काहीही संबंध नसलेल्या परोपकारी सहृदय व्यक्तींच्या दयेवर जिणे कंठते आहे. जी मोठमोठ्या राजप्रासादांत राहत असे तिला आज रानातल्या झुडुपाखाली बसायची पाळी आली आहे. दिनेश्वराने स्वतःला कसेबसे सावरले. तो हळूच हेमंताच्या आईजवळ गेला आणि तिला म्हणाला, “आई, आता काय करायचे ? आता तुम्ही जे सांगाल ते करू. येथे आमची तलवार, आमचा पराक्रम, आमची धावपळ सगळे काही उणे पडते.”

म्हातारी म्हणाली, "बाबा दिनेश्वरा, पहिली गोष्ट जर करायची असेल तर ती म्हणजे धैर्य सोडायचे नाही. क्षणापूर्वी जेव्हा मी तुझ्याकडे पाहिले तेव्हा मला असे दिसले की, तू अगदी रडायच्या वेतात आला होतास. असे करून कसे चालेल ? माणसाच्या जीवनात असे चढउतार यावयाचेच. असे कठीण दिवस येतात म्हणूनच मनुष्याच्या अहंकाराला आळा बसतो व तो नम्र होऊन परमेश्वराची आठवण ठेवतो. आता तू देवाचे नाव घे आणि जवळपास एखादी आडोशाची जागा पाहा."

## ६ पुत्रप्राप्ती

दोघांचीही दृष्टी सहज बाजूला गेली. तोच एका खडकातून दोन कोल्हे डोकावताना त्यांना दिसले. "हे अपशकुनी येथे कशाला आहेत ?" असे म्हणून दिनेश्वराने त्यांना मारायला दगड उचलला. तेव्हा म्हतारी म्हणाली, "अरे, त्यांचे डावीकडून ओरडत जाणे अशुभ आहे पण त्यांचे तोंड दिसणे शुभ आहे." ती कोल्ही लपत होती व पुन्हा बाहेर येत होती. पुन्हा लपत होती, पुन्हा कुतूहलाने पाहत होती असे चार पाच वेळा झाले.

तेवढ्यात पुष्पावती उठून बसली. म्हातारी धावत तिच्याजवळ गेली. पुष्पावती म्हणाली, "आई, मला तर आता कठीण प्रसंग दिसतो, आता मागे जाणेही नाही आणि पुढे जाणेही नाही. बहुधा येथेच मी मरणार !" ती दिनेश्वराला म्हणाली, "तू घोड्यावर बसून लवकर जा आणि साधू महाराजांच्या आश्रमातून आपली ती तलवार घेऊन ये. ती जवळ घेऊन मी मरेन."

म्हातारी तिच्याजवळ गेली आणि म्हणाली, "देवी, तुम्ही शांत व्हा. अशा घाबरून जाऊ नका. अशा प्रसंगातून मी आजपर्यंत शेकडो स्त्रियांना मोकळे केले आहे. तुम्ही धीर मात्र सोडू नका."

हेमंताची आई पुष्पावतीजवळ येऊन बसली आणि तिने तिला एक मात्रा उगाळून दिली. पुष्पावतीला थोडेसे बरे वाटू लागले. ती पुन्हा आडवी झाली व तिचा किंचित डोळा लागला.

हेमंतच्या आईने दिनेश्वराला खूण केली व जागा लवकर शोधायला सांगितली. तेवढ्यात ते कोल्हे पुन्हा दिसले व पुन्हा नाहीसे झाले. दिनेश्वराच्या मनात एक कल्पना चमकली. त्याने हेमंताला बरोबर घेतले व तो कोल्ह्यांच्या मागे धावला. एका मोठ्या शिळेच्या पलीकडे दुसरी मोठी शिळा होती. दोन्ही शिळांमध्ये एक माणूस जाऊ शकेल अशी वाट होती. दहा पावले गेल्यावर समोरच्या कड्याला एक मोठे छिद्र होते. वरून लोंबणाऱ्या वेलीमुळे ते झाकले गेले होते. दिनेश्वराने त्या वेली बाजूला केल्या व ते दोघेही आत शिरले. दोघांच्याही हातात नागव्या तलवारी होत्या. आतमध्ये अंधार होता. पण गडद अंधार नव्हता. लगेच हेमंताने चूड पेटविली. तो ती जागा बरीच मोठी असून कोल्ह्यांची दहा बारा लहान मोठी पिल्ले तेथे बसली असल्याचे त्यांना दिसले. चूड पेटल्याचे पाहून ती सर्व उभी राहिली. थोडासा प्रतिकार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्यांच्यापैकी सर्वांत मोठ्या पिल्लाला चुडीचा चटका बसताच कुई–कुई करीत ते बाहेर पळाले व त्याच्या मागोमाग सर्व पिल्ले बाहेर पळाली. हेमंताने लगेच काड्या एकत्र बांधल्या व ती जागा स्वच्छ

करायला सुरुवात केली. दिनेश्वर लगेच पुष्पावतीकडे जाऊन आला. तिला झोप लागली होती. म्हातारी जवळ बसली होती. दिनेश्वराने म्हातारीला लहानशी गुहा सापडल्याचे सांगितले. ते ऐकून तिला बरे वाटले.

दिनेश्वराने आणि हेमंताने मिळून दोन घटका खूप परिश्रम केले व ती गुहा स्वच्छ केली. तीस पावले लांब–रुंद अशी ती गुहा होती. मागल्या बाजूला ती निमूळती होत गेली होती. शेवटी तिचे अंतर तीन पावलांइतकेच होते. तेथे एक लहानसा ओटा होता. त्या ओटयावर कधीकाळी मूर्ती असावी व तेथे पूजा वगैरे होत असावी असे दिनेश्वराला वाटले. ती गुहा फक्त दीड पुरुष उंच होती. त्यामुळे म्हणा किंवा अन्य काही कारणामुळे म्हणा, तेथे मधमाशांची पोळी नव्हती, हे पाहून दिनेश्वराला फार बरे वाटले.

गुहा स्वच्छ झाली व रस्ताही चांगला झाला. मग हेमंताला गुहेच्या तोंडाशी ठेवून दिनेश्वर पुष्पावतीजवळ आला. पुष्पावती उठून बसली होती. तिच्या वेदना वाढल्या होत्या. म्हातारीने पुष्पावतीला उठविले व त्या दोघीजणी हळूहळू चालत गुहेत आल्या. ती गुहा पाहून दोघींनाही फार आनंद झाला. पुष्पावती म्हणाली, “जणू काही आपल्यासाठीच ही गुहा कोणी तरी तयार करून ठेवली आहे असे वाटते.”

म्हातारी म्हणाली, “देवी, ईश्वराच्या सगळ्या योजना आधीच बनलेल्या असतात. आपल्याला त्या उशिरा कळतात एवढेच काय ते.”

म्हातारीने गुहेत उत्तम शय्या तयार केली. घोड्यावरचे सगळे सामान आत घेण्यात आले. गुहेबाहेर थोड्याच अंतरावर

एक झाड होते. तेथे घोडे बांधण्यात आले. तेथली जागा स्वच्छ करून व एक लहानशी झोपडी उभारून दिनेश्वर आणि हेमंत यांनी आपल्या राहण्यासाठी चांगली जागा तयार करून घेतली.

रात्र झाली. एकाएकी सोसाट्याचा वारा वाहू लागला. आकाशात ढग जमले. सगळीकडे काळेकुट्ट झाले. थोड्याच वेळात मेघांचा गडगडाट सुरू झाला. विजा चमकू लागल्या व पाऊस पडू लागला. मध्यरात्रीपर्यंत धो–धो पाऊस पडत होता. पण गुहेत काहीएक त्रास झाला नाही. गुहेत मंद–मंद दिवा जळत होता. पावसाचा अंदाज पाहून हेमंताने बरेचसे वाळलेले गवत आणि लहान–मोठ्या काटक्या यांचा साठा करून ठेवला होता. त्यामुळे थंडीपासूनही त्यांना काही त्रास झाला नाही.

पुष्पावतीला मध्येच थोडेसे बरे वाटत होते. तर पुन्हा वेदना सुरू होत होत्या. कळा येऊ लागल्या म्हणजे ती अगदी बेचैन व्हायची. मध्यरात्रीनंतर तिला फारच त्रास होऊ लागला. हेमंत व दिनेश्वर यांची धावपळ सुरू झाली. म्हातारीच्या सांगण्याप्रमाणे ते लहान–मोठी कामे करू लागले. म्हातारी काय सांगते ते ऐकण्याकरिता गुहेबाहेर ते तासन्तास ताटकळत उभे राहिले.

म्हातारी अनुभवी होती. तिने तेथल्या तेथेच सगळी व्यवस्था उत्तम केली होती. तिच्याजवळ नाना प्रकारच्या औषधी होत्या. ती वेळोवेळी नवी नवी उपाययोजना करीत होती व तोंडाने देवाचे नाव घेत होती.

पहाट झाली. तांबडे फुटले. वेलींच्या दाट पडद्यातून सूर्याच्या कोवळ्या लाल किरणांनी गुहेत प्रवेश केला आणि त्याच वेळी पुष्पावतीने एका सुंदर बालकाला जन्म दिला.

म्हातारीने गुहेच्या द्वाराशी येऊन सांगितले, "दिनेश्वरा, देवींना पुत्रप्राप्ती झाली आहे. दिनेश्वराने बसल्या जागी आनंदाने उडी मारली व पुढे होऊन त्याने हेमंताला कवटाळले व म्हटले, "हेमंता, देवींना पुत्रप्राप्ती झाली आहे. किती आनंदाचा हा प्रसंग आहे. हत्तीवरून सगळ्या राज्यात साखर वाटली गेली पाहिजे." "तोच दिनेश्वर भानावर आला. आपण कोणत्या परिस्थितीत आहोत हे त्याच्या लक्षात आले. थोड्याच वेळापूर्वी वाहणाऱ्या आनंदाश्रूंचे दु:खाश्रूत रूपांतर झाले. त्यानेच आपल्या मनाला समजाविले. मग त्याचे मन आनंदित झाले. एकदा आनंदाचा उमाळा व एकदा दु:खाचा उमाळा असे त्याच्या मनात बराच वेळ होत राहिले.

## ७ पुष्पावतीचा विलाप

अतिशय शांत होऊन पुष्पावती कांबळ्याच्या बिछान्यावर पडली होती. म्हातारीने जेव्हा तिला सांगितले की, "देवी, तुम्हाला पुत्ररत्नाची प्राप्ती झाली आहे तेव्हा आनंदाची एक लकेर तिच्या चेहऱ्यावर चमकून गेली. परंतु शुद्ध द्वितीयेला आकाशात चंद्रकोर उगवावी आणि लगेच मावळावी किंवा पावसाळ्यामध्ये सूर्यबिंब दिसावे न दिसावे तोच ते काळ्याकुट्ट ढगाआड झाकले जावे तसे तिच्या आनंदाचे झाले.

आतापर्यंत तिने नाना प्रकारच्या शारीरिक व मानसिक दु:सह वेदना सहन केल्या होत्या. पण ती रडली नव्हती. आता

ती मोठमोठ्याने हुंदके देत रडू लागली व मोठ्याने विलाप करू लागली. "देवा, किती संकटांचा वर्षाव तू माझ्यावर करीत आहेस. मागच्या जन्मी असे मी काय पाप केले होते, म्हणून तू मला असे छळीत आहेस ? मी नऊ वर्षांची लहान होते तेव्हा तू माझ्या डोक्यावरून मातेचे छत्र हिरावून नेलेस. वडिलांची लाडकी असल्यामुळे त्यांनी मला कसे तरी सांभाळले. सापत्न मातांच्या विषारी फुत्कारापासून कसे तरी दूर ठेवले. देवा, तू मला भावांचे सुख मिळू दिले नाहीस. दिलेस ते सावत्र भाऊ दिलेस आणि तेही एकापेक्षा-एक कुलक्षणी दिलेस. माझा विवाह वयाच्या अठराव्या वर्षी वल्लभीच्या ज्येष्ठ राजकुमाराबरोबर झाला. माझ्या श्वशुरांचे निधन झाल्यानंतर, विवाहानंतर दोन वर्षांनीच मी महाराणी बनले. चंदनाला ज्याप्रमाणे सर्पाच्या विळख्याचा शाप आहे, कमलाला ज्याप्रमाणे शेवाळाचा शाप आहे, त्याचप्रमाणे श्रीमंतांना व उच्च पदस्थांना कुसंगाचा शाप आहे. माझ्या सरल स्वभावी पतिदेवांच्या भोवती अनेक स्वार्थी, कपटी, दांभिक, चाटुकार लोकांचे कडे पडले. त्यांतच ते अडकले. मी जेव्हा त्यांना ताळ्यावर आणण्याचे अनेक प्रयत्न केले तेव्हा माझा काटा कायमचा काढण्याचे प्रयत्नही त्या दुष्टांनी केले. मी कसेबसे ते हाणून पाडले. महाराज माझे काहीसे ऐकू लागले. आमच्या प्रेमवृक्षाला फळ लागण्याचे चिन्ह दिसू लागले, तोच रुग्णशय्येवर पडलेल्या पित्याचे बोलावणे आल्यावरून मी पिताजींकडे गेले. तेथेच वल्लभीवर आलेल्या आपत्तीची वार्ता मला समजली. पावसाळ्यातील नदी जशी वेगाने समुद्राकडे धावते, तशी मी माझ्या पतिराजांना भेटायला निघाले. पण हाय, हाय . . . मी माहेरालाही पारखी झाले आणि पतिगृहालाही अंतरले. दमयंतीला

जसे अजगराने गिळले होते, तसे मलाही दुःखरूप अजगराने गिळून टाकले आहे. हे धरित्री माते, तू सीतेला जसे पोटात घेतलेस तसे मलाही आपल्या पोटात घे. हे धरिणी, तू मला गाडून टाक, पर्वताचे कडे माझ्यावर कोसळू देत आणि माझ्या देहाचा चुराडा होऊन जाऊ दे किंवा या वनाला आग लागू दे आणि तीत मला जळून भस्म होऊ दे."

वृद्धेकडे वळून ती म्हणाली, "आई, तुम्ही माझ्यावर फार फार उपकार केलेत. ते मला जन्मोजन्मी फेडता येणार नाहीत. माझ्या कातडयाचे जोडे शिवून तुमच्या पायात घातले तरी ते फिटणार नाहीत. आता आणखी एक उपकार माझ्यावर करा. ह्या लहानग्या जीवाला तुम्ही सांभाळा आणि तुमच्या वटव्यात एखादी विषारी औषधी असेल तर तेवढी मला द्या, म्हणजे माझी ही दुःखमय जीवनलीला एकदाची संपेल . . . देवा. देवा . . . कायरे तू माझ्या नशिबी हे लिहिलेस !" . . . पुष्पावती एकीकडे असे सगळे बोलत होती आणि मोठमोठ्याने रडत होती. तिला दुःखाचा आवेग येतो आहे असे पाहताच म्हातारी तिच्याजवळ जाऊन बसली व हळूहळू तिचे सांत्वन करू लागली. म्हातारी मोठी अनुभवी होती. त्यामुळे पुष्पावतीला मोकळेपणाने रडताना पाहून तिला थोडे बरे वाटले. कारण दुःख मनातल्या मनात कोंडण्यापेक्षा बाहेर निघणे चांगले असते. परंतु पुष्पावतीचा करुण विलाप ऐकून म्हातारीचेही भान हरपले व तीदेखील रडू लागली. गुहेच्या द्वाराबाहेर दिनेश्वर बसला होता. त्याच्या डोळ्यातून देखील घळघळा अश्रुपात होऊ लागला. कोवळा तरुण हेमंत ते सगळे पाहून फारच बावरला. खिन्न झाला आणि शून्याकडे पाहत बसून राहिला. ते सगळे अरण्य जणूकाही दुःखाच्या आणि

निराशेच्या काळ्याकुट्ट ढगांनी व्याप्त झाले. तोच आकाशात सहस्ररश्मी प्रगट व्हावा त्याप्रमाणे त्या गुहेत प्रचंड वाणी घुमली "महाराजाधिराज गुहादित्यांचा जयजयकार असो !" सगळ्यांनी दचकून वर पाहिले.

गुहेच्या द्वारात साधूमहाराज उभे होते.

## ८ आशीर्वाद

वारा येताच ढग पांगावे त्याप्रमाण साधू महाराजांचे आगमन होताच सगळ्यांची खिन्नता आपोआपच नाहीशी झाली. साधू महाराज गुहेत प्रवेश करून म्हणाले, "देवी, तुझा हा पुत्र अत्यंत शुभ घटकेला जन्मला आहे. हा आपल्या कुलाचे नाव उज्ज्वल करील. आपल्या पराक्रमाने हा सगळा देश हलवून सोडील आणि फार मोठी कीर्ती मिळवील. हा मोठा न्यायी व प्रजावत्सल राजा होईल !"

पुढे होऊन त्यांनी त्या शिशूचे मुखावलोकन केले आणि हातापायावरची लक्षणेही त्यांनी पाहिली. मग ते म्हणाले, "याच्या देहावर सगळी चक्रवर्ती राजाची चिन्हे आहेत. देवी, ह्याचे नीट लालन–पालन व संगोपन करणे हेच आता तुमचे परम कर्तव्य आहे. गतदु:खे आठवून रडत बसणे हे तुम्हाला शोभत नाही. तुम्ही वीरकन्या आहात. वीरपत्नी आहात व आता वीरमाता झाला आहात. पतीच्या निधनाबद्दल दु:ख करण्याचे तुम्हाला काहीच कारण नाही. एक तर ते युद्धात लढता लढता परलोकी

गेले आहेत. वीरगती प्राप्त झालेल्या योद्ध्यासाठी रडणे म्हणजे त्याला अधोगती मिळण्याची इच्छा करण्यासारखे आहे. मागल्या सगळ्या गोष्टी विसरून आता तुम्ही नव्या योजना बनवा. नवी स्वप्ने पाहा, नव्या आशाआकांक्षा धारण करा. आपल्या अतृप्त इच्छा पूर्ण करण्यासाठी पिताच पुत्ररूपाने नवे शरीर धारण करीत असतो हे नेहमी लक्षात ठेवा.

"अहो, या सुलक्षणी बालकाच्या स्वागतासाठी प्रत्यक्ष भगवान सूर्यनारायण सर्व आकाशभर गुलाल उधळीत आहे. सगळे वृक्ष आणि सगळ्या वेली जगभर सुगंध वाटीत आहेत. द्विजगण उंच आकाशात भराऱ्या मारून मोठमोठ्याने त्याची स्तुतिस्तोत्रे गात आहेत. अन्य बालकांना घराबाहेर नेऊन सूर्यदर्शन घडवावे लागते. परंतु ह्या बालकाला पाहण्यासाठी स्वत: सूर्यनारायण लाल लाल किरणांच्या रूपाने ह्या गुहेत आला व ह्या दिव्य बालकाचे दर्शन घेऊन गेला . ."

"आसपासची सगळी सृष्टी ह्याचे प्रेमाने संगोपन करील. तू नुसती पाहत राहा. सगळे योग आपोआप जुळून येतील. उमाकुमार कार्तिकेयाप्रमाणे हा बालकही अल्पवयातच महान सेनापती बनेल. ध्रुवाप्रमाणे तो अढळपद प्राप्त करील व देशदेशांतरात तो आपल्या अपूर्व तेजाने चमकेल. ह्या गुहेत त्याच्या रूपाने आदित्यच उदयाला आला आहे म्हणून मी त्याचे नाव गुहादित्य ठेवले आहे ह्या गुहेत येऊन प्रत्यक्ष आदित्याने त्याचे दर्शन घेतले म्हणून मी त्याचे नाव गुहादित्य ठेवले आहे तो लोकांची हृदयकुहरे आपल्या सद्गुणतेजाने सुप्रकाशित करील म्हणून मी त्याचे नाव गुहादित्य ठेवले आहे. . . . त्याच्या पित्याच्या सर्व वस्तू माझ्याजवळ

सुरक्षित आहेत. योग्य वेळी मी त्या तुला देईन. तू माझ्याजवळ दिलेली सुवर्णभूषणेही तुला हवी तेव्हा व हवी तितकी मिळत राहतील. त्यांचा थोडा थोडा व्यय करून तू येथेच स्वतंत्र रूपाने आपले जीवनयापन कर. काही वर्षे तू येथेच अज्ञातवासात राहा. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. त्याचप्रमाणे भावी राजकुलावंतस गुहादित्यालाही मी शुभाशीर्वाद देत आहे. प्रभू रामचंद्राची तुम्हा दोघांवर नेहमी कृपा असो. तो भगवान एकलिंगजी आपल्या त्रिशूळाने तुमचे सदा संरक्षण करो. बरे आहे. मी येतो आता."

पुष्पावती त्यांना प्रणाम करण्यासाठी उठू लागली. परंतु तिला त्यांनी पडून राहण्यास सांगितले. तिने त्यांच्या समोरच्या जागेवर बोटे टेकविली व ती धूळ आपल्या मस्तकी लावली. त्याच बोटांनी तिने त्या बालकाच्याही कपाळावर स्पर्श केला.

साधू महाराजांच्या आगमनाने व उपदेशाने गुहेतील सगळे वातावरण एकदम बदलले. निराशा नाहीशी झाली व सगळ्यांच्या मुद्रेवर आशेचे हास्य विलसू लागले.

## ९ नवी वस्ती

चिमुकला गुहादित्य दिवसा-मासाने त्या गुहेतच वाढू लागला. काही दिवसांनी हेमंत आणि दिनेश्वर यांनी गुहेच्या आजूबाजूची बरीच जागा साफ केली. तेथे त्यांनी गुरेढोरे पाळली. थोडीशी शेतीही त्यांनी सुरू केली. गुहादित्य चार महिन्यांचा झाल्यावर दिनेश्वर एकदा वल्लभी येथे जाऊन आला. तेथून तो आपल्या

पत्नीला व मुलाबाळांना घेऊन आला. जेथे शीलादित्य महाराजांना दहन केले होते तेथे जाऊन त्याने त्या जागेवरची बरीचशी राख व मातीबरोबर आणली. गुहेसमोर खड्डा खणून त्याने ती राख व माती त्या खड्ड्यात टाकली आणि त्यावर साधेच पण सुंदर असे एक वृंदावन बांधले. मग त्याने त्या वृंदावनात कृष्ण–तुळशीचे एक तेजस्वी रोप आणून लावले. हळूहळू त्यांनी शेती वाढविली व शेतातील काम करण्यासाठी आठ–दहा नोकरही ठेवले. ते नोकर वल्लभीहून आले होते. ते शीलादित्य महाराजांच्या व्यक्तिगत सेनेतील होते. ते सगळे एकनिष्ट, विश्वासू आणि कर्तव्यदक्ष होते. त्यामुळे जमीन चांगली नसूनसुद्धा शेतीचे उत्पन्न चांगले येऊ लागले. लवकरच त्यांनी तेथे एक विहीर खणली. विहिरीला चांगले गोड पाणी लागले. तिच्या आसपास एक लहानशी बाग डोलू लागली.

साधू महाराज स्वत: तेथे कधी येत नसत पण गुहेतील सगळी बातमी रोज त्यांना पोहोचत असे. रोज सकाळी हेमंत त्यांच्या दर्शनासाठी जात असे त्यावेळी साधू महाराज सर्व प्रकारे त्याचे मार्गदर्शन करीत असत. पुष्पावतीचे हिऱ्यामोत्यांचे अनेक मौल्यवान अलंकार त्यांनी अगदी सुरक्षित ठेवून दिले होते. फक्त सोन्याची कडी त्यांनी निराळी ठेवली होती. आवश्यकता पडेल त्याप्रमाणे सोने विकून त्यांनी दिनेश्वराकडे द्रव्य पाठविले होते. त्याचाच उपयोग करून दिनेश्वराने त्या गहन अरण्यात टुमदार वस्ती निर्माण केली. तो सगळा भाग अगदी एका बाजूला होता. त्यामुळे कोणाचेही लक्ष तिकडे जाणे शक्य नव्हते. वल्लभी आणि चंद्रावती दोन्हीही राज्यांच्या सरहद्दीवरील तो भाग होता. गुहादित्याच्या जन्मानंतर महिन्याभरानेच पुष्पावतीच्या वडिलांचा

मृत्यू झाला व त्यानंतर पंधरा दिवसांनी चंद्रावतीवर पर्शियन यवनांनी आक्रमण केले. पुष्पावतीचे सावत्र भाऊ मारले गेले. चंद्रावती नगरी उध्वस्त झाली. यवनांचा एक सेनाधिकारी तेथे राज्य करू लागला. बलाढ्यायनाचा वल्लभी येथे वर्षभरातच खून झाला आणि मग तेथे खुनांची परंपरा सुरू झाली.

दोन्ही राज्यांत अव्यवस्था होती. अन्याय होता. प्रजा नाडली जात होती. जुनी प्रतिष्ठित घराणी धुळीला मिळाली होती. अपमान टाळण्यासाठी आपल्या घरादारांवर पाणी सोडून अनेक लोक लहान लहान खेड्यांत किंवा रानावनांत निघून गेले होते.

## १० वाढदिवस

पुष्पावती जणूकाही आपले सगळे दुःख विसरली होती. ती अगदी साधेपणाने राहत असे. शरीरधारणेपुरते अगदी थोडे व साधे अन्न ती जेवीत असे. ती अगदी कमी बोलत असे. चिमुकल्या गुहादित्याशी मात्र ती खूप बोलत असे. त्याच्याशी तिचे बोलणे कधी प्रगट असे तर कधी अप्रगट असे. त्याला तिने जवळ घेतले किंवा त्याच्याकडे पाहिले तरी ती त्याच्याशी काहीतरी बोलते आहे, आपल्या मनातील काहीतरी सांगते आहे असे वाटे. नेहमी आपली त्याला घेऊन बसली आहे असे तिने कधीच केले नाही. घरातली सगळी कामे ती स्वतः करीत असे. दिनेश्वराने पुष्कळ आग्रह केला. पण तिने आपल्या सेवेसाठी दुसऱ्या कोणाही बाईला आणू दिले नाही. एकदा बाळंतपणातून उठल्यानंतर हेमंतच्या

आईलाही तिने आपली सेवा करू दिली नाही. तिने म्हातारीला स्पष्ट सांगितले, "तुम्ही मला आईप्रमाणे आहात. तुम्ही माझ्यावर फार उपकार केले आहेत. माझ्या आईप्रमाणेच तुम्ही येथे राहावे व वागावे अशी माझी इच्छा आहे. मला आई हवी आहे. दासी किंवा सखी नको. मी राजवाड्यात राहत नाही, वनात राहते. मी आता राणी नाही, एक वनवासिनी आहे. मी माझ्यासाठी जगत नाही, ह्या वंशदीपकासाठी जगते आहे. त्याला मला लाडवायचे नाही, वाढवायचे आहे. तो एकदा मोठा झाला व त्याच्या स्वाधीन त्याचे सगळे काही केले की माझे काम संपले. मग मी या वृंदावना-जवळच चिरनिद्रा घेईन." तेव्हापासून म्हातारीने तिला अहो जाहो म्हणणेसुद्धा बंद केले. एखादे पोटापुरते मिळवणारे शेतकऱ्याचे कुटुंब असावे तसे ते सर्वजण राहू लागले.

लवकरच गुहादित्य गुहेबाहेर पडून अंगणात खेळू लागला. काही दिवसांनी त्याला अंगणही अपुरे पडू लागले. मग तो दिनेश्वराबरोबर त्याच्या कडेवर किंवा खांद्यावर बसून शेतात जाऊ लागला. हेमंताबरोबर खूप दंगामस्ती करू लागला. तो तीन वर्षांचा झाला तेव्हा दिनेश्वराने त्याच्याकरिता मोठे किमती जरीचे कपडे आणले. ते त्याने पुष्पावतीसमोर ठेवले. पुष्पावतीला एकाएकी चकित व आनंदित करण्याचा त्याचा हेतू होता. पण ते कपडे पाहिल्याबरोबर पुष्पावती फार गंभीर झाली. ती म्हणाली, "दिनेश्वरदादा, हे कपडे जेथून आणले तेथे परत करा किंवा गुहिलबालकाच्या वाढदिवसानिमित्त कोणाला तरी दान करा परंतु हे कपडे त्याच्या अंगावर चढवू नका. अशा कपड्यांची त्याला सवय लागू नये व त्यांचे आकर्षण वाटू नये यातच त्याचे व सर्वांचे हित आहे."

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

दिनेश्वर म्हणाला, "आपल्या इच्छेप्रमाणेच सगळे होईल. ते कपडे मी परत करीन. मला फार घाई झाली. वाटले, असे कपडे घालून कमरेला चिमुकली तलवार लटकावून कुमार घोड्यावर बसले तर किती बरे सुंदर दिसतील ? म्हणून लगेच मी कपडे व तलवार घेऊन आलो."

पुष्पावती म्हणाली, "दिनेश्वरदादा, मनुष्य कर्तृत्वाने सुंदर दिसतो, कपड्याने नव्हे. खोटे, उसने आणि कृत्रिम सौंदर्य अल्प-काळात नष्ट होते. आंतरिक गुणांमुळे मुद्रेवर जे तेज दिसते ते चिरकाल टिकते. मला वाटते वाढदिवसानिमित्त तुम्ही एक नियम करावा. रोज सकाळी व संध्याकाळी गुहिलला घोड्यावर बसवून बाहेर न्यावे."

वाढदिवसाच्या दिवशी सकाळी पुष्पावतीने आपल्या बालकाला मंगलस्नान घातले. मग स्वतः स्नान करून शुचिर्भूत होऊन ती त्याला घेऊन वृंदावनापाशी आली व हात जोडून उभी राहिली. गुहिलही तिच्याच शेजारी हात जोडून उभा राहिला. कितीवेळ तरी ती मनोमन प्रार्थना करीत होती. ती जणू निरा-ळ्याच जगात गेली होती. शेवटी ती गुहिलला म्हणाली, "बाळा, डोके टेकून प्रणाम कर." गुहिलने प्रणाम केला. मग ते दोघेही गुहेत परत आले. त्या दिवशी जेवायला रोजच्याप्रमाणेच भाजी-भाकर होती. फक्त गुहिलला एक गुळाचा खडा वाढण्यात आला. पुष्पावतीने गोड खाणे कधीच बंद केले होते.



त्या दिवशी संध्याकाळी गुहिलला घोड्यावर बसवून दिनेश्वर त्याला फिरायला घेऊन गेला. नदीकाठी एक लहानसे जुने मारुतीचे मंदिर होते. त्याचे दर्शन घेऊन ते मामा–भाचे परत आले. मग अंगणात आल्यावर दिनेश्वराच्या पत्नीने गुहिलला ओवाळले व बरोबर आणलेले गोडधोड त्याला खायला घातले. अशा रीतीने गुहिलचा तिसरा वाढदिवस साजरा झाला. चवथ्या वाढदिवसाला

त्याला एक चिमुकली तलवार देण्यात आली. पाचव्या वाढदिवसाला त्याला एक धनुष्यबाण मिळाला. सहाव्या वाढदिवसाला त्याला एक चांगला भाला देण्यात आला. सातव्या वाढदिवसाला त्याने रानात जाऊन शिकार केली.

## ११ मारामारी

नंतर तो एकटाच रानावनात हिंडू लागला व उंच कडेकपारी चढू लागला. अनेकदा तो झऱ्याकाठी जाऊन बसत असे. एकदा तेथे बसल्या बसल्या त्याची दृष्टी मारुतीच्या मंदिराकडे गेली. ते मंदिर पडले होते. त्याच्या भिंती खचल्या होत्या. छपराला जागोजागी छिद्रे पडली होती. मंदिरात सगळीकडे पाला-पाचोळा साचला होता. गुहिलच्या मनात विचार आला आपण हे मंदिर चांगले बांधावे. लगेच तो उठला आणि भिंतीच्या खाली पडलेल्या शिळा उचलू लागला. त्याने दोन–चार शिळा उचलल्या नसतील तोच तिकडून एक मुलगा आला. तो गुहिलपेक्षा दोन–तीन वर्षांनी मोठा होता. तो गुहिलला म्हणाला, "हे आमचे मंदिर आहे. तू येथे काय करीत आहेस ? हे दगड तू कशासाठी काढले आहेस ? देवापुढचा प्रसाद काय झाला ?"

गुहिल म्हणाला, "प्रसादाविषयी मला काही एक माहीत नाही. ह्या मंदिराच्या भिंतीचे निखळलेले दगड मी पुन्हा जमविण्याचा प्रयत्न करीत होतो."

तो मुलगा म्हणाला, "मला माहीत आहे. तूच येथला प्रसाद खाल्ला आहेस. रोज येऊन तूच खाऊन जातोस. तू चोर आहेस."

त्याच्या तोंडातून चोर हा शब्द बाहेर पडताच गुहिलने फाडकन् त्याच्या थोबाडीत मारली व तो त्याला म्हणाला, "असे काही बोलशील तर लक्षात ठेव, याहूनही अधिक मार मिळेल."

गालावर झणझणीत थप्पड बसल्यामुळे तो मुलगा क्षणभर सुन्न झाला. पण मग त्याच्या लक्षात आले की, आपण मोठे आहोत आणि हा लहान आहे. हा आपले काय करू शकणार आहे ? तेव्हा तो पुढे सरकला आणि हाताची बुक्की बांधून गुहिलच्या नाकावर ठोसा मारण्याचा त्याने प्रयत्न केला. पण गुहिल सावध होता. गुहिलने त्याचा तो हात वरच्यावर पकडला आणि खाली आणून पिरगळला. त्या मुलाने आपला हात झटका मारून सोडवून घेतला. मग तो पुन्हा गुहिलच्या अंगावर धावून आला व दोघांची झोंबाझोंबी सुरू झाली. दोघांनीही एकमेकांच्या हातात पंजे अडकविले व ते उलट सुलट फिरवून पाहिले. करकचून आवळून पाहिले. मग रेटारेटी सुरू झाली. असे होता होता योग्य वेळ पाहून गुहिलने एक गिरकी घेतली आणि त्या मुलाला पाठीवर घेऊन दाणकन् खाली आपटले. तो त्याच्या छातीवर बसला व एकसारखे त्याला मारीत सुटला. तो आता रागाने बेभान झाला होता. पण एकाएकी त्याचे लक्षात आले की, त्या मुलाच्या डोक्यातून रक्त वाहत आहे. तेव्हा त्याने त्याला सोडले. तो म्हणाला, "ऊठ, तुझ्या डोक्यातून रक्त वाहत आहे. तुझे डोके दगडावर आपटले असेल." गुहिलने त्याला सोडले. तो मुलगा उठला. गुहिल त्याला घेऊन झऱ्यावर गेला. त्याने त्याची जखम धुतली. रक्त थांबविणारी एक वनस्पती त्याला माहीत होती. लगेच त्याने ती शोधली. ती सापडताच त्याने तिचा पाला ओरबाडला व हातावर चोळून

त्याचा रस काढला. त्याने तो रस जखमेवर लावला आणि त्यावर थोडासा चुरगळलेला पाला दाबून दिला.

एवढे सगळे झाल्यावर तो मुलगा ताडकन् उठला आणि त्याने गुहिलच्या पाठीत जोराचा गुद्दा मारला व हरणाच्या गतीने तो दूर पळून गेला आणि तेथून ओरडला, "लक्षात ठेव, तू मला मारले आहेस, याचा वचपा काढल्याशिवाय मी राहणार नाही !"

गुहिल थोडा वेळ त्याच्याकडे पाहत राहिला. मग शांतपणे पावले टाकीत तो आपल्या घराकडे निघाला.

## १२ शत्रू म्हणून आले पण मित्र झाले

दुसऱ्याच दिवशीची गोष्ट. सकाळचा आपला अभ्यास झाल्यानंतर गुहिल स्नानासाठी झऱ्यावर गेला. तो आता कपडे काढून झऱ्यात उतरणार इतक्यात आठ–दहा मुलांची एक टोळी आरडाओरडा करीत आपल्याकडे येत आहे असे त्याला दिसले. तो थांबला व त्यांच्याकडे पाहू लागला. त्यांच्यापैकी कोणाच्या हातात काठ्या होत्या तर कोणाच्या हातात दगड होते. कालचा तो मुलगाही त्यात होता. तो मोठ्याने म्हणाला, "हाच तो, हाच तो . . . चला ठोका याला." "ठोका, मारा" असे ओरडत ते सर्वजण पुढे धावले व त्यांनी गुहादित्याला घेरले.

गुहादित्य त्या सगळ्यांच्या मध्यभागी न घाबरता उभा राहिला. छातीं पुढे काढून त्याने सगळ्यांकडे एकदा नीट पाहून घेतले. त्याचे पाय वाटेल तिकडे उडी मारण्याकरिता तयार होते आणि त्याचे हात पडलेला मार वरच्यावर झेलण्यासाठी आणि दुसऱ्यांच्या हातातील काठ्या हिसकण्यासाठी शिवशिवत होते.

त्याने एकदा आपल्या भेदक नजरेने सगळ्यांना मोजून घेतले आणि मग तो त्यांच्याकडून आक्रमण होण्याची वाट पाहू लागला.

क्षणमात्र ती सगळी मुले चकित झाली. त्यांना असे वाटले होते की, आपण इतकेजण आहोत, आपल्या हातात काठ्या आहेत. तेव्हा आपल्याला पाहताच हा पोरगा घाबरेल, रडेल, गयावया करील. मग आपण त्याला हवे तसे मारू, ठोकू व त्याची अगदी फटफजिती करू. पण तो तर मुळीच घाबरला नाही. उलट त्याच्या डोळ्यात अशी काही चमक दिसत होती की, ती पाहून त्यांच्यापैकी काही मुलांना क्षणमात्र भीती वाटली. पण हा एकटा आपणा सर्वांपुढे काय टिकणार आहे, अशा कल्पनेने त्यांच्या मनातील ती भीती तावडतोब नाहीशी झाली.

त्यांच्यापैकी सर्वांत मोठा मुलगा कमरेवर दोन्ही हात ठेवून म्हणाला, "काय रे, तू कोण आहेस ?" गुहिल म्हणाला, "माझे नाव गुहादित्य आहे." तो मुलगा पुन्हा म्हणाला, "तुझ्या वडिलांचे नाव काय आहे ?"

गुहिल म्हणाला, "ते मला माहीत नाही."

ते उत्तर ऐकताच सर्वजण मोठ्याने हसले. ते त्यांचे हसणे खोचक, बोचक आणि उपहासाने परिपूर्ण होते.

आपले काय चुकले हे लक्षात न आल्यामुळे गुहिल किंचित गांगरला.

त्या मोठ्या मुलाने म्हटले, "तू काल चोरी करून वर आणखी आमच्या केशवदासाला मारलेस."

गुहिल म्हणाला, "त्याने मला आधी विनाकारण मारले म्हणून मी त्याला मारले. मी चोरी केली नाही."

केशवदास म्हणाला, "केली." तो मोठा काळा मुलगा म्हणाला, "केली." तिसराही मुलगा ओरडला, "केली."

गुहिल म्हणाला, "नाही, नाही, नाही."

सर्वजण एकदम ओरडले, "तू चोरी केलीस आणि केशवदासाला मारलेस." लगेच त्या काळ्या मोठ्या मुलाने काठी उगारली व त्याने गुहादित्यावर जोराचा प्रहार मारला. पण चित्त्याच्या चपळाईने गुहादित्य बाजूला झाला व जवळच्याच एका मुलाला खस्‌दिशी ओढून त्याने त्याला पुढे ढकलले. तेव्हा त्या मोठ्या मुलाची काठी त्याच्याच मित्राच्या खांद्यावर बसली.

गुहादित्याने आता तिसऱ्याच मुलाकडे झेप घेतली व काय होते आहे हे त्याला कळण्याच्या आत त्याच्या हातातली काठी गुहिलच्या हातात आली. गुहिलने त्या काठीने दोन मुलांच्या पाठीत असे जोराचे दणके घातले की ती ओय् ओय् करीत घराकडे पळाली. मग केशवदास आणि तो मोठा मुलगा आपापल्या काठ्या सरसावून गुहिलवर तुटून पडले. पण गुहिल चट्‌दिशी बाजूला झाला आणि त्यांच्या काठ्या जमिनीवर आपटल्या. गुहिलने काठीवर उडी मारून मोठ्या मुलाच्या हातातील काठी खाली पाडली व त्याच्या छातीवर इतक्या जोराने लाथ मारली की तो कोलमडत मागे जाऊन पडला. तेवढ्यात वेळ साधून केशवदासाने गुहिलवर मार केला. पण गुहिलने आपल्या काठीने त्याचा तो मार वरच्यावर उडवला व उलट त्याच्या पायावर मार मारला. तो तडाखा इतक्या जोराचा होता की केशवदास कळवळून मटकन् खालीच बसला.

आपल्यातल्या मोठ्या दोघांची अशी स्थिती झालेली पाहून व दुसरे दोघे आधीच पळाले आहेत हे लक्षात घेऊन, उरलेली सहा

मुले बुचकळ्यात पडली. काय करावे, काय न करावे असा ती विचार करू लागली.

गुहिल त्यांना म्हणाला, "तुम्ही घाबरू नका. जो माझ्यावर हात उचलणार नाही, त्याला मी कधीही मारणार नाही. जो माझी क्षमा मागेल त्यालाही मी मारणार नाही." त्या सहाही लहान मुलांच्या मनातील भीती कमी झाली व ती दोन पावले पुढे सरकली आणि लक्ष देऊन गुहिलचे म्हणणे ऐकू लागली.

गुहिल म्हणाला, "काल माझ्या मनात असा विचार आला की हे मारुतीचे मंदिर पडले आहे. ते आपण पुन्हा नीट बांधावे, हा काय वाईट विचार आहे?"

ती मुले म्हणाली, "मुळीच नाही."

भिंतीचे निखळलेले काही दगड मी पुन्हा नीट बसविण्याचा प्रयत्न करू लागलो. हा काय अपराध आहे? ही काय चोरी आहे?"

ती मुले म्हणाली, "छे मुळीच नाही. एवढ्यावरून का केशवाने तुझ्याशी भांडण केले?" तो मोठा मुलगा ओरडून म्हणाला, "केशव, तू मला काहीतरी खोटेनाटे सांगितलेस आणि विनाकारण या भांडणात मला पाडलेस. थांब, मी तुलाच चांगला ठोकून काढतो. ती मुले म्हणाली, "होय, होय. आपण या केशवलाच मारू या."

पळण्यासाठी म्हणून केशवदासाने एक पाऊल पुढे टाकले. पण "अ या ई ग" अशी मोठ्याने किंकाळी फोडून तो मट्कन खाली बसला. त्याचा एक पाय लाठीच्या मारामुळे दुखत होता व

दुसऱ्या पायात भला मोठा काटा गेला होता. गुहिल चटकन् पुढे झाला. त्याने केशवदासचा तो काटा मोडलेला पाय आपल्या मांडीवर घेतला व मोठ्या युक्तीने तो संपूर्ण काटा उपटून काढला.

## १३ गुहादित्याचे शिक्षण

त्या दिवसापासून ते दाहीच्या दाही जण गुहादित्याचे परममित्र आणि परमभक्त बनले. केशवदास आणि मोहनदास, गुणाकर आणि सुधाकर हे भाऊ–भाऊ होते. त्यांचे वडील गावात पुरोहिताचे काम करीत असत. महेंद्र सुताराचा मुलगा होता, तर वचनेश आणि करुणेश शेतकऱ्यांची मुले होती. अर्जुनसिंह आणि दिलीपसिंह ही दोघे ठाकुराची मुले होती. त्यांचे वडील पूर्वी प्रमारांच्या सेनेत होते. परंतु प्रमारांचे राज्य मोडकळीस आल्यामुळे ते खेड्यात येऊन राहिले होते व शेती करीत होते. अक्षयकुमार हा गावातील न्हाव्याचा मुलगा होता. त्या सर्वांची गुहादित्याशी फारच गट्टी जमली. गुहादित्याच्या म्हणण्याप्रमाणे सर्वांनी देवालयाचा जीर्णोद्धार करायचे ठरविले.

रोज सकाळी गुहिलला शिकवायला साधू महाराजांनी पाठविलेले पंडितजी येत असत. ते सूर्योदयाच्या सुमारास येत असत. ते येण्यापूर्वी गुहिलचा स्नान, व्यायाम इत्यादी कार्यक्रम आटोपलेला असे. व्यायामाच्या वेळी दिनेश्वर व हेमंत उपस्थित असत. ते गुहिलकडून नियमाने व्यायाम करवून घेत. ते त्याला निरनिराळी शस्त्रे कशी चालवावीत ते शिकवीत व त्यांचा नीट

अभ्यास करवून घेत. युद्धाचे शिक्षण देताना त्याचा प्रतिस्पर्धी म्हणून हेमंत समोर उभा राहत असे. हेमंतने जर नीट मार मारला नाही किंवा हळू मारला तर पुष्पावती रागावत असे. हळूहळू गुहादित्य हेमंताशी अगदी बरोबरीने लढू लागला. त्याचे चापल्य पाहून दिनेश्वर फार प्रसन्न होत असे व वारंवार प्रशंसेचे उद्‌गार काढीत असे. पण त्या बाबतीत पुष्पावती काहीही बोलत नसे. गुहादित्याने कितीही कौशल्य दाखविले तरी ती नुसती पाहत राहायची. केव्हा केव्हा ती दिनेश्वराला म्हणायची, "हं पुरे झाली तुमची स्तुती. त्याचा अभ्यास मला येथे थांबवायचा नाही. त्याला अजून कितीतरी पुढचा टप्पा गाठायचा आहे."

सूर्योदय झाला की, घटकाभर गुहिलला विश्रांती मिळत असे. त्या वेळी तो थोडेसे खाणे–पिणे करून घेई. यावेळी पंडितजी पूजा करीत असत. पूजा आटोपली की ते एका आंब्याच्या झाडाखाली जाऊन बसत. गुहादित्य आपले दर्भासन घेऊन त्यांच्याजवळ जाई व त्यांच्या चरणी मस्तक टेकवून त्यांना प्रणाम करी. मग त्याचे शिक्षण सुरू होई.

पंडितजी रोज त्याच्याकडून लिहून घेत असत गणित, इतिहास व संस्कृत हे तीन विषय ते मुख्यत: शिकवीत असत. याशिवाय ते त्याच्याकडून संस्कृत सुभाषिते पाठ करवून घेत असत. रोज ते त्याला एखादी बोधपूर्ण गोष्ट सांगत असत. पंचतंत्र, हितोपदेश, कथासरित्सागर वगैरे अनेक कथांचे ग्रंथ पंडितजींना अगदी तोंडपाठ होते. ते त्या कथा फार रंगवून सांगत असत. एकदा त्यांच्या तोंडून कथा ऐकली की, गुहादित्याच्या ती अगदी हृदयात ठसत असे. कथेनेच त्या लहानशा शाळेची सुट्टी होत असे.

मग दिवसभर गुहादित्यामागे कोणत्याही कामाचे बंधन नव्हते. केशवदास वगैरे मुलांशी मैत्री जमल्यावर शिक्षणाचा कार्यक्रम आटोपल्यावर तो झऱ्यावर येत असे. तेथे त्याचे सगळे मित्र आधीच उपस्थित असत. त्यांनी बहुधा मंदिराचे काहीतरी काम सुरू केलेले असे. गुहादित्य येताच ते सगळे त्याच्याभोवती जमत व त्याच्या तोंडून काहीतरी ऐकत. अनेकदा पंडितजींनी थोडयाच वेळापूर्वी सांगितलेली गोष्ट तो त्यांना सांगत असे. सुमारे एक–दीड घटका त्यांचे खेळीमेळीचे बोलणे झाले की मग ते सर्वजण मंदिराच्या कामाला लागत.

## १४ मंदिर बांधले गेले

लवकरच त्या मुलांनी फार मोठी योजना बनविली. हळूहळू त्यांनी गावातून सगळी साधनसामग्री जुळविली. वाळू, चुना, दगड यांचे ढीग तेथे येऊन पडले. मुलांनी गावातल्या एका म्हाताऱ्या गवंडयाला तयार केले. तो म्हणाला, "तुम्ही मुले जर एवढ्या उत्साहाने काम करीत आहात तर मीदेखील पैसे न घेता काम करीन. ही देवाची सेवा आहे. सगळ्यांनी ती अहमहमिकेने काहीएक न घेता केली पाहिजे. खरे पाहिले असता आम्ही मोठ्यांनीच हे काम करायला पाहिजे होते. पण आता कालमहिमा असा आहे की, मोठ्यांची बुद्धी नाहीशी झाली आहे. तुम्हा बालकांच्या मुखाने देवच बोलतो आहे असे मी समजतो. तुम्ही मागाल ते साहाय्य मी तुम्हाला विनामूल्य देईन."

तो म्हातारा शिल्पकार रोज तेथे येऊन बसायचा. तो सांगेल त्याप्रमाणे मुले दगड, चुना वगैरे साहित्य आणत व तो सांगील तसे ठेवीत. हळूहळू खोल पाया भरला गेला.

ही बातमी गावात पसरली. गावातील लोक सढळ हाताने मदत करू लागले. लहान मुलेही खूप जमू लागली. ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणे ज्याला त्याला काम मिळू लागले. आळशासारखे बसून राहण्यापेक्षा किंवा रिकाम्या टिवल्या बावल्या करण्यापेक्षा काम करण्यात व अंगातून घाम गाळण्यात फार मोठा आनंद असतो, हा एक नवाच प्रत्यय सगळ्या गावाला आला.

जी मुले आपल्या घरी इकडची काडी तिकडेही करीत नसत किंवा दहादा आईबाप ओरडल्यावर एखादे काम करीत असत, ती मुले येथे तासन्तास कामे करू लागली. आता पुरे, आता सगळेजण घरी जा, असे वारंवार मुलांना सांगावे लागत असे. मग मुलांनी म्हणावे, "आणखी थोडे करू या. इतकेच तर राहिले आहे, ते संपवून मग घरी जाऊ या."

जे दगड कोणाच्यानेही हलवले जात नव्हते असेही दगड त्या मुलांनी सहज लीलेने उचलावेत व धर्मा गवंडी सांगील तेथे नेऊन ठेवावेत. काम करताकरता नाना प्रकारचे हास्य-विनोद चालत, गंमती-जमती होत. अनेकांना लागत असे. अंग ठेचाळत किंवा खरचटत असे. पण सगळे शारीरिक दुःख त्या आनंदी वातावरणाचा स्पर्श होताच नाहीसे होई. सहज बोलता बोलता कधीकधी तात्त्विक विचारही आपोआप प्रगट होत.

पाया भरीत असताना एकजण म्हणाला, "अहो, हे पायातले दगड आहेत. हे चांगले मजबूत व भार सहन करण्यायोग्य असले पाहिजेत. यांनी आपल्या जागी पक्के बसले पाहिजे.

दुसरा म्हणाला, "शतकानुशतके यांना अंधारात राहावे लागेल. यांचे नावगावही कोणाला कळणार नाही. हे कोणाला दिसणार नाहीत. यांची कोणी स्तुती करणार नाही. यांना कोणी रंग देणार नाही. सर्वांत वर चमकणाऱ्या कळसाला पाहून लोक आदराने प्रणाम करतील. पण तो कळस या पायावर उभा आहे हे मात्र कोणीही लक्षात घेणार नाही."

तिसरा म्हणाला, "समजा, एखादा पायातील दगड म्हणाला की, मला आत फार गार वाटते आहे किंवा उकडते आहे किंवा गुदमरल्यासारखे होते आहे. बाहेरची मोकळी हवा घ्यावी अशी माझ्या मनात इच्छा उत्पन्न झाली आहे. जगातील मौज आम्ही का पाहू नये ? आम्ही एवढा भार आजपर्यंत सहन केला. आता आम्हाला मौज करण्याचा अवश्य अधिकार आहे, असे म्हणून त्याने जर बाहेर डोकावून पाहिले तर ? . . . . तर सगळे मंदिर कोलमडून पडेल."

दगडांचे कोनेकोपरे छाटले जात होते. त्यांना एका ओळीत बसविले जात होते. त्यांच्यामध्ये चुना ओतला जात होता. भिंती झपाट्याने वाढत होत्या. चारही भिंती उभ्या झाल्या. खिडक्या–दारेही बसविली गेली. मोठा सभामंडप तयार झाला. मंदिराच्या बाजूला आखाडा बांधण्यात आला. त्या आखाड्यात सकाळ–संध्याकाळ येऊन गावातली मुले व्यायाम करू लागली. हनुमान-जयंतीच्या दिवशी तेथे फार मोठा उत्सव साजरा झाला. आस-पासच्या गावांतील लोकही तेथे आले. ते रमणीय, सुंदर स्थान पाहून सगळ्यांनी आश्चर्य व्यक्त केले. पण त्याहीपेक्षा विशेष म्हणजे त्या स्थानावर येताच लोकांच्या अंगात नवे वारे संचारत

असे. तेथे नवी प्रेरणा मिळत असे. हे मोठे जागृत देवस्थान आहे असे सर्वजण बोलू लागले.

## १५ वानरसेना

गुहिल जसजसा मोठा होऊ लागला तसतसा तो शांत व विचारी बनला. तो स्वत: कधीही कोणावर अन्याय करीत नसे व अन्य कोणावरही होऊ देत नसे. एकदा गावातील दर्शनसिंह नावाच्या ठाकुराने अर्जुनसिंहाच्या घरच्या गाई पळविल्या. मग दोन्ही घरांत कडाक्याचे भांडण जुंपले. दोन्हीकडचे लोक जमा झाले. दर्शनसिंह तरुण, साहसी, बलवान व धनवान असल्यामुळे त्याच्याकडून पन्नास माणसे गोळा झाली. अर्जुनसिंहाचे वडील म्हातारे व धनहीन असल्यामुळे त्यांच्याकडून बोलणारे दहा–वीसच लोक जमले. दोन्ही पक्षांत खूप बाचाबाची होऊन प्रकरण हातघाईवर आले. तेवढ्यात अक्षयकुमार गुहादित्याकडे धावत गेला आणि त्याने त्याला सर्व हकिगत सांगितली. ती ऐकताच गुहादित्य धावत निघाला व घटनास्थळी येऊन पोहोचला. मारामारी सुरू झाली होती. दोन्हीकडचे लोक आवेशाने लाठ्या चालवीत होते. फुलांच्या ताटव्याखालून फिरावे इतक्या सहजपणे गुहादित्य त्या गर्दीत शिरला आणि मध्यभागी जाऊन जोराने ओरडला, "थांबा." त्या आवाजात अशी काही धार होती की, सगळेजण आपोआप स्तब्ध झाले. सगळ्यांचे हात थांबले. एवढा बलदंड व उद्दंड दर्शनसिंह पण तोदेखील क्षणमात्र चपापला व थांबला. मग त्याच्या लक्षात आले, हा तर तो गुहेत राहणारा कोवळा पोरगा आहे. याला भिणे आपल्या आजपर्यंतच्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही.

तो गुहादित्याला म्हणाला, "पोरा, तू येथे कशाला आलास ? तू आपल्या त्या देवळात जाऊन बैस. तेथे काय पूजा करायची ती कर. गावातल्या भांडणात तुला पडण्याचे काहीएक कारण नाही."

गुहादित्य म्हणाला, "काकाजी, तुम्ही सगळे रामचंद्राचे वंशज आहात. तुम्ही आम्हाला आदरणीय आहात. पण तुम्ही जर असे आपसात भांडू लागलात तर आम्ही मुलांनी कोणता धडा शिकायचा ? काकाजी, तुमच्यासारख्या पराक्रमी माणसाला घरात भांडत बसणे शोभत नाही. जवळ एवढा पैसा असताना दुसऱ्याची गाय चोरण्याची बुद्धी तुम्हाला व्हावी हेही काही चांगले नाही."

दर्शनसिंह रागावून म्हणाला, "पोरा, वटवट बंद कर. मुकाटयाने येथून चालता हो. नाहीतर थांब. आधी तुझेच टाळके फोडतो." असे म्हणून त्याने लाठी उगारली. पण ती त्याला खाली आणताच आली नाही. कारण तेवढ्यात तो लहान मुलांच्या प्रचंड गर्दीने घेरला गेला. मुलांनी त्याला खाली पाडले. कोणी त्याचे हात धरून ठेवले, तर कोणी त्याचे पाय गच्च आवळले. कोणी त्याच्या पोटात काठ्या टोचल्या, तर कोणी त्याच्या छातीवर बसले. हे सर्व निमिषार्धात घडले. गुहादित्य गावात आल्याची वार्ता अक्षयकुमाराने गावातल्या दोन–चार मुलांना सांगितली. मग वाऱ्याच्या वेगाने ती बातमी सगळीकडे पसरली. पिसाटा-सारखी मुले धावत सुटली आणि तेथे जमली. दर्शनसिंहाची दुरुत्तरे ऐकताच ती संतापली आणि त्यांनी त्याला खाली पाडले.

आपण दाणकन् कसे खाली आपटलो हे दर्शनसिंहाला कळेना. त्याने उठण्याचा प्रयत्न केला पण त्याला उठता येईना. त्याचे बळ मुळीच चालेना. वानरसेनेने एखाद्या प्रचंड राक्षसाचा

पराभव करावा आणि त्याच्या छातीवर नाचावे तसे ते दृश्य दिसत होते.

गुहादित्य पुन्हा मोठ्याने गरजला, "काकांना सोडा, त्यांना त्रास देऊ नका." त्याबरोबर सगळी मुले दूर झाली.

## १६ भगवान एकलिंगजीच अवतरले

दर्शनसिंह उठून उभा राहिला. त्याने आपले कपडे झटकले व चहूकडे पाहिले. त्याला मुलांनी गराडा घातला होता. गंमत अशी की, त्यांत त्याची स्वत:चीही दोन मुले होती. आपले ह्या मुलांपुढे काहीएक चालणार नाही हे त्याने ओळखले. आपल्या झालेल्या फजितीचा बदला काढण्याचा निश्चय करून तो तणतणत निघून गेला. पण घरी गेल्यावर त्याला आढळले की त्याच्या मुलांनी ती चोरलेली गाय ज्याची होती त्याच्या घरी नेऊन बांधली होती. त्याची बायको व लहानमोठी चारही मुले त्याला नानाप्रकारे नावे ठेवीत होती.

त्याची बायको त्याला म्हणाली, "आपल्या घरात काय कमी आहे म्हणून तुम्हाला असे वाईट काम करण्याची बुद्धी झाली आणि तुम्ही म्हणे त्या गुहिल महाराजांच्या अंगावर धावून गेलात."

दर्शनसिंह रागाने म्हणाला, "कुठला गुहिल महाराज ?"

त्याची बायको म्हणाली, "ते गुहेत राहतात ते. त्यांनी मोठे मारुतीचे मंदिर बांधले. तुम्हाला ते माहीतही नाहीत ?"

दर्शनसिंह म्हणाला, “तो अहंकारी पोरटा? त्याच्या बापाचा पत्ता नाही की कुळाचा पत्ता नाही. त्याने उनाड मुलांना आपल्या नादी लावले आहे आणि तुमच्यासारख्या मूर्खांना वेडे केले आहे. तो एकदा माझ्या तडाख्यात सापडूच दे. मी त्याचा पार निकाल लावल्याशिवाय राहणार नाही.”

अत्यंत भयभीत होऊन त्याच्या वायकोने कानावर हात ठेवले व ती म्हणाली, “बाई . . . बाई . . . हे तुम्ही काय बोलताहात? त्यांच्या रूपाने स्वत: भगवान एकलिंगजी त्या गुहेत प्रगट झाले आहेत. असे म्हणतात की, पार्वतीदेवी येऊन त्या बाईला बजावून गेली की, बाई, मी माझा नवरा तुझ्या स्वाधीन केला आहे. त्याला नीट सांभाळ. तो जगाचा उद्धार करण्यासाठी पृथ्वीवर अवतरला आहे. तुम्ही म्हणता तो मुले बिघडवतो. अहो, त्याच्या संगतीत घटका दोन घटका राहताच पापी मनुष्य पुण्यवान होतो. मनातले सगळे वाईट विचार नाहीसे होतात. मनुष्य आपोआप चांगली कामे करू लागतो. अहो, हे गाव म्हणजे वाईट मुलांचे आगर होते. पण त्या सगळ्यांना त्याने अगदी बदलवून टाकले. स्वत: तुमची मुले किती घाणेरडी होती? कोणती व्यसने त्यांना नव्हती? आणि कोणते दुराचरण ती करीत नव्हती? चोऱ्या आणि मारामाऱ्या करण्याचा धडा तर त्यांना घरीच मिळाला होता. ती माझी वाया गेलेली मुले कशी एकदम सुधारली. देवासारखी बनली. ईश्वर त्या महात्म्याला उदंड आयुष्य देवो . . तुम्ही त्याच्याविषयी वाईट बोललात यावरून मला असे वाटते की, आपल्यावर काहीतरी भयंकर संकट ओढवणार आहे.

दर्शनसिंह आपल्या पत्नीचा तो आवेश पाहून चकित झाला. आजपर्यंत त्याच्यापुढे कुणाचीच काही बोलण्याची प्राज्ञा नव्हती.

आज दुपारपासूनच सगळे उलटेपालटे होत आहे असे त्याला वाटले. मग ते सगळे सुलटे करण्याचा एकमात्र उपाय त्याच्याजवळ होता. तो म्हणजे मदिरा. त्याने मदिरेची सुरई काढली आणि प्यालयावर प्याले रिकामे केले. खूप झिंगल्यावर तो तेथेच आडवा झाला.

## १७ दर्शनसिंह आंधळा झाला

मध्यरात्रीच्या सुमाराला एकाएकी दर्शनसिंहाच्या घराला आग लागली. हा हा म्हणता ती सगळीकडे पसरली. मुले–माणसे कशी तरी बाहेर पडली. मोठ्या प्रयत्नाने थोडीशी गुरेढोरे वाचली व काहीसे सामान बाहेर निघाले. पण स्वत: दर्शनसिंह कोठे होता ? तो घरी होता की नव्हता ? त्याचा कोठेच पत्ता लागेना.

दर्शनसिंहाची पत्नी मोठमोठ्याने रडू लागली व म्हणाली, "अहो, ते आतच आहेत. मदिरा पिऊन, धुंद होऊन ते मागल्या ओसरीत पडले होते. शोधा हो कोणीतरी त्यांना. काढा हो त्यांना बाहेर, नाहीतर थांबा, मीच आत जाते आणि त्यांच्याबरोबर आपली जीवनयात्रा संपविते. अहो ते आत आहेत. नक्की आतच आहेत."

लोकांनी तिला कसेबसे धरून ठेवले व आगीत जाऊ दिले नाही. तिचा आक्रोश ऐकून सगळ्यांच्या अंत:करणांना पाझर फुटत होता. पण आग इतकी भयंकर होती की, आत शिरण्याची कोणाचीही हिंमत झाली नाही.

तेवढ्यात अर्जुनसिंह आणि दिलीपसिंह दोघेही तीरासारखे आत शिरले. त्यांच्या हातात काठ्या होत्या. त्यांच्या साहाय्याने ते

आगीपासून स्वत:चे कसेतरी संरक्षण करीत होते. दोन, तीन दालने ओलांडून ते आत गेले. कोठे निखारे पडले होते तर कोठे ज्वाला भडकत होत्या. कोठे धूर कोंदटला होता तर कोठे ऊन राख पडत होती. अंगाला चटके बसत होते. समोरचे स्पष्ट दिसत नव्हते. डोळ्यांतून पाणी वाहत होते. श्वास घेणेसुद्धा कठीण झाले होते. पण या सगळ्या संकटांची पर्वा न करता ते दोघे सिंहाचे छावे तसेच पुढे चालले होते. तेवढ्यात त्यांना धुरातून एक आकृती येताना दिसली. ते ओरडले, "काका, काका . . . इकडे या, लवकर निघा." दर्शनसिंह अडखळत, चाचपडत पुढे येत होता. धुरामुळे त्याला नीट दिसत नव्हते. कशाला तरी अडखळून तो पडला आणि तेवढ्यात एक जळती तुळई त्याच्या अंगावर पडली. अर्जुनसिंह आणि दिलीपसिंह धावत पुढे गेले. त्यांनी ती तुळई बाजूला सारली व दर्शनसिंहाला बाहेर काढले. दर्शनसिंह बेशुद्ध झाला होता. त्यांनी त्याला खांद्यावर उचलले आणि बाहेर आणले. दिलीपसिंह आणि अर्जुनसिंह यांचे कपडे बऱ्याच ठिकाणी फाटले होते. अनेक ठिकाणी पेटले होते. त्यांच्या अंगावर जागोजागी भाजल्याच्या खुणा दिसत होत्या. त्यांच्या हातापायांनाही फोड आले होते. बाहेर आल्यावर ते बेशुद्ध पडले. लोकांनी तिघांनाही बाजूला नेले. धावाधाव सुरू झाली. वैद्य आले. औषधे आली. नाना प्रकारचे उपचार झाले. सात दिवसानंतर तिघांच्याही प्रकृती सुधारल्या. तिघेही उठू-बसू लागले. पण दर्शनसिंहाचे डोळे गेले. कायमचे गेले.

त्याची बायको रडून रडून सगळ्यांना सांगू लागली, "गुहिल महाराजांवर हात उचलण्याचा आणि त्यांना शिव्या देण्याचा हा परिणाम आम्हाला भोगावा लागत आहे."

तिचे ते बोलणे ऐकून दर्शनसिंहही कळवळून रडू लागायचा आणि म्हणायचा, "होय, खरे आहे. मी जे पाप केले त्याबद्दल देवाने मला शिक्षा दिली आहे."

अर्जुनसिंह आणि दिलीपसिंह यांचे वडील मग दर्शनसिंहाजवळ बसले आणि त्याला म्हणाले, "अरे, ती आग लागली पण तुमच्या आमच्या घराण्यातील जी वैराची आग पिढ्यानुपिढ्या जळत होती ती आता कायमची विझली. तुम्ही आम्ही एक झालो. भगवान एकलिंगजीच्या कृपेने यातून काहीतरी चांगलेच होईल."

दर्शनसिंह म्हणाला, "माझे बाहेरचे डोळे गेले पण आतले डोळे उघडले. गुहिल महाराज म्हणजे साक्षात देवाधिदेव महादेवच आहेत. जो कोणी त्यांचा विरोध करील त्याला अशीच शिक्षा मिळेल."

दर्शनसिंहाचे व त्याच्या पत्नीचे उद्गार गावोगावी पोहोचले आणि घरोघरी त्यांचे पडसाद उमटू लागले. गुहादित्याचे नाव घेताच प्रत्येकजण आदराने प्रणाम करू लागला व म्हणू लागला, "अहो, ते तर प्रत्यक्ष भगवान शंकरच आहेत !"

## १८ यवनांचा तळ

गुहादित्य सोळा वर्षांचा झाला. त्याने पाणिनीची अष्टाध्यायी पूर्ण केली. तो उत्तम संस्कृत लिहू वाचू लागला. रामायण, महाभारत आदी इतिहासग्रंथांचाही त्याने मनन-चिंतनपूर्वक अभ्यास केला. राजनीतीवरचे अनेक ग्रंथ त्याने गुरुमुखातून ऐकले व

त्यातील सगळे सिद्धान्त त्याने समजून घेतले. सगळ्या शस्त्र-विद्यांमध्ये तो पारंगत झाला. युद्धकलाही तो शिकला. मोकळ्या मैदानात, अरण्यात, दऱ्याखोऱ्यात थोड्या किंवा अधिक सैन्यानिशी युद्ध कसे करावे हे तो शिकला. पायी, घोड्यावरून, हत्तीवरून व रथावरून युद्ध करण्याची कला, त्याला चांगली अवगत झाली. सैन्याच्या नाना प्रकारच्या गती व नाना प्रकारच्या व्यूहरचनाही तो शिकला.

हे त्याचे सगळे शिक्षण केवळ पुस्तकी नव्हते. ते केवळ त्याच्या डोक्यात किंवा तोंडात नव्हते तर ते त्याच्या मनात ठसले होते आणि कृतीत उतरले होते. त्यातील अधिकांश गोष्टींचा त्याने वारंवार लटूपटीच्या लढाईत अभ्यास केला होता. सकाळी दिनेश्वराकडून जे पाठ त्याला मिळत असत त्याचा प्रत्यक्ष प्रयोग तो दुपारी आपल्या मित्रांबरोबर करीत असे. केवळ निकटच्या शिवपूर गावातीलच नव्हे तर आसपासच्या तीनचार गावांतील त्याच्या बरोबरीची व त्याच्यापेक्षा वयाने मोठी मुलेही त्याच्याजवळ येत असत. ते सगळे त्याचे एकनिष्ठ अनुयायी बनले होते. त्यांची संख्या शंभरावर होती.

गुहादित्य त्यांना रोज युद्धकलेचे शिक्षण देत असे. आपसात दोन भाग करून ते नाना प्रकारची कृत्रिम युद्धे करीत असत. कधी ते गहन अरण्यात शिकारीला जात असत, तर कधी दूरच्या एखाद्या पर्वतशिखरावर आक्रमणाचे स्वरूप देऊन आरोहण करीत असत.

आपल्या मनात येणारे अनेक विचार गुहादित्य आपल्या मित्रांसमोर प्रगट करीत असे. आपल्या देशातील सगळे लोक क्षुद्र,

स्वार्थी, व्यसनाधीन व दुराचारी बनल्यामुळे सगळा भारतवर्ष कसा उध्वस्त झाला आहे, परकीय गोभक्षक यवनांनी तो कसा पायदळी तुडविला आहे, देशात सर्वत्र धर्माचे राज्य प्रस्थापित करणे कसे आवश्यक आहे, निधर्मी यवनांनी सगळीकडे कसे अत्याचार केले आहेत, इत्यादी अनेक गोष्टी तो फार कळवळ्याने व पोटतिडिकेने आपल्या मित्रांना सांगत असे.

त्याचे ते मित्र जिवाचा कान करून त्याचे भाषण ऐकत असत. त्याचा शब्द अन् शब्द हृदयाच्या शिपल्यात ते साठवून ठेवीत असत. गुहादित्यावर त्यांचे अपरंपार प्रेम होते. त्याच्या लहान मोठ्या आज्ञेचे ते अगदी तत्परतेने पालन करीत असत. त्याला ते आपला राजाच मानीत असत. एकदा कृत्रिम युद्ध खेळून थकल्यावर ते सगळे जण एका डोंगरपठारावर बसले होते. तेव्हा अर्जुनसिंह म्हणाला, "आता हे लुटुपुटीचे युद्ध पुरे झाले. आता आम्हाला खऱ्या युद्धात उतरले पाहिजे. आमचे बाहू स्फुरण पावत आहेत. आमच्या तलवारी रक्त मागत आहेत. आमच्या देशात आसपास सगळीकडे यवन शिरले आहेत. चंद्रावतीच्या प्रमारांचे राज्य गेले. वल्लभी येथील सूर्यवंशी राजपूतांचे राज्य नष्ट झाले. पुरुषपूर, लोहपूर, मथुरा, कर्णपूर, चंद्रपुरी, भृगुकच्छ, सुराष्ट्र अशी सगळी मोठमोठी राज्ये उध्वस्त झाली. मला वाटते आपण शस्त्र घेऊन उठले पाहिजे. जवळपासची लहानमोठी राज्ये हस्तगत केली पाहिजेत. गुहादित्या, तुझे नेतृत्व असल्यावर कोणतीही मोठी सेना आपल्यासमोर टिकणार नाही ह्याची मला अगदी खात्री आहे."

केशवदास म्हणाला, "अर्जुन, तू म्हणतोस ते अगदी खरे आहे. जिकडे गुहादित्य बोट दाखवील तिकडे अगदी तळहातावर

शिर घेऊन आम्ही धावत जाऊ. गुहादित्याच्या नुसत्या नेत्र-संकेताने आम्हाला प्रत्येक कार्यात यश मिळेल."

गुहादित्य म्हणाला, "मित्रांनो, तुम्ही म्हणता ते सगळे आपल्याला घडवून आणावयाचे आहे. या देशातून यवनांना पिटाळून लावावयाचे आहे. येथे धर्मराज्य प्रस्थापित करायचे आहे. पण त्यासाठी थोडा धीर धरायला हवा. कोणत्याही गोष्टीत आळस उपयोगाचा नाही तशीच घाईही उपयोगाची नाही. संयम बाळगा. नेहमी सिद्ध राहा आणि आपल्या ह्या विचाराने आधी गावेच्या गावे भारून टाका. मन जिंकले म्हणजे शरीर आपोआप जिंकले जाते. एकजूट झालेली मने मोठमोठ्या किल्ल्यापेक्षाही अजेय असतात. आपल्या पराक्रमाची लवकरच परीक्षा होणार आहे असे मला वाटते. आपणावर युद्धाचा प्रसंग केव्हाही येऊ शकतो. आपण नेहमी सिद्ध राहिले पाहिजे."

आणि दुसऱ्याच दिवशी शिवपूरच्या दाराशी युद्ध येऊन उभे राहिले. त्या लहानशा गावात एकच धांदल उडाली. जो तो चकित होऊन पाहू लागला. गावाजवळील विस्तीर्ण मैदानात यवनांचा तळ पडला होता. दिवस उजाडताच ग्रामप्रमुखाकडे यवनांचा दूत निरोप घेऊन आला होता की, "एक लक्ष सुवर्णमुद्रा ताबडतोब पाठवा नाहीतर सगळे गाव लुटले जाईल. लोकांची कत्तल केली जाईल व घरेदारे जाळून टाकली जातील."

सगळ्या गावात भीतीचे वातावरण पसरले मी मी म्हणणारे, स्वतःच्या बलाची बढाई मारणारे व गरिबांना त्रास देणारे, मोठ-मोठे लोक घरात दडून बसले. गावात जणूकाही कोणी राहतच नाही असे वाटू लागले. यवनांच्या अश्वारोही सैनिकांची एक

लहानशी तुकडी गावात फेरी मारून गेली. अनेक सैनिक लोकांच्या घरात शिरून दूध, तूप, ज्वारीचे पीठ, गूळ, नाना प्रकारच्या डाळी, आपल्या सैन्यासाठी घेऊन गेले. अर्थात त्यांनी कोणालाही त्याची किंमत दिली नाही. पंकजदास नावाच्या एका व्यापाऱ्याने जेव्हा किंमत मागण्याचे धारिष्टय केले तेव्हा त्याला झाडाला उलटे टांगून खूप झोडपण्यात आले. जाताना ते ग्रामप्रमुखाला म्हणाले, "रोज सकाळी आम्हाला इतका शिधा निमूटपणे पोहोचता करीत जा. नाहीतर आम्ही गावातील सगळ्या लोकांना अशीच शिक्षा करू." मग गोळा केलेला शिधा वाहून नेण्याकरिता त्यांनी बैलगाड्या बोलाविल्या. गाड्यांमध्ये सगळ्या वस्तू ठेवण्यात आल्या. केशवदास, अर्जुनसिंह व त्याचे चौघे मित्र गाड्यांवर बसले. सहा गाड्या सामान छावणीकडे गेले. यवन सैनिकांना न्हावी हवे होते म्हणून गावातील दोघे न्हावी नेण्यात आले. त्यांच्याबरोबर अक्षयकुमारही गेला. गाड्या निघून गेल्यानंतर थोड्या वेळाने आंधळा दर्शनसिंहही फाटके कपडे अंगावर घालून व गळ्यात झोळी अडकवून काठी टेकत टेकत छावणीकडे गेला.

## १९ शत्रुनाशाची योजना

बैलगाड्या छावणीत शिरल्या. किशोरवयाचे ते गाडी हाकणारे उघड्या डोळ्यांनी दोन्ही बाजूला पाहत होते व सगळे काही मनात टिपत होते. अक्षयकुमार हजामती करीत तंबू-तंबूतून हिंडत होता व यवनसैनिकांशी अघळपघळ गप्पा मारीत होता.

आंधळा दर्शनसिंह भीक मागता मागता सहज विचारीत होता, "तुम्ही कोठून आला आहात ? कोठे जाणार आहात ? येथे तुमचा मुक्काम किती दिवस आहे ?"

कोणीतरी त्याला दरडावले, "तुला ह्या नसत्या चौकशा कशाला हव्यात ?

दर्शनसिंह म्हणाला, "वा महाराज, तुमच्यासारख्या उदार श्रीमंतांच्या भरवशावर तर मी माझे पोट भरतो आहे. माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही खूप दिवस येथे राहावे. हा गाव मोठा सधन आहे. येथे तुम्हाला भरपूर खायला–प्यायला मिळेल. लोकांजवळ पैसाही भरपूर आहे."

भसाडया आवाजात दर्शनसिंह एखादे गाणे म्हणून दाखवायचा. मग कोणी सैनिक त्याला नाचून दाखवायला सांगत. तो कसेतरी नाचायचा मग ते सैनिक मोठमोठ्याने हसत व त्याला काहीतरी भिक्षा देत. संध्याकाळपर्यंत दर्शनसिंह त्या छावणीत फिरला. त्याने झोळीभर भिक्षा गोळा केली. मग तो गावाकडे वळला. गावाजवळ येताच त्याने झोळीतील सगळी भिक्षा दूर भिरकावून दिली आणि काठी टेकत टेकत तो फार वेगाने मारुतीच्या मंदिराकडे चालू लागला.

एक घटका रात्र झाली होती. मारुतीच्या मंदिरात दीडशे लोक जमले होते. इतके लोक असूनही सगळे अगदी शांत बसले होते. इतके लोक आहेत याची कल्पनाही बाहेरून कोणाला आली नसती. मध्यभागी गुहादित्य बसला होता. त्याच्या उजव्या बाजूला दिनेश्वर होता, तर डाव्या बाजूला दर्शनसिंह होता. अर्जुनसिंह, धर्मसिंह, केशवदास वगैरे मंडळी समोर बसली होती. त्या सगळ्या

जमावात अधिकांश किशोर होते. पंचवीस-तीस तरुण होते व पंचवीस-तीस प्रौढ होते. त्यांनी पंधरा-पंधरा, वीस-वीस लोकांच्या टोळ्या केल्या होत्या. प्रत्येक टोळीचा प्रमुख गुहादित्यासमोर बसला होता. गुहादित्य त्यांना काहीतरी समजावून सांगत होता. ते सगळे लक्ष देऊन ऐकत होते.

शेवटी गुहादित्य म्हणाला, "जळता बाण आकाशात उडता-क्षणीच सगळ्या गोष्टी एकदम झाल्या पाहिजेत. दोन घटकांच्या आत यवनांची सगळी छावणी उध्वस्त झाली पाहिजे. एकही यवन येथून जिवंत जाता कामा नये. चला, उठा लवकर, त्या पवनसुत हनुमानाला प्रणाम करा आणि त्याच्या नावाला शोभेल असा पराक्रम करून दाखवा."

सर्वजण उठले. त्यांनी मारुतीला नमस्कार केला व शेंदूर कपाळाला लावला. मग त्यांनी दिनेश्वराला नमस्कार केला. मंदिराच्या मागल्या बाजूला गुहादित्याची आई बसली होती. गुहादित्याच्या मित्रांनी तिला नमस्कार केला आणि मग वानराच्या चपळाईने सगळ्या टोळ्या अदृश्य झाल्या.

दिनेश्वर दर्शनसिंहाला म्हणाला, "काका, तुम्ही आता येथेच झोपता की तुम्हाला तुमच्या घरी पोहोचवून देऊ.

दर्शनसिंह म्हणाला, "मी येथे झोपणार नाही किंवा घरीही जाणार नाही. मी नेहमी आमच्या गुहिल महाराजांच्या बरोबर राहीन. तुम्ही म्हणाल मी आंधळा आहे. पण लक्षात ठेवा, आता माझ्या पायांना दृष्टी आली आहे. जे तुम्हाला दिसणार नाही ते आता मला दिसते. आता माझ्या कानांची शक्ती दुप्पट-चौपट वाढली आहे. अनेक गोष्टींचा मला आता वास येऊ लागला आहे.

यापुढे मी माझे सगळे जीवन गुहिल महाराजांच्या चरणी वाहिले आहे. ते माझे राम आहेत. मी त्यांचा हनुमान आहे. वेळ आली तर मी त्यांना खांद्यावर उचलून घेईन आणि धावत जाईन. जोपर्यंत माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत गुहिल महाराजांच्या केसालाही धक्का लागणार नाही हे तुम्ही निश्चित समजा. चला तर मग. आता आपणही आपल्या ठरलेल्या ठिकाणी जाऊ या."

ते तिघेही तेथून उठले. गुहादित्य मागल्या ओवरीत गेला व त्याने आपल्या आईला प्रणाम केला. अचानक दिनेश्वरही वाकला आणि त्याने पुष्पावतीला प्रणाम केला. तेवढ्यात दर्शनसिंहही तेथे आला आणि जमिनीवर डोके टेकवून म्हणाला, "माताजी, हा तुमचा मोठा मुलगा थोडासा वेडा आहे. त्याला सांभाळून घ्या व आपला आशीर्वाद द्या."

त्याचे ते बोलणे ऐकून तिघेही चकित झाले. वास्तविक पाहता पुष्पावती एक शब्दही बोलली नव्हती. ती तेथे असल्याचेही कोणी कोणाजवळ बोलले नव्हते. दर्शनसिंहाला हे सगळे कसे कळले ? जणूकाही त्याला दिव्यदृष्टीच प्राप्त झाली होती.

ते तिघेही मंदिराबाहेर पडले व वेगाने गावाच्या दिशेने चालू लागले.

## २० गुहादित्याचा पहिला विजय

त्या टोळीत तीसजण होते. त्यांचा प्रमुख केशवदास होता त्यांनी आपल्या डोक्यावर वाघाची तोंडे बसविलेली होती व

सगळ्या अंगावर वाघाचे कातडे घेतले होते. त्यांच्या दोन्ही हातांत अणकुचीदार लोखंडी वाघनखे होती. छावणीच्या आसपास अनेक झाडामागे ते लपून वसले होते. जळता बाण आकाशात उडताच पहारेकऱ्यांवर ते तुटून पडणार होते.

छावणीच्या पश्चिमेला यवनांचे दोनशे घोडे वांधलेले होते. त्या सगळ्या घोड्यांना बंधमुक्त करून पिटाळून लावायचे व घोड्यांसाठी ठेवलेल्या गवताच्या गंजीला आग लावून द्यायची असे काम दुसऱ्या टोळीकडे सोपविण्यात आले होते. या टोळीचा प्रमुख अक्षयकुमार होता. हातात लहान लहान कुऱ्हाडी घेऊन त्या टोळीतले वीस किशोर गवताच्या गंजीत लपून बसले होते. त्यांनी आपल्या डोक्याला गवताच्या पेंड्या बांधल्या होत्या. अक्षय-कुमाराने तर आपल्या अंगाभोवती गवताच्या पेंड्या अशा बांधून घेतल्या होत्या की, एखादी लहानशी गवताची गंजीच इकडेतिकडे हिंडत आहे असे वाटत होते.

छावणीच्या चारी दिशांना चार टोळ्या दबा धरून बसल्या होत्या. त्यांच्याजवळही गवताच्या पेंड्या होत्या. यवनांच्या तंबूच्या दोऱ्या कापायच्या, आत जळत्या पेंड्या फेकायच्या, तंबूखालीच त्यांना दाबायचे व जे बाहेर निघतील त्यांना कापून काढायचे हे काम त्यांच्याकडे होते.

वीस–वीस किशोरांच्या दोन टोळ्या जवळच्या झाडावर चढून बसल्या होत्या. यवनसैनिक दिसलारे दिसला की अचूक बाण मारून त्याला समाप्त करण्याचे काम त्यांच्याकडे दिलेले होते.

वीस–वीस किशोरांच्या दोन टोळ्या छावणीच्या पुढे व मागे लपून बसल्या होत्या. दोन्ही हातांत शस्त्रे घेऊन त्यांतील

सर्वजण अगदी सिद्ध होते. पुढे असलेल्या टोळीच्या अग्रभागी स्वत: गुहादित्य उभा होता. तो सगळ्यांना सूचना पाठवीत होता. गावातील ढोल, नगारे, तुताऱ्या इत्यादी वाद्ये एकत्र करण्यात आली होती व त्यांची व्यवस्था एका कोपऱ्यात केली होती. दिलेल्या कामासाठी सर्वजण आपापल्या ठिकाणी सिद्ध असल्याची वातमी गुहादित्याकडे पोहोचली.

मंगळाचा उग्र तारा डोक्यावर दिसू लागला. गुहादित्याने दिनेश्वराला खूण केली. दिनेश्वराने दर्शनसिंहाच्या हातात धनुष्य-बाण दिला. दर्शनसिंहाने बाणाचे टोक आकाशाकडे करून धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढली. बाणाच्या टोकाला दिनेश्वराने वत्ती लावली. दर्शनसिंहाने बाण सोडला. ज्वालाग्राही पदार्थांची भुकटी भरलेला तो जळता बाण उंच आकाशात उडाला.

त्या खुणेकडेच सगळ्यांचे डोळे लागलेले होते. ती दिसताच प्रत्येकाने आपापली ठरलेली कामे करावयास सुरुवात केली. वाघांनी नेमक्या झेपा घेतल्या आणि पहारेकऱ्यांच्या कंठनाळी चिरल्या. आवाज न करता ते जागच्या जागीच कोलमडले.

एकाएकी घोड्यांची बंधने तुटली आणि ते दूर पिटाळले गेले. त्याचवेळी तंबूचे आधार कोलमडून पडले. तंबू खाली कोसळले. सैनिकांना उठता येईना. तेवढ्यात जिकडे तिकडे आगी लागल्या. प्रत्येक तंबू जळू लागला. यवनसैनिक होरपळू लागले. त्यांच्यापैकी काहींनी शस्त्रे शोधली. वरचे कापड फाडले व ते बाहेर आले. तंबूच्या आतून त्यांचे डोके बाहेर निघते न निघते तोच ते छाटले जात होते.

धूम्राक्ष नावाच्या त्यांच्या सेनापतीने या सगळ्यातून आपली सुटका करून घेतली व तंबूची कापडे चिरून त्याने अनेक

सैनिक बाहेर काढले. कशीबशी त्यांनी शस्त्रेही मिळविली. मग आपला शत्रू आहे तरी कोठे याचा शोध घेत ते इकडे तिकडे फिरू लागले. चहूबाजूला आग होती. तोच त्यांचा पहिला शत्रू होता. त्यातून ते कसेबसे बाहेर निघाले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, मागच्या चारही सैनिकांवर एकदम चार वाघांनी हल्ला केला असून ते चारही सैनिक जागच्या जागीच ठार झाले आहेत. गांगरलेले व घाबरलेले यवनसैनिक जरा सरसावून वाघांवर आक्रमण करणार तोच वाघ उड्या मारून दिसेनासे झाले. इतक्यात त्यांच्यावर बाणांचा वर्षावही झाला. त्यामुळे त्यांच्यापैकी आठ-दहा जण जखमी झाले. धडपड करून तंबूच्या बाहेर पडणारे आणखी काही सैनिक त्यांना येऊन मिळत होते. आता त्यांच्या जमावात शंभरावर सैनिक झाले होते. चहूबाजूला न्याहाळीत दबत दबत पावले टाकीत ते गावाच्या दिशेने जाऊ लागले.

गुहादित्याने निरोप पाठवून योग्य वेळी आपल्या सैनिकांना बोलावून घेतले. एका लहानशा नाल्यात उतरताच गुहादित्याने खूण केली. त्याबरोबर सगळे किशोर सैनिक यवनसैनिकांवर तुटून पडले. नगारे वाजले. तुताऱ्यांच्या आवाजाने आकाश भरून गेले. "जय एकलिंगजीच्या आरोळ्या वारंवार उठू लागल्या. कापाकाप सुरू झाली. चहूकडे रक्ताच्या चिरकांड्या उडू लागल्या. दोन्हीकडचे वीर बेभान होऊन लढू लागले. स्वतः गुहादित्य दोन्ही हातांत तलवारी घेऊन लढत होता व शत्रुसैनिकांची मुंडकी सपासप उडवीत होता. शेवटी त्याची व धूम्राक्षाची गाठ पडली. धूम्राक्ष कसलेला योद्धा होता. त्याच्या ठायी असामान्य बल होते. त्याचा जर एकच प्रहार गुहादित्याच्या अंगावर बसला असता तर गुहादित्याचा पार चेंदामेंदा झाला असता. पण गुहादित्याच्या

ठिकाणी विजेचे चापल्य होते. त्यामुळे धूम्राक्षाचे सगळे प्रहार वाया जात होते. आपल्या समोरचा हा लहानसा मुलगा क्षणात येथे तर क्षणात तेथे आहे अशा स्थितीत आपण वार तरी कोठे मारावा असे त्याला झाले. गुहादित्याचे वारमात्र त्याला अचूक लागत होते. शेवटी चिडून त्याने जवळच्या सैनिकाजवळून गदा घेतली व गरगर फिरवीत दाणकन् गुहादित्याच्या डोक्यावर



मारली. पण गुहादित्य केव्हाच बाजूला झाला होता. यवनाचा गदेचा हात खाली जाताच गुहादित्याने सर्कन् वार काढला तेव्हा त्याचा हात छाटला गेला व गळ्याजवळचे कवच फुटले. यवनाने कसाबसा उभे राहण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात गुहादित्याचा दुसरा वार त्याच्या बरगडीत बसला व तो खाली कोसळला. ते पाहून उरलेले यवनसैनिक पळाले. दिनेश्वराने व दर्शनसिंहाने एकच आरोळी ठोकली, "जय एकलिंगजी."

गुहादित्याचे सगळे सैनिक ओरडले, "जय एकलिंगजी."

दर्शनसिंहाने गुहादित्याला आपल्या खांद्यावर उचलून घेतले. सर्वांनी नानाप्रकारे विजयाचा आनंद प्रगट केला. मग सर्वजण एकत्र बसले. कोण जखमी झाला, कोणाला किती लागले, याची गुहादित्य चौकशी करू लागला. या लढाईत त्यांचा एकही सैनिक मेला नव्हता. लहान मोठ्या जखमा अनेकांना झाल्या होत्या. काहींचे अंग भाजले होते. दिनेश्वराने व दर्शनसिंहाने त्या सगळ्यांसाठी औषधपाण्याची नीट व्यवस्था केली. ज्यांच्या हाता-पायांना जास्त मार लागला होता, त्यांना डोल्यांत घालून गावात नेण्यात आले व त्यांची उत्तम व्यवस्था ठेवण्यात आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी लूटलेल्या वस्तूंनी मारुतीच्या मंदिराचे सभागृह भरून गेले होते. मंदिराबाहेर दीडशे घोडे बांधण्यात आले होते. तेवढेच हाती लागले होते. बाकीचे जळून मेले होते तर काही दूर पळून गेले होते.

गुहादित्याच्या असामान्य पराक्रमाची कीर्ती आता आसपासच्या गावांत पसरली. अनेक तेजस्वी तरुण गुहादित्याकडे येऊ लागले. गुहादित्याची सेना वाढू लागली.

## २१ भिल्लराज्यातील गोंधळ

एके दिवशी संध्याकाळी गुहिल जेव्हा आपल्या निवासस्थानी परत आला तेव्हा त्याला असे दिसले की, आपली आई अनेक स्त्रियांच्या मध्यभागी बसलेली असून त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकत आहे. बऱ्याच वेळानंतर त्या स्त्रिया त्याच्या आईला प्रणाम करून व "आम्हाला या संकटातून सोडवा" अशी विनवणी करून निघून गेल्या.

गुहिलने जेव्हा आपल्या आईला त्याबद्दल विचारले तेव्हा ती त्याला म्हणाली, "बेटा, वास्तविक पाहता त्या सगळ्याजणी तुलाच भेटायला आल्या होत्या. परंतु तू बराच वेळ न आल्यामुळे मीच त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व त्यांना संकटातून मुक्त करण्याचे आश्वासन दिले."

गुहिल म्हणाला, "आई, त्या तर कोणीतरी भिल्ल स्त्रिया दिसत होत्या. त्या काही आपल्या आसपासच्या किंवा जवळच्या गावांतल्या दिसत नव्हत्या. त्यांच्यावर कसले संकट आले आहे ? त्यांच्याशी आपला काय संबंध आहे ?"

पुष्पावती म्हणाली, "बाळ गुहिल, त्या भिल्ल स्त्रियाच होत्या. तू बरोबर ओळखलेस. आपल्या येथून ईशान्येकडे सात कोसांवर जे लहानसे भिल्लराज्य आहे तेथे हल्ली दोन भावांचे भांडण चालू आहे. तेथील राजा चार महिन्यांपूर्वी इहलोक सोडून गेला. त्याला दोन आवळीजावळी मुले आहेत. एकाचे नाव खरगसिंह आहे व दुसऱ्याचे नाव हरखसिंह आहे. दोघेही दुर्व्यसनी

आहेत. त्या दोघांच्या भांडणामुळे त्यांची प्रजा फार दुःखी आहे. त्याचा पक्ष घेणाऱ्याला ह्या छळतो व ह्याचा पक्ष घेणाऱ्याला तो छळतो, असे तेथे चालू आहे. दोघेही क्रूर व अन्यायी आहेत. आम्हाला त्यांच्या त्रासातून सोडवा आणि आमची मुले–माणसे वाचवा, अशी विनंती करायला ह्या सर्व स्त्रिया येथे आल्या होत्या. उद्या सकाळी तू तेथे जा व त्या बिचाऱ्यांना दुःखमुक्त कर. तू म्हणशील, आपण राजपूत आहोत ते तर भिल्ल आहेत. त्यांचा आमचा काय संबंध आहे ? तेव्हा तू एक गोष्ट नेहमीकरिता लक्षात ठेव, या जगात जो जो म्हणून दुःखीकष्टी असेल त्याचा व तुझा संबंध आहे, मग तो कोणी का असेना ! दुःखीजनांचे दुःख दूर करण्या-साठीच तू या जगात आला आहेस. तुझा पराक्रम, तुझी बुद्धिमत्ता, तुझी राजनीती, तुझ्या सगळ्या कला व विद्या त्याच कारणी लागल्या पाहिजेत. त्यातच तुझ्या जन्माचे सार्थक आहे."

गुहिल उठून उभा राहिला. त्याच्या मुद्रेवर नवे तेज विलसू लागले. पुढे होऊन त्याने आपल्या आईला प्रणाम केला व म्हटले, "मातोश्री, आपण आता जे सांगितले ते मी नेहमी लक्षात ठेवीन व त्याप्रमाणे वागेन. आपण सांगितलेल्या ह्या कामासाठी मी उद्याच सकाळी निघतो आणि तेथील लोकांचे सगळे कष्ट दूर होतील अशी व्यवस्था करतो. आपण निश्चिंत असावे."

पुष्पावतीने गुहादित्याला जवळ घेतले व त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले. मग त्याला आशीर्वाद देत ती म्हणाली, "बाळा, तू विजयी होशील. विपुल यश, कीर्ती व ऐश्वर्य प्राप्त करशील."

दुसऱ्या दिवशी सकाळी मारुतीच्या मंदिरात गुहादित्याने आपल्या प्रमुख मित्रांना बोलाविले. दिनेश्वर, दर्शनसिंह इत्यादी

वडील मंडळीही त्या बैठकीत उपस्थित होती. सर्वप्रकारे विचार करून असे ठरले की, आदल्या रात्री पुढे जाऊन केशवप्रसाद व अक्षयकुमार यांनी सगळी बातमी काढावी आणि दुसऱ्या दिवशी अगदी पहाटे शंभर अश्वारोही सैनिकांसह गुहिलने निघावे. सूर्योदयापूर्वी त्याने भिल्लराज्यात जाऊन पोहचावे.

ठरल्याप्रमाणे अक्षयकुमार व केशवदास संध्याकाळी निघून गेले व बाकीचे सगळे आपापल्या तयारीला लागले. घोड्यांची निवड होऊ लागली. शस्त्रे सिद्ध केली जाऊ लागली. शंभर लोकांनिशी निघायचे ठरले होते पण दीडशे लोक बरोबर चालायला उत्सुक होते. शेवटी गुहादित्याने सांगितले की, "हे येतील." त्याप्रमाणे निवडक शंभर सैनिक गुहादित्याबरोबर जाण्यास सिद्ध झाले व बाकीचे तेथेच थांबले. सर्वांच्या अंत:करणात नवा उत्साह संचारला होता.

## २२ जणू शंकराने फेकलेला त्रिशूळच

रात्रभर तयारी चालू होती. कोठे जायचे आहे, तेथे जाऊन काय करायचे आहे, ह्याची कोणालाही कल्पना नव्हती. परंतु त्याबद्दल कोणी कोणाला विचारीत नव्हते किंवा कोणी कोणाला काही सांगत नव्हते. जो तो आपापल्या दिलेल्या कामात मग्न होता. प्रत्येक जण ते अगदी दक्षतेने करीत होता. कोणी घोड्यांची व्यवस्था पाहत होते तर कोणी शस्त्रांची निवड करीत होते. कोणी मशाली ठाकठीक करीत होते तर कोणी खाण्यापिण्याच्या वस्तू जमवीत होते. काम करताना कोणीही कंटाळत नव्हता. काम

करता–करताच हास्यविनोदही चालू होता. गप्पागोष्टीही चालू होत्या. मध्यरात्रीनंतर काहीजण निजले तर काहीजण जागे राहिलेत. काहीजण उगीच घटका–दोन घटका आडवे झाले.

शुक्रोदयापूर्वीच सर्वजण उठले आणि निघण्याची तयारी करू लागले. तिकडे आकाशात शुक्राचा तारा उदयाला आला आणि इकडे गुहादित्य एका तेजस्वी घोड्यावर आरूढ झाला. त्याच क्षणी शंभर घोडेस्वार लगाम ओढून तयार झाले. गुहादित्य सगळ्यांच्या पुढे होता. त्याने इशारा केला आणि सगळ्यांनी आपापल्या घोड्यांना टाचा मारल्या. घोडे वाऱ्यासारखे पळू लागले. ते अतिशय वेगाने पण पद्धतीने पळत होते. त्यांच्या रांगा मोडत नव्हत्या किंवा त्यांच्यातले अंतरही कमीअधिक होत नव्हते. झाडे–झुडपे मागे पडत होती. दगडधोंडे तुडविले जात होते. मोठमोठ्या टेकड्या क्षणात लहान होत होत्या. एकाच झेपेत नाले ओलांडले जात होते. टप्टप् आवाजाने सगळे अरण्य दुमदुमले होते. धूळ उडत होती. आवाज घुमत होता. झाडांच्या फांद्या तुटत होत्या. दगड गडगडत होते व फेकले जात होते. ससे आपल्या बिळांतून बाहेर पडत होते व पुन्हा कोठेतरी जाऊन लपत होते. हरणांचे कळप चौक भरीत दूर निघून जात होते. पक्षी जोराने किलबिल करीत होते. कोणतेही रानटी जनावर, कोणताही नदीनाला, कोणताही पहाड किंवा कोणतीही दरी गुहादित्य व त्याच्या सैनिकांना अडवू शकले नाहीत. रामाच्या बाणासारखे सगळे अरण्य चिरीत ते सगळे सैनिक तीव्र वेगाने पुढे चालले होते. जणूकाही शंकराने त्रिपुरासुरावर फेकलेला तो त्रिशूळ होता.

अरण्य थोडेसे विरळ झाले. गुहादित्याने आपल्या घोड्याचा वेग कमी केला. हातातील तलवार उंच उचलून त्याने खूण केली. त्याबरोबर सगळ्या घोड्यांचा वेग कमी झाला. ते भिल्ल-राज्याच्या सीमेत येऊन पोहोचले होते. मोठे थोरले वडाचे झाड दुरून दिसत होते. वडाच्या झाडाखाली अक्षयकुमार व केशवदास उभे होते. त्यांना पाहताच गुहादित्याने आपल्या सैनिकांना खूण केली. सगळे घोडेस्वार जागच्या जागी थांबले. गुहादित्य, दिनेश्वर व दर्शनसिह थोडे पुढे आले व घोड्यावरून खाली उतरले.

अक्षयकुमार म्हणाला, "आपणास येथे क्षणभरही थांबता उपयोगी नाही. भिल्लांचे मुख्य केन्द्र जे बनसरी गाव आहे तेथे आपणास जायला हवे. तेथे वीस भिल्लांना सूर्योदयापूर्वी ठार मारले जाणार आहे. त्यांना आपण वाचविले पाहिजे. त्यांना हरखसिंह मारणार आहे. खरकसिंहही त्यांना सोडविण्याच्या प्रयत्नात आहे. तोही बहुधा सकाळीच तेथे पोहोचेल. दोघा भावांचे घनघोर युद्ध होण्याची शक्यता आहे. हरखसिंहाने आपले तीनशे सैनिक तयार ठेवले आहेत. खरकसिंहही दोन–तीनशे सैनिक घेऊन येईल असे बोलले जात आहे. बनसरीच्या पूर्वेला लहानसे कालीमंदिर आहे. तेथील पटांगणात वीस भिल्लांना बांधून ठेवण्यात आले आहे व तेथेच त्यांचा शिरच्छेद व्हायचा आहे."

थोड्या विचारविनिमयानंतर पंचवीस स्वारांची तुकडी घेऊन दिनेश्वर अक्षयकुमाराबरोबर घाईघाईने निघून गेला. गुहादित्य व उरलेले सैनिक हळूहळू बनसरीच्या दिशेने पुढे जाऊ लागले. बनसरीजवळची टेकडी ते चढले आणि दिनेश्वराकडून निरोप येईपर्यंत तेथेच थांबण्याचे त्यांनी ठरविले. केशवदास एका

उंच झाडावर चढला आणि पुढे मैदानात असलेल्या बनसरी गावाचे निरीक्षण करू लागला. दिसणाऱ्या बारीक–सारीक हालचाली तो झाडाखाली बसलेल्या गुहादित्याला सांगू लागला.

## २३ खरकासिंह आणि हरखसिंह

त्या दिवशी सकाळी सूर्योदय होत होता. बनसरी गावात एकच धामधूम उडाली. "कैदी पळाले, त्यांची बंधने तोडली गेली, भिल्ल सैनिक मारले गेले," असे जो तो बोलू लागला. कोणी आपले तीर–कामठे घेतले तर कोणी भाले घेतले. जो तो देवीच्या मंदिराकडे पळू लागला. शस्त्रे घेतलेले तीन–चारशे भिल्ल तेथे पोहोचले. आरडा–ओरडा करीत अनेक भिल्लस्त्रिया त्यांच्यामागे गेल्या. त्यांच्यामागे मुलेही धावली.

देवीच्या मंदिराजवळ एक मोठा खडक होता. त्या खडकामध्ये एक ओबड–धोबड सिंहासन कोरलेले दिसत होते. त्याच्यावर एक लहानसे छत्र होते. सिंहासनाच्या उजव्या बाजूला एका दगडी कुंडात विस्तव होता. त्यात काहीतरी सुगंधी पदार्थ जळत होता. त्यातून थोडा–थोडा धूर निघत होता. गोल–गोल वळसे घेत तो धूर आकाशात जात होता.

भिल्लांची गर्दी जमलेली पाहून देवीच्या मंदिरात आतापर्यंत लपून बसलेला भिल्ल पुजारी बाहेर आला आणि काय घडले ते सगळ्यांना सांगू लागला.

"अहो एकाएकी ते आले."

"अरे कोण आले ?" कोणीतरी विचारले.

"कोण आले ते मला माहीत नाही. अंधारात काहीएक दिसले नाही. पण-आले एवढे खरे. त्यांच्या हातांत लांब–लांब तलवारी होत्या."

पुन्हा कोणीतरी विचारले, "ते कोणीकडून आले व कोणीकडे गेले ?"

पुजारी म्हणाला, "ते मला ठाऊक नाही. बहुधा ते आकाशातून उतरले असतील व पुन्हा आकाशातच गेले असतील. मी एकदा पाहिले तेव्हा ते होते. पुन्हा पाहिले तेव्हा ते नव्हते. कैद्यांची एवढी जाड जाड बंधने त्यांनी कशी कापली, कैदी कसे पळविले व रक्षकांना कसे मारले ते मला काहीएक कळले नाही. मी तलवार घेऊन त्यांच्या अंगावर धावणार होतो. पण देवी म्हणाली, नको, तू तिकडे जाऊ नकोस, म्हणून मी देवीजवळच थांबलो."

त्याचे ते बोलणे ऐकून तेथे जमलेले भिल्ल हासले. तिकडे काही भिल्ल मेलेल्या भिल्ल सैनिकांजवळ पोहोचले. सगळ्यांची मुंडकी उडविली गेली होती. युद्धाच्या काहीही खुणा दिसत नव्हत्या. "अरे हा तर केशरसिंह, तो नाहरसिंह" अशी मेलेल्यांची नावे घेतली जाऊ लागली. त्यांच्या घरच्या स्त्रिया रडू लागल्या. मुले ओरडू लागली. सगळीकडे हलकल्लोळ माजला. प्रेते जेव्हा उचलली जाऊ लागली तेव्हा रडण्या–ओरडण्याचे स्वर आणखीच मोठ्याने निघू लागले. सगळे वातावरण भीषण बनले.

एवढे होत आहे तोच हरखसिंह तेथे आला. त्याच्याबरोबर पन्नास तरुण भिल्ल होते. सगळ्यांनी हरखसिंहाला वाट दिली.

त्याने मेलेल्यांचे निरीक्षण केले. गावातील अनेक लोकांवर तो रागावला. "हे काम खरकसिंहाच्या लोकांचेच आहे. तुमचीही त्याला फूस आहे" असे म्हणून तो अनेकांवर फार रागावला.

तेवढ्यात "आले, आले," अशी एकच आरोळी उठली. माना वळवून सगळे लोक उत्तरेकडे पाहत होते. हरखसिंहानेही तिकडे पाहिले. समोरून आपल्या दोन–तीनशे सैनिकांसह खरकसिंह येत होता.

हरखसिंह ओरडून म्हणाला, "चला, व्हा सगळे युद्धाला तयार. आज खरकसिंहाच्या ऊन ऊन रक्ताचा अभिषेक मी देवीच्या चरणावर करीन तरच नावाचा खरा हरखसिंह म्हणवीन."

"खरकसिंहाच्या साथीदारांचे मी राई–राई एवढे तुकडे करीन आणि ते कोल्ह्या–कुत्र्यांना खाऊ घालीन. बोला, जय काली. जय महाकाली."

त्याबरोबर सगळ्यांनी मोठ्याने एकच गर्जना केली व आकाश दणाणून सोडले. तशाच रणगर्जना खरकसिंह व त्याचे सैनिकही करू लागले.

## २४ गरुड पक्ष्याचा शकुन

दोन्हीही सैन्ये मैदानात उतरली व आवेशाने शस्त्रे फिरवीत पुढे पुढे सरकू लागली. आता तलवारीला तलवार भिडणार एवढ्यात अतिशय तीव्र स्वरात तुताऱ्या वाजल्या व घोड्यांच्या टापांचे आवाज आले. ताड्ताड् उड्या मारीत एक लहानसे

घोडदळ दोन्ही भिल्लसैन्यांच्या मधून जाऊ लागले. त्या घोडदळाच्या समोर एक पाणीदार घोड्यावर आरूढ झालेला एक कोवळा तरुण मोठ्या ऐटीने चालला होता. आपल्या नुसत्या दृष्टिक्षेपाने तो सगळ्यांची मने जिंकत होता.

मैदानाच्या मध्यभागी आल्यावर तो तरुण आपल्या प्रभावी वाणीने म्हणाला, "हरखसिंह आणि खरकसिंह, तुम्ही दोघे भाऊ असून एकमेकांचे हाडवैरी बनला हे फार वाईट आहे. तुमच्या भांडणामुळे सगळे भिल्लराज्य त्रासले आहे. तुम्ही दोघेही व्यसनी, क्रूर, दुष्ट व दुश्चरित्र आहात म्हणून तुम्हा दोघांनाही बाजूला सारून ह्या राज्याची सगळी सूत्रे सध्या मी माझ्या हातात घेत आहे. पुढे तुमच्या मुलांपैकी जो कोणी योग्य असेल त्याला हे राज्य दिले जाईल."

हरखसिंह ओरडून म्हणाला, "अरे, जा, जा. कालच्या पोरा, उगीच खोटी ऐट दाखवू नकोस आणि आमच्या भांडणात पडू नकोस. एका क्षणात तुझी मुंडी मुरगाळून मी तुला फेकून देईन."

तो असे म्हणतो न म्हणतो तोच त्याच्या कमरेत एक जबरदस्त लाथ बसली. तो कोलमडून पडला. क्षणात त्याच्या मुसक्या आवळल्या गेल्या व तो कैदी झाला.

खरकसिंहही असे काहीतरी बोलणार होता. पण त्याने पाहिले कोणीतरी चार अपरिचित तरुण आपल्या दोन्ही बाजूला उभे आहेत. त्यांच्या तलवारी नागव्या आहेत आणि तलवारींची टोके आपल्या बरगड्यांच्या अगदी जवळ आली आहेत. त्याने आपल्या साथीदारांकडे पाहिले. ते कोणी आपल्याला काही मदत

करतील असे खड़कसिंहाला वाटले नाही. तेव्हा तो जागच्याजागीच उभा राहिला आणि काय होते ते पाहू लागला.

दर्शनसिंहाने आरोळी ठोकली, "गुहादित्य महाराज की जय." त्याबरोबर सगळे सैनिक एका सुरात ओरडले, "महाराज गुहादित्य की जय." अधिकांश भिल्लांनीही त्या सुरात आपला सूर मिळविला.



महाराज गुहादित्य घोड्यावरून उतरले व झपझप पावले टाकीत सिंहासनावर जाऊन बसले. तेथे बसताच नौबती झडल्या, शिंगे, कर्णे वाजले आणि पुन्हापुन्हा जयजयकार झाला. भिल्लजन चकित होऊन ते सगळे पाहत होते. अजून पूर्ण मनाने तें जयजयकार करीत नव्हते.

तोच एकाएकी चमत्कार झाला. एक मोठा सुंदर गरुडपक्षी आकाशातून उडत उडत आला व गुहादित्याच्या खांद्यावर बसला. ते पाहताक्षणीच सगळ्या भिल्लांच्या तोंडून नाना प्रकारचे आनंदोद्‌गार निघू लागले, "अहो हाच आमचा राजा आहे. हाच आमचा महाराजा आहे. आमचा राजा चिरंजीव होवो," असे जो तो म्हणू लागला. प्रत्येक भिल्ल पुढे होऊन गुहादित्याच्या चरणी वंदन करू लागला. शेवटी खरकसिंहही पुढे झाला. त्याने आपल्या आंगठ्याचे रक्त काढले व त्याचा टिळा त्याने गुहादित्याच्या कपाळी लावला. देवीच्या पुजाऱ्याने धावत जाऊन मुकुट आणला आणि गुहादित्याच्या डोक्यावर ठेवला. सगळे भिल्ल नाना प्रकारचे नजराणे आणू लागले.

तेथील सगळा सोहळा संपल्यावर गुहादित्य सिंहासनावरून खाली उतरला आणि देवीच्या देवळात जाऊन त्याने देवीची पूजा बांधली. मग तो देवळाच्या मागे गेला. तेथे पुष्पावती उभी होती. "आई, मला आशीर्वाद दे," असे म्हणून त्याने झेप घेतली व तिच्या चरणी आपले मस्तक टेकले.

पुष्पावतीने त्याला जवळ घेतले व त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले. मग त्याच्या डोक्यावरून हात फिरवून ती म्हणाली, "बाळा, माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. तुला उदंड आयुष्य

लाभो. जीवनात तुला खूप यश व कीर्ती मिळो. तुझ्या हातून देवाधर्माची विपुल सेवा घडो. हा नुसता प्रारंभ आहे हे लक्षात ठेव."

पुष्पावतीच्या डोळयातले दोन अश्रू गुहादित्याच्या तोंडावर पडले.

गुहादित्य कळवळून म्हणाला, "आई, हे काय ? तू रडतेस?"

पुष्पावती म्हणाली, "नाही बाळ. हे आनंदाश्रू आहेत."

## २५ प्रजावत्सल राजा

हरणखेड गावात नकुलसिंग खाटेवर कांबळे टाकून पडला होता. तो आजारी होता. त्याच्या अंगात खूप ताप होता. पलीकडे त्याची बायको जमिनीवरच फाटके कांबळे टाकून निजली होती. तिच्याही अंगात ताप होता. खरकसिंग व हरखसिंग यांच्या भांडणात त्यांची दोन्ही तरुण मुले मारली गेली होती. त्यामुळे ते अतिशय दु:खी होते. त्यांचा लहान मुलगा सुभानसिंग केव्हाचा बाहेर गेला होता. त्याची ते वाट पाहत होते. नकुलसिंगाचा ताप वाढत होता. "पाणी . . . पाणी" त्याने उद्गार काढले. पण जवळ कोणी नव्हते. तो विव्हळला, ओरडला आणि पुन्हा निपचित पडला. त्याला गुंगी आली. त्याने डोळे मिटले. काही वेळाने तो थोडासा शुद्धीवर आला. डोळे मिटल्या मिटल्याच तो म्हणाला, "पाणी, पाणी, मला कोणीतरी पाणी द्या."

तेवढ्यात त्याच्या कपाळावर एक प्रेमळ हात ठेवला गेला. गोड शब्द त्याला ऐकू आले, "घ्या पाणी घ्या. ठाकूर नकुलसिंग, तोंड उघडा. मी थोडे थोडे पाणी पाजतो आहे."

कोण बोलते आहे हे नकुलसिंगाच्या लक्षात येईना. तो चार घोट पाणी प्याला. त्याला थोडे बरे वाटले. मग त्याने हळूच डोळे किलकिले करून पाहिले. आपण स्वप्नात तर नाही ना, अशी त्याला शंका आली. त्याने डोळे ताणून पाहिले. आणि मग तो एकदम उद्गारला, "कोण, महाराज गुहादित्य ! माझ्या गरिबाच्या घरी ! . . . अरे सुभान, महाराजांना बसायला काही तरी आण. महाराज आपल्या चरणी माझे दंडवत असोत."

तो उठून बसू लागला तेव्हा गुहादित्य त्याला म्हणाला, "नकुलसिंग, तुम्ही उठू नका, पडून रहा. माझ्याबरोबर वैद्यराज आले आहेत. ते तुमची तब्येत पाहतील आणि तुम्हा दोघांना औषध देतील."

गुहादित्याबरोबर आलेल्या वैद्यराजांनी दोघांचीही तब्येत तपासली आणि औषधयोजना सुरू केली. नकुलसिंग म्हणाला, "महाराज, आपण स्वत: माझ्याकडे येण्याचा एवढा त्रास कशाला घेतलात."

गुहादित्य म्हणाला, "नकुलसिंग, हे माझे कर्तव्यच आहे. आम्ही मुलांनी तुमच्यासारख्या गुणी लोकांची नेहमी काळजी घेतली पाहिजे. तुमचा आशीर्वाद हेच आमचे बळ आहे." नकुलसिंग म्हणाला, "महाराज, तुम्हाला आमचा पूर्ण आशीर्वाद आहे असे समजा. आम्हा म्हाताऱ्यांची कशाला तुम्ही एवढी काळजी वाहता ? आमच्या सुभानूला तुम्ही आपल्या पदरी घ्या म्हणजे झाले.

"गुहादित्य म्हणाला, "त्याची आपण चिंता करू नये. त्याला मी माझ्या अंगरक्षकदलात घेतले आहे. खरकसिंगाने हिसकावून घेतलेले तुमचे शेत आणि तुमचे घर आजपासून पुन्हा तुम्हाला मिळाले आहे म्हणून समजा."

ते ऐकून नकुलसिंह गद्गद् झाला. त्याने कपाळाला हात लावून पुन्हा पुन्हा गुहादित्याला प्रणाम केला. मग तो म्हणाला, "राजा, तुला उदंड यश मिळो. तुला खूप खूप आयुष्य मिळो. तुझ्या कीर्तीचा डंका दाही दिशांना झडत राहो."

नकुलसिंहाच्या कपाळावर हात फिरवून गुहादित्य म्हणाला, "ठाकूर तुम्ही झोपून राहा. जास्त बोलू नका. तेवढ्यात सुभानसिंहाने औषधाची वाटी आणली. गुहादित्याने आपल्या हाताने ते औषध नकुलसिंहाला पाजले. गुहादित्याच्या तेथे येण्याने व त्याच्या प्रेमळ वागणुकीने सुभानसिंहाच्या आईवडिलांचा अर्धा आजार नाहीसा झाला. सुभानसिंह गुहादित्याचा एकनिष्ठ सेवक बनला.

गावागावांत लोक एकमेकांना सांगू लागले. एक म्हणाला, "अहो, तुम्ही ऐकले का ? नकुलसिंहाच्या घरी स्वतः महाराज गेले होते." दुसरा म्हणाला, "ते त्याच्या घरी फाटक्या कांबळ्यावर बसले." तिसरा म्हणाला, "त्यांनी स्वतः त्याला पाणी पाजले. त्या दोघांच्या औषधाची व्यवस्था केली." चवथा म्हणाला, "दुसऱ्याने बळकावलेले त्याचे घर आणि त्याची शेतीवाडी त्यांनी नकुलसिंहाला परत मिळवून दिली." तेथे जमलेले सगळे जण म्हणाले, "राजा असावा तर असा असावा."



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र........ नों. दि ......

## २६ गुणग्राहक राजा

पिंपळोद गावात द्रुपदाबाई राहत होती. तिचा नवरा हरखसिंह खरकसिंहाच्या यादवीत मारला गेला होता. तिची लहान लहान तीन मुले होती. मधल्या धामधुमीच्या काळात तिचे घर चोरांनी लुटून नेले होते. एक दिवस ती आपल्या घरात सचिंत बसली होती. तोच एकाएकी घोड्यांच्या टापा वाजल्या. द्रुपदाबाई घाबरली. आता आणखी कोण आले आहे, कोण जाणे. लुटारू तर नाहीत ना ? म्हणून ती घाबरली. ती उठली व घरात जाऊ लागली. पण पुन्हा तिच्या मनात विचार आला. येऊ दे लुटारू आले तर, घरात आहे काय न्यायला ?"

तेवढ्यात दोघे शिपाई आत आले आणि म्हणाले, "द्रुपदाबाई, तुम्हाला भेटायला महाराज गुहादित्य आले आहेत." हे ऐकताच द्रुपदाबाई गडबडली. तेवढ्यातल्या तेवढ्यात तिने चौकीवर सतरंजी अंथरली आणि म्हणाली, "हाय रे दैवा ! माझ्या घरात तर काहीच नाही. मी महाराजांचे स्वागत तरी कसे करू ?"

तोच गुहादित्य आत आला आणि म्हणाला, "मला द्यायला तुमच्याजवळ फार मोठी गोष्ट आहे. तेवढी तुम्ही मला मोकळ्या मनाने द्या, म्हणजे झाले." गुहादित्याने लगेच खाली वाकून तिला नमस्कार केला आणि म्हटले, "मला तुमचे आशीर्वाद पाहिजे आहेत. दुसरे काहीही नको." द्रुपदाबाई म्हणाली, "राजा माझे तुला पूर्ण आशीर्वाद आहेत. युगानुयुगे जिवंत राहा बावा आणि सगळ्यांना सुखी कर." गुहादित्य म्हणाला, "मला आणखी एक गोष्ट तुमच्याकडून हवी आहे. ही तुमची तिन्ही मुले आजपासून

माझ्या सैन्यातली आहेत म्हणून समजा. त्यांना चांगल्या रीतीने सांभाळून वडिलांसारखे पराक्रमी करण्याची कामगिरी मी तुमच्यावर सोपवितो आहे आणि त्यासाठी या सुवर्णमुद्रा मी तुम्हाला देतो आहे. कृपा करून त्यांचा स्वीकार करा."

गुहादित्याच्या मागे उभ्या असलेल्या सेवकांनी लगेच एका तबकांत सोन्याच्या मोहरांनी भरलेली थैली द्रुपदाबाईसमोर ठेवली. तिच्या डोळयातून घळघळा अश्रू वाहू लागले. तिने आपल्या तिन्ही मुलांना बोलावले आणि गुहादित्याच्या पायावर घातले. गुहादित्याने त्यांना जवळ घेऊन त्यांच्या डोक्यावरून आणि पाठीवरून हात फिरविला आणि म्हटले, "तुम्ही माझे लहान भाऊ आहात बरे का, आई सांगेल तसे ऐका. खूप शिका. चांगले मोठे व्हा." द्रुपदाबाईकडे वळून तो म्हणाला, "छान तेजस्वी आहेत ही मुले. सिंहाचे छावे सिंहासारखेच असणार! बरे. येतो मी आता." द्रुपदाबाईला नमस्कार करून आपल्या सेवकांसह गुहादित्य बाहेर पडला. सगळ्या पिंपळगावात हीच गोष्ट जो तो सांगू लागला. एका गावाहून दुसऱ्या गावाला ती गोष्ट वाऱ्यासारखी पसरली. जो तो म्हणू लागला, "राजा असावा तर असा असावा."

## २७ कुशल गुप्तचरयोजक राजा

गुहादित्याचा लौकिक दूर दूर पसरू लागला. आसपासचे राजे माहिती काढू लागले. कोणी उघडपणे तर कोणी गुप्तपणे आपले दूत पाठविले. कोणी सामंतांना पाठवून मैत्री जोडली. कोणी असा विचार केला की, हा कालचा कोवळा पोरगा आज

राजा झाला आहे. याला आपण सहज हुसकावून लावू. ते साधण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. पण ते व्यर्थ गेले. गुहादित्याने आपल्या राज्याच्या सीमेवर कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. कोठेही काही खुट् वाजले तरी ती वातमी गुहादित्याला पोहोचत असे व तो लगेच उपाययोजना करीत असे. हळूहळू आसपासच्या राजांचे कुतूहल वाढू लागले. हा गुहादित्य आहे तरी कसा ? हा कोण आहे ? कुठला आहे ? त्याच्या अंगी कोणकोणते गुण आहेत ? इतक्या लहानशा पोराने एवढे यश मिळविले तरी कसे ? याची माहिती काढण्यासाठी अनेक लोक भिल्लराज्यात येऊ लागले.

मालवदेशाच्या सोमनाथ राजाने आपला सामंत विद्याधर पंडित याला याच कामाकरिता गुप्तवेषाने भिल्लराज्यात पाठविले. विद्याधर पंडिताने कीर्तनकाराचे सोंग घेतले व सत्यकाम वाचस्पती असे नाव धारण करून त्याने भिल्लराज्यात प्रवेश केला. गावोगावी कीर्तन करीत करीत तो बनसरी येथे पोहोचला. तेथे त्याला कळले की, गुहादित्य महाराज राजधानीत नाहीत. पण राजवाड्यात त्याचा यथोचित सत्कार झाला. राजमातेने त्याची कीर्तनेही ऐकली व त्याला विपुल धन दिले. "महाराजांना कीर्तन ऐकवावे अशी माझी फार इच्छा आहे," असे तो म्हणाला. तेव्हा त्याला सांगण्यात आले की, महाराज सीमेवर गेले आहेत. सीमेवर लोहगड नावाचा किल्ला आहे. त्याच्या डागडुजीचे काम चालू आहे. ते पाहण्यासाठी महाराज गेले आहेत. काही दिवस ते तिकडेच राहणार आहेत.

राजमातेची आज्ञा घेऊन सत्यकाम वाचस्पती लोहगडाकडे जायला निघाले. वाटेत लहानमोठ्या प्रत्येक गावी त्यांच्या येण्याची

बातमी गावप्रमुखाला आधीच कळली होती. प्रत्येक गावात त्यांची चांगली व्यवस्था ठेवली गेली. तीन दिवस प्रवास केल्यानंतर ते दाट अरण्यातून जाऊ लागले. अनेक चढउतार पार करता करता शेवटी ते एकदाचे लोहगडाजवळ येऊन पोहोचले.

पारी नदीच्या तीरावर उंच लोहगड उभा होता. पलीकडे मोठे थोरले मैदान होते. लोहगड त्या सगळ्या प्रदेशाचे रक्षण करणारा दुर्ग होता. थकले भागलेले सत्यकाम मोठ्या कष्टाने चढण चढू लागले. किल्ल्याला वळसा घेऊन, जेथे काम चालू होते तेथे राजमातेच्या दूताने त्यांना आणले. त्यांनी पाहिले तो तेथे चार–पाचशे मजूर काम करीत होते.

सत्यकाम म्हणाले, "अरे मला येथे कशाला आणलेस, मला महाराजांना भेटायचे आहे."

दूत म्हणाला, "महाराज येथेच आहेत. सत्यकामांनी पाहिले तो त्यांना समोर सगळे मजूरच दिसले. म्हणून ते थोडासा आवाज चढवून म्हणाले, "अरे महाराज कुठे आहेत ? मला त्यांच्याशी बोलायचे आहे. तू मला त्यांच्याजवळ घेऊन चल."

ते ऐकूनही दूत पुढेच चालला होता. शेवटी एका मजुरांच्या घोळक्याशी तो थांबला. ते सगळे मजूर पाण्यात बुडालेला भला मोठा ताशीव दगड बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या सगळ्यांच्या हातांत पहारी होत्या. काहींच्या जवळ मोठमोठे दोर होते. त्या सगळ्यांचे कपडे चिखलाने भरलेले होते. त्यांच्यापैकी एका कोवळ्या पण तेजस्वी तरुणापुढे हा दूत उभा राहिला आणि प्रणाम करून अतिशय आदराने म्हणाला, "महाराज आपणांस भेटण्यासाठी हे दूर देशचे कीर्तनकार आले आहेत."

तो तरुण म्हणाला, "अरे वा ! फार आनंदाची गोष्ट आहे ! बिशन, यांना त्या आंब्याच्या झाडाखाली नेऊन बसव. मी आता आलोच." विद्याधर पंडित मजुरांबरोबर काम करणाऱ्या आणि चिखलाने अंग माखलेल्या त्या राजाकडे पाहतच राहिले. राजा. . . . असा असू शकतो ???

गुहादित्याने त्या सगळ्यांबरोबर नदीत स्नान केले आणि मग ते सगळे बरोबरच जेवायला बसले. ज्वारीची जाड भाकरी, लसणाची चटणी, कांदा आणि कसली तरी पातळ पालाभाजी असा जेवणाचा थाट होता. सगळ्यांबरोबर गुहादित्यही जेवत होता. सगळ्यांबरोबर तो गप्पा मारीत होता. सत्यकाम वाचस्पतीही त्यांच्या उजव्या बाजूला जेवायला बसले होते. ते प्रवासात खूप थकले होते. त्यांना सपाटून भूक लागली होती. त्यामुळे ते जाडे-भरडे अन्न त्यांनी आनंदाने खाल्ले. पण पुन:पुन: त्यांच्या मनात एक विचार येत होता, "राजा असे अन्न खाऊ शकतो ? राजा इतका सगळ्यांबरोबर मिळू मिसळू शकतो ?"

त्या रात्री सगळ्यांसमोर सत्यकाम वाचस्पतींचे कीर्तन झाले. गुहादित्याने मोठ्या श्रद्धेने ते ऐकले आणि शेवटी त्यांची पूजा करून त्यांना तबकभर सुवर्णमुद्रा अर्पण केल्या. मग तो त्यांना म्हणाला, "महाराज, आपण राजनीती सोडून ईश्वरभक्तीकडे वळलात हे फार चांगले झाले. राज्याची सेवा म्हणजे सीमित सेवा आणि भजनकीर्तन म्हणजे ईश्वराची सेवा. राज्याची सेवा म्हणजे स्वार्थ आणि लबाडी. ईश्वरसेवा म्हणजे परोपकार आणि सचोटी. राज्याला भूगोलाच्या मर्यादा आहेत, स्थलाच्या मर्यादा आहेत. ईश्वरसेवेत मर्यादा नाहीत. विद्याधर या नावाच्या ऐवजी सत्यकाम

हे नावही आपण छान निवडले. हेच कार्य आता आपण पुढे चालवावे अशी माझी आपणांस विनंती आहे. ईश्वर आपणांस काहीएक कमी पडू देणार नाही."

त्याचे ते भाषण ऐकता ऐकता विद्याधर सामंताच्या अंगाला दरदरून घाम सुटला. विस्फारित नेत्रांनी तो गुहादित्याकडे पाहत राहिला. त्याच्या मनात अनेक प्रकारच्या विचारांनी गर्दी केली. त्याचा चेहरा घाबरल्यासारखा दिसू लागला. ते पाहून गुहादित्य म्हणाला, "महाराज, आपण आमच्या राज्यावर मोठे उपकार केले. आपल्या येण्यामुळे आमच्या गुप्तचरांची चांगली परीक्षा झाली. मी आपणावर थोडेही रागावलो नाही. तशी शंका आपण मुळीच येऊ देऊ नका. आपण वयाने, विद्येने व अनुभवाने थोर आहात. मी आपणांस प्रणाम करतो व आपल्या आशीर्वादाची याचना करतो."

विद्याधर सामंत नम्र होऊन म्हणाले, "महाराज, आपण मला उदार मनाने क्षमा केली हे पाहून मी धन्य झालो. ज्या राज्यातील गुप्तचरांचे काम इतके चांगले आहे, त्या राज्यात शत्रूचा प्रवेश कधीही होणार नाही. जो राजा आपल्या सैनिकां-बरोबर मिळूनमिसळून राहतो आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करतो तो कधीही अयशस्वी होणार नाही. तुला उदंड यश, आयुष्य, ऐश्वर्य आणि कीर्ती लाभो. मी जरी मालव देशात राहत असलो तरी तुझी सेवा मी आनंदाने करीन."

गुहादित्याने विद्याधर सामंतांचा पुन्हा एकदा योग्य सम्मान केला. त्यांना उंची कपडे दिले व त्यांच्या कमरेला सोन्याची मूठ असलेली तलवार बांधली. मिळालेल्या सुवर्णमुद्रा विद्याधर

सामंतांनी परत केल्या आणि त्या सगळ्या सैनिकांना दिल्या जाव्यात अशी इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे गुहादित्याने त्या सुवर्णमुद्रा सैनिकांना वाटून दिल्या. विद्याधर सामंत आपल्या घरी परत गेले. ते जेथे जात तेथे गुहादित्याची स्तुती करीत आणि म्हणत, "अहो एवढासा पोर पण काय त्याची बुद्धिमत्ता ! किती त्याचे कर्तृत्व ! पण इतके सगळे असून अंगी केवढी नम्रता ! राजा असावा तर असा असावा !" अशा रीतीने गुहादित्याचा कीर्ति-सुगंध आसपासच्या अनेक राज्यांत दरवळू लागला.

## २८ दुष्टांचे दमन करणारा राजा

रजतरेखा नदीच्या किनाऱ्यावर एक मोठा डोंगर होता. त्या डोंगरात एक गुहा होती. सुमेरसिंग नावाचा डाकू त्या गुहेत राहत असे. त्याने त्या गुहेला मोठ्या वाड्यासारखे रूप दिले होते. त्याने आपल्या पदरी शंभर सैनिक ठेवले होते. आसपासच्या सगळ्या राज्यांत अव्यवस्था होती. त्यामुळे सुमेरसिंगाला काहीच भीती उरली नव्हती. आपले शंभर सैनिक घेऊन तो कोणत्याही शहरात शिरत असे व मोठमोठ्या श्रीमंतांना लुटून आपल्या गुहेत परत येत असे. त्याचे नाव ऐकताच लोक चळचळा कापत असत. हळूहळू आसपासचे लहानमोठे राजे त्याला खंडणी देऊ लागले. "बाबारे हे एक लक्ष रुपये घे. दरवर्षी घेत जा. परंतु माझ्या राज्यात कोणाला त्रास देऊ नकोस."

हरखसिंह आणि खरकसिंह यांनीही सुमेरसिंगाला फार मोठी रकम देण्याचे कबूल केले होते. दोघांशीही त्याने अलग अलग

बोलणी केली होती. दोघांकडूनही तो विपुल धन उकळणार होता. परंतु ते दोघेही मारले गेले व एक नखाएवढा पोरगा भिल्लांचा राजा बनला आहे हे ऐकून त्याला मोठे आश्चर्य वाटले. त्याने आपले जितके म्हणून दूत टेहळणी करण्याकरिता पाठविले, तितके सगळे पकडले गेले व त्यांना गुहादित्याने कठोर शिक्षा दिली. हे पाहून सुमेरसिंगाचा अगदी जळफळाट झाला होता. शेवटी त्यानें स्वत:च एक योजना आखली.

बनसरी गावात शिखरचंद नावाचा धनिक व्यापारी राहत होता. त्याच्या वाड्याची माहिती सुमेरसिंगाला होती. फार वर्षांपूर्वी त्याने एकदा तो वाडा लुटलाही होता. तळघर कोठे आहे, पैसा कोठे ठेवला जातो, दागदागिने, सोनेनाणे कोठे असते वगैरे सगळ्या गोष्टी सुमेरसिंगाला माहीत होत्या. शेटजींचे नोकरचाकर कोण कसे आहेत हेही त्याला माहीत होते. त्या नोकरांपैकी जे प्रमुख होते त्यांना सुमेरसिंगाने मोकळ्या हाताने सुवर्णमुद्रा वाटल्या होत्या. गुहादित्य आपल्या सगळ्या सैन्यासह दूर सीमेवर आहे आणि किल्ल्याच्या कामात गुंतला आहे असे सुमेरसिंगाला कळले होते. ही संधी साधून त्याने आपली योजना पक्की केली.

अमावस्येच्या रात्री आपल्या शंभर सैनिकांसह तो निघाला. लूट आणण्याकरिता उंट, गाढवे, घोडे व इतर नोकरचाकर यांची नेहमीप्रमाणे कडेकोट व्यवस्था होती. सुमेरसिंग आणि त्याचे साथीदार सैनिक वायुवेगाने चालले होते. घोड्यांच्या टापांचा ताडताड आवाज होत होता. आसपासची घरे, झाडे हादरत होती. जणूकाही तीसुद्धा भीतीने कापत होती. सुमेरसिंग आज फार मोठ्या सिद्धतेने व आवेशाने निघाला होता. कारण गुहादित्याने

जिकडेतिकडे फारच कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे असे त्याने ऐकले होते. पण काय गंमत पाहा. सुमेरसिंगाला कोठेच काही विरोध आढळला नाही.

एका ठाण्यावर पंचवीस सैनिक होते. ते सरसावून पुढे आले, पण सुमेरसिंगाचे नाव ऐकताच ते दाही दिशांना पळून गेले. दुसऱ्या ठाण्यावरच्या लोकांनी चार हात केले. पण शेवटी तेही पळाले. अशी दहा ठाणी पार करीत सुमेरसिंग बनसरी येथे येऊन पोहोचला. मध्यरात्र उलटून गेली होती. जिकडेतिकडे सामसूम होती. कुत्री जोरजोराने भुंकत पुढे येत होती. पण एकाच्या पाठीत जोराने मारताच सारी केकाटत दूर पळत सुटली. कोठे कसलीही अडचण न येता सुमेरसिंग शिखरचंदाच्या वाड्याजवळ पोहोचला.

शिखरचंदाचा मुनीम जणूकाही त्याच्या स्वागतासाठीच बाहेर उभा होता. तो लगेच पुढे झाला. त्याने सुमेरसिंगाला वाकून प्रणाम केला आणि तो म्हणाला, "यावे महाराज, आम्ही आपलीच वाट पाहत होतो. शेठ शिखरचंद आपल्या मुलाबाळांसह सासुरवाडीला गेले आहेत. येथे राहिलेल्या सगळ्या नोकरमाणसांना मी वश केले आहे. सोन्याची किल्ली लावली की सगळी कुलुपे उघडतात. त्यामुळे आज आपल्याला कोठेही जाता येईल. ती सगळी व्यवस्था आधीच करून ठेवली आहे. भोजन तयार आहे. उंची दारूही आणून ठेवली आहे. आपण म्हणाल त्याप्रमाणे करू."

आत जाऊन सुमेरसिंगाने डोकावून पाहिले. भल्या मोठ्या अंगणात बिछायत घातली होती. चांदीच्या दोनशे थाळ्या तेथे मांडलेल्या होत्या. काहीतरी मसालेदार पदार्थ त्यात वाढला होता. त्याचा सुगंध सगळीकडे दरवळत होता. भुका लागल्या होत्या.

सगळेजण दूरची मजल मारून आले होते. लुटीचे काम झाल्या-सारखेच होते. अन्न पाहून सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटले आणि आधी जेवण उरकून घ्यायचे असे त्यांनी ठरविले.

तावडतोब सगळेजण त्या अन्नावर आडवा हात मारू लागले. दासदासी नवीन नवीन पदार्थ वाढू लागले. मद्याच्या सुऱ्या रिकाम्या होऊ लागल्या. जेवण संपतासंपताच एक सुंदर नर्तकी आली आणि एक तान छेडून तिनें नाचायला सुरुवात केली. घुंगरांच्या तालावर सगळेजण माना डोलावू लागले.

अगदी त्याचवेळी सुमेरसिंगाच्या महालात आपल्या दोनशे सैनिकांसह गुहादित्य जाऊन पोहोचला होता. तिथला सगळा थाटमाट पाहून गुहादित्याचे सरदार चकित झाले. "केवढी ही उंची बिछायत ! सगळीकडे मोत्यांच्या झालरी कशा चमकत आहेत ! अहो, या पाहा सोन्याच्या मूर्ती ! आणि ही हस्तिदंती रत्नजडित आसने, किती सुंदर आहेत !" असे उद्‌गार ते काढू लागले.

गुहादित्य म्हणाला, "हे सगळे फुकट मिळालेले आहे. येथे कमतरता कशाची असणार ? हे सर्व जनतेचे धन आहे, ते आपण जनतेला परत केले पाहिजे. चला ठरल्याप्रमाणे कामाला लागा."

सगळी योजना आधीच तयार होती. त्याप्रमाणे दहाच्या टोळ्या करून ते सगळेजण नेमलेली कामे करू लागले. गुप्तदूत गुप्तस्थाने दाखवू लागले. तळघरे उघडली गेली. सुवर्णमुद्रा फावड्याने भराव्या लागल्या. हिरे, मोती, जडजवाहिर, उंची बिछायत जरीचे आणि रेशमाचे कपडे असे सगळे सामान उंटांवर लादले गेले. सगळी कामे शांतपणे पार पडत होती. सगळे पहारे-

करी खांबांना बांधले गेले होते. कोणालाही वार करायचाही अवसर मिळाला नव्हता.

रक्ताचा एक थेंबही न सांडता सूर्योदयापूर्वी तो सगळा वाडा गुहादित्याच्या सैनिकांनी जसा काही स्वच्छ धुऊन काढला. दोनशे लादलेले उंट आणि दोनशे खेचरे दुसऱ्याच दिशेने बनसरीची वाट चालू लागली.

सुमेरसिंग आपली लूट घेऊन घरी पोहोचला. तेव्हा त्याला आपला भकास वाडा पाहून फार मोठा धक्का बसला. आजपर्यंत कोणीही त्याला असे चकविले नव्हते. त्याची सगळी संपत्ती गेली होती. त्याचा सगळा वचक आणि दरारा नाहीसा झाला होता. आता सगळे लोक त्याला हसणार होते. त्या सर्वांवर कडी म्हणजे गुहादित्य त्याच्या मुलीलाही आपल्याबरोबर घेऊन गेला होता. तिचे नाव कनकलता होते. तिच्यावर त्याचे जीवापलीकडे प्रेम होते. सापाच्या डोक्यावरचा मणी काढून घ्यावा तशी सुमेरसिंगाची स्थिती झाली. अंगावर शेकडो वार लीलेने झेलणारा सुमेरसिंग या घटनेने पार खचून गेला आणि कपाळाला हात लावून मटकन् खालीच बसला. सुमेरसिंग खाली बसला तो जवळजवळ उठलाच नाही. तो आजारी पडला. त्याने गुहादित्याला पत्र पाठवून अगदी दीनवाणे होऊन त्याची क्षमा मागितली.

गुहादित्याने कनकलतेशी बहिणीचे नाते जोडून तिला परत पाठविले आणि सुमेरसिंहाला त्याच्याच वाड्यात नजरकैदी म्हणून ठेवले. शिखरचंदाची सर्व संपत्ती त्याला परत मिळाली. सुमेर-सिंहाच्या वाड्यात मिळालेल्या संपत्तीचा विनियोग गुहादित्याने लोकोपयोगी कामे करण्यात केला. त्याने अनेक तलाव बांधले,

सडका तयार केल्या. जागोजागी विहिरी आणि धर्मशाळा बांधल्या. तलावातून आणि नदीचे पाणी अडवून कालवे काढले. भिल्ल-राज्यात जिकडे तिकडे लहानमोठ्या बागा डोलू लागल्या. घरोघरी दूधदुभते होऊ लागले. धनधान्याने कोठारे भरू लागली. लोकांच्या तोंडून उद्‌गार निघू लागले, "धन्य आहे आमचा राजा." "ईश्वरा त्याला उदंड आयुष्य दे." "राजा असावा तर असा असावा."

## २९ वल्लभीचे नागरिक

गुहादित्य राजसभेत बसला होता. त्याचे भिल्लराज्याचे अमात्य व प्रमुख सामंत आपापल्या ठिकाणी बसले होते. प्रजेची गाऱ्हाणी व मागण्या गुहादित्य ऐकत होता. ज्याचे जे काही म्हणणे असेल ते सगळे शांतपणे ऐकून घेऊन अमात्यांच्या विचाराने तो निवाडा देत होता. सगळ्या प्रकारांचा न्यायनिवाडा झाल्यानंतर दूतांनी येऊन सूचना केली की, "महाराज, वल्लभी नगरातील काही सामंत व काही नागरिक आपणांस भेटू इच्छीत आहेत." गुहादित्याने आपल्या अमात्यांशी विचार–विनिमय केला व म्हटले, "ठीक आहे, आणा त्यांना आत."

थोड्याच वेळात द्वारपालाने सात जणांना राजसभेत आणले. त्यांपैकी सहा तरुण होते व एक वृद्ध होता. त्यांच्या वेषावरून दोघेजण ब्राह्मण दिसत होते. दोघे व्यापारी दिसत होते व तिघे क्षत्रिय असावेत असे वाटत होते. सभेत आल्याबरोबर त्या सातांनीही नम्र होऊन अभिवादन केले आणि "भिल्लाधिपती

गुहादित्य महाराजांचा विजय असो," असा एकमुखाने जयजयकार केला.

नंतर त्यांपैकी दोघा ब्राह्मणांनी स्वस्तिवचन म्हटले व राजास आशीर्वाद दिला. त्यांपैकी एकजण शांत, सौम्य पण तेजस्वी दिसत होता. त्याच्या मुखमंडलावर उत्तम शीलाचे आणि विद्याभ्यासाचे तेज चमकत होते. तो थोडासा पुढे आला आणि म्हणाला, "महाराज माझे नाव गुणभद्र आहे व हा माझा लहान भाऊ मतिभद्र आहे. मतिभद्राने पुढे येऊन प्रणाम केला.

गुणभद्र पुढे बोलू लागला, "माझ्या वडिलांचे नाव शीलभद्र असे होते. ते वल्लभी राज्याचे अमात्य होते. वल्लभी राज्यावर परकीयांचे आक्रमण झाले. माझे वडील त्यातच मारले गेले. आम्ही दोघे भाऊ त्यावेळेला लहान होतो. आम्हाला घेऊन आमची आई कशीतरी लपतछपत राज्याबाहेर पडली. काही दिवस आम्ही अवंती नगरीत होतो. आमची आई तेथेच मामांकडे राहिली. आम्ही दोघे भाऊ विद्याभ्यासासाठी काशी येथे राहिलो. महा-महोपाध्याय तर्कचूडामणी पंडित विद्यानिधी मिश्र यांच्याजवळ आम्ही अध्ययन केले. षड्दर्शन शास्त्र, वाङमय, इतिहास व पुराणे यांचे मी अध्ययनके ले आहे. माझ्या भावाने गणित, ज्योतिष्य, भाषा आणि व्याकरण यांत प्राविण्य मिळविले आहे. अध्ययन पूर्ण केल्यानंतर आम्ही अवंतीला आलो व अवंतीहून दोन वर्षांपूर्वी आमच्या आईला घेऊन आम्ही वल्लभी येथे पोहोचलो. आम्ही हल्ली सप्तकुंज गावी लहानशी पाठशाळा चालवितो. ह्या दोघांचे नाव कांचनलाल व श्यामगोपाल असे •आहे.

त्यांचे नाव घेतल्याबरोबर त्या दोघांनी पुढे होऊन महा-राजास प्रणाम केला. मग गुणभद्र पुढे बोलू लागला. "ह्यांच्या

घराण्याला कुबेर अशी पदवी आहे. एके काळी धनिकतेसाठी यांची सर्व देशात प्रसिद्धी होती. पण गेल्या अठरा वर्षांत राज्यात अंदाधुंदी माजली. वारंवार जाळपोळ लुटालूट झाली. त्यामुळे कुबेराचे घराणे लयाला गेले. हे दोघेजण सप्तकुंज गावातच शेती करून राहतात. राज्यात व्यवस्था निर्माण झाली तर आपण आपले गतवैभव पुन्हा मिळवू शकू अशी त्यांना खात्री आहे."

मग दुसऱ्या दोघा तरुणांकडे हात दाखवून गुणभद्र म्हणाला, "महाराज, ह्या दोघांची नावे सुधीरसिंह व अधीरसिंह अशी आहेत. त्यांचे घराणे वल्लभी राज्यातील फार जुने व प्रतिष्ठित सामंत घराणे आहे. यांच्या वडिलांचे नाव अजयसिंह असे होते. वल्लभी नगरीचा पाडाव झाला त्यावेळी अजयसिंह व त्यांचे बंधू विजयसिंह यांनी शत्रूला मदत केली होती. पण अजयसिंह व विजयसिंह दोघेही शत्रूकडून मारले गेले. आपल्या घराण्याला लागलेला कलंक धुऊन काढावा अशी ह्यांची तीव्र इच्छा आहे.

"आणि हे वृद्ध आहेत, माखनसिंह, प्रसिद्ध सरदार लाखनसिंहाचे हे बंधू आहेत. वल्लभी राज्याची वाताहत झालेली त्यांना पाहवली नाही. जवळ जवळ आठ वर्षे वल्लभीराज्य सोडून ते देशोदेशी भटकत राहिले. थोडेसे स्थिरस्थावर झाल्यावर ते आपल्या लाखनपूर गावात परत आले. आपली गढी त्यांनी दुरुस्त केली व हळूहळू करता करता आता त्यांच्याजवळ एक हजार घोडेस्वार आहेत. वल्लभीराज्यातील अव्यवस्था आणि निर्नायकी दूर व्हावी अशी त्यांची इच्छा आहे."

माखनसिंह पुढे होऊन प्रणाम करून म्हणाले, "महाराज, आपला लौकिक आम्ही ऐकला आहे. आपण आमचे राज्य ताब्यात

घ्यावे, अशी आम्हा सर्वांची आपणांस विनंती आहे. आम्ही केवळ सातजणच हे म्हणतो आहोत असे नाही. आम्ही वल्लभी राज्यातील हजारो, नव्हे, लाखो लोकांचे प्रतिनिधी आहोत. महाराज, वल्लभी-राज्याची दुर्गती काय वर्णन करावी, कधी कोणाचा प्राण जाईल आणि कधी कोणाचे घरदार लुटले जाईल याचा काही एक भरवंसा राहिला नाही. तेथे रोज देवळे फोडली जात आहेत, गायी कापल्या जात आहेत आणि सुंदर तरुणी देशदेशांतराला नेऊन विकल्या जात आहेत. व्यापार, उद्योग नष्ट झाले आहेत. शेतकऱ्यांचेसुद्धा शेतीत मन लागत नाही कारण उभे शेत केव्हा कापले जाईल, किंवा धान्याचे कोठार केव्हा लुटले जाईल, याचा भरवसा राहिलेला नाही. धर्म, संस्कृती सगळे लोप पावले आहे. वल्लभी राज्यातील माणसे पशू बनत आहेत. राक्षस बनत आहेत. आपण यावे व आमचा राजा व्हावे अशी आमची आपणांस विनंती आहे. आपण येताच पाच हजार घोडेस्वार व पाच हजार पायदळ सैन्य आम्ही आपल्या स्वाधीन करू. याशिवाय आपले नाव ऐकून कितीतरी जुने सामंत व सरदार आपणांस येऊन मिळतील. गावोगावी आपले स्वागत होईल. लोक इतके नाडले व पीडले गेले आहेत, की यापुढे त्या स्थितीत जगणे त्यांना अशक्य झाले आहे. त्या सर्वांच्या वतीने आम्ही आपणांस बोलावणे करीत आहोत. महाराजाधिराज शीलादित्यांच्या मृत्यूनंतर काही दिवस बलाढ्यायनाने राज्य केले पण वर्षभरातच त्याचा खून झाला व सेनापती परमदत्त गादीवर आला. मदिरासक्त होऊन तो प्रजेला फार छळू लागला. आपल्या लोकांशीही तो उन्मत्तपणे वागू लागला. तेव्हा त्याला मारून राज्याची सगळी सूत्रे सत्रायणाने हातात घेतली. पाच वर्षांनंतर सत्रायण मेला. तेव्हा त्याचा मुलगा चित्रायण गादीवर बसला. ते

तिघे भाऊ होते. चित्रायण, विचित्रायण व चांद्रायण. त्या तिघांची राज्याकरिता खूप लढाई सुरू झाली. शेवटी छलकपटाने चित्रायण व विचित्रायण दोघेही मारले गेले आणि चांद्रायण गादीवर बसला. पण तो राजा नसून केवळ एक लुटारू आहे. त्याला कुठलाही धर्म माहीत नाही की, नीतिनियम माहीत नाही. तो पशूपेक्षाही पशू आहे. तो क्रूरकर्मा, विलासी व स्वार्थी आहे. महाराज, त्याच्या तावडीतून सर्वांना सोडवावे अशी वल्लभी प्रजेची आपणांस विनंती आहे."

ती सर्व हकीगत ऐकून गुहादित्याला फार खेद वाटला. तो शांतपणे म्हणाला, "वल्लभी राज्याच्या नागरिकांनो, तुमची ही स्थिती पाहून मला फार वाईट वाटत आहे. विनाकारण देश जिंकावे व लोकांचे धनधान्य लुटावे आणि आपला कोश भरावा हे मला मुळीच आवडत नाही. पण जनता दुःखी असणे ही गोष्ट तर मला मुळीच आवडत नाही. त्यासाठी मी काय वाटेल ते करीन. का कोण जाणे, पण वल्लभी राज्याबद्दल मला विशेषच आपलेपणा नेहमीच वाटत आला आहे. ते राज्य फार मोठे व चांगले होते, असे मी ऐकले आहे. ते दुर्बळ कशामुळे झाले व त्याचा एवढा नाश कसा झाला, हे जाणण्याची माझी फार इच्छा आहे."

सिंहासनाच्या मागे पडद्याआड राणी पुष्पावती बसली होती. तिने दिनेश्वराला खूण केली. त्याबरोबर दिनेश्वर उठून उभा राहिला आणि म्हणाला, "महाराज, मला आज्ञा व्हावी. तो सगळा वृत्तांत मी थोडक्यात सांगतो. वल्लभी राज्याचा जुनानवा इतिहास मला ठाऊक आहे."

गुहादित्य म्हणाला, "अवश्य सांगा, तो ऐकण्याविषयी मला फार उत्सुकता वाटत आहे.

दिनेश्वर क्षणमात्र गंभीर झाला. मनाने तो जणूकाही प्राचीन काळात गेला. त्याने आपले निवेदन सुरू केले.

## ३० वलभी राजघराण्याचे अमृतफळ

दिनेश्वर म्हणाला, "महाराज, वल्लभीचे हे घराणे सूर्यापासून उत्पन्न झाले आहे असे म्हणतात. या घराण्यातील राजपुरुष तेजस्वी व शीलवान असल्यामुळे त्याला शीलादित्य ही उपाधी प्राप्त झाली होती. या घराण्याचे संस्थापक रुद्रभट प्रथम शीलादित्य. जणू ईश्वराचे अवतारच होते. त्याग, सेवा, ईश्वरभक्ती, लोकसंग्रह हे त्यांचे विशेष गुण होते. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी राज्याची स्थापना केली. चोवीस वर्षे ते सतत परिश्रम करीत राहिले. त्यांनी जणूकाही रामराज्यच निर्माण केले. वयाच्या चाळीसाव्या वर्षी त्यांनी ह्या लोकाची यात्रा संपविली.

"त्यानंतर द्वितीय शीलादित्य गादीवर आले. ते अतिशय पराक्रमी होते. त्यांनी अनेक युद्धे जिंकली व राज्याची सीमा वाढविली. मालव नरेशाशी लढता लढता ते परमगतीला प्राप्त झाले. त्यांनी फक्त दहा वर्षे राज्य केले. पण त्या काळात संपूर्ण वल्लभी राज्यात शौर्याची लहर पसरली. तृतीय शीलादित्यांनी वडिलांचे राज्य चांगले सांभाळले. ते न्यायी व उदार होते. पण त्यांना शिकारीचा फार नाद होता. वयाच्या पन्नासाव्या वर्षी

शिकार करता करता ते वाघाकडून मारले गेले. त्यांचे पुत्र चतुर्थ शीलादित्य लहानपणीच गादीवर बसले. त्यांचे सुखोपभोगाकडे जास्त लक्ष होते. त्यांची आई राज्यकारभारात फार ढवळाढवळ करीत असे. त्यामुळे आपसातील भांडणे व गटबाजीला ऊत आला. त्यांच्या राज्यकालात राज्याच्या सीमा लहान झाल्या. अनेक शत्रू आत शिरले. चतुर्थ शीलादित्य निपुत्रिक होते. आपसातील यादवी-मध्ये त्यांचा वध झाला.

"त्यांचा पुतण्या साधुप्रवृत्तीचा होता. अमात्यांनी त्याल गादीवर बसविले. त्यांच्या अंगी अनेक सद्‌गुण होते. त्यामुळे राज्यात चहूकडे सुव्यवस्था निर्माण झाली. वयाच्या पन्नासाव्या वर्षी त्यांनी संन्यास घेतला व ते तीर्थाटनास निघून गेले. त्यांचा पुत्र सहावा शीलादित्य गादीवर बसला. पण तो दुर्व्यसनी होता. त्यामुळे राज्यात चहूकडे अनाचार माजला. त्यांनी वीस वर्षे राज्य केले.

"त्यानंतर त्यांचे पुत्र ध्रुवभट, सप्तम शीलादित्य गादीवर आले. ते उदार, पराक्रमी व गुणीजनांचे चाहते होते. ते कोणाचेही मन दुखवीत नसत. त्यांच्या राज्याचा प्रारंभकाळ फार चांगला होता. पण दुर्दैवाने स्वार्थी, कपटी आणि चाटुकार लोकांनी त्यांना घेरले. त्यांना मदिरेचे व्यसनही लागले. त्याच सुमारास पर्शियन यवनांच्या अनेक टोळ्या भारतात शिरल्या व जिकडेतिकडे धुमाकूळ घालू लागल्या. अकाटच्चायन नावाच्या पर्शियनाने वल्लभी राज्यावर आक्रमण केले. विलासीपणा, भित्रेपणा, स्वार्थी-पणा आदी दुर्गुणांनी ते राज्य पोखरले गेले होते. त्याही परिस्थितीत महाराज सप्तम शीलादित्य, सेनापती विक्रमसिंह,

अमात्य शीलभद्र, अंगरक्षक दिनेश्वर आणि सोमेश्वर या सर्वांनी पराक्रमाची शर्थ केली आणि वल्लभी नगर मोठ्या धैर्याने लढविले.

"पण हाय हाय, आता विजय प्राप्त होणार तेवढ्यात दैवाचे दान उलटे पडले. महाराज सप्तम शीलादित्य, सेनापती विक्रमसिंह आणि अमात्य शीलभद्र लढता लढता वीरगतीला प्राप्त झाले. त्यावेळी महाराणी पुष्पावती आपल्या माहेरी चंद्रावती येथे गेल्या होत्या. त्या गरोदर होत्या व बाळंतपण आटोपून परत येणार होत्या. पण यवनांच्या आक्रमणाची बातमी ऐकताच त्यांना चंद्रावतीत राहवेना. त्या वल्लभी येथे येण्यास निघाल्या. पण वाटेतच त्यांच्यावर दस्यूंनी आक्रमण केले. त्या झटापटीत धैर्य राखून व संधी साधून त्या एकटयाच निघाल्या आणि एका परोपकारी साधूच्या आश्रमात गेल्या. पुढे तेथून दुसऱ्या ठिकाणी जात असता एका गुहेत त्या प्रसूत झाल्या. त्यांनी एका तेजस्वी बालकाला जन्म दिला. तो गुहेत जन्मला म्हणून त्याचे नाव गुहादित्य असे ठेवण्यात आले."

"काय, गुहादित्य ?" गुणभद्र म्हणाला.

"काय, गुहादित्य ?" सुधीरसिंह म्हणाला.

"काय, हेच ते गुहादित्य ? मग हे तर आमचे वल्लभी नरेशच म्हणायचे !"

दिनेश्वर म्हणाला, "होय, हेच वल्लभी राजघराण्याचे खरे वारसदार आहेत ! तुमचे महाराज आहेत ! गेली अठरा वर्षे सर्व प्रकारच्या संकटांशी झुंज घेत आम्ही त्यांना सांभाळले व वाढवले आहे. पण आम्ही कसले सांभाळले ? आम्ही निमित्ताचे

धनी झालो ! वास्तविक पाहता ईश्वराची कृपा झाली, साधु-महाराजांचे आशीर्वाद मिळाले, महाराणी पुष्पावतींनी उग्र तपश्चर्या केली, त्यामुळे वल्लभी राजघराण्याच्या वृक्षाला हे अमृतफळ लागले !

"वल्लभीच्या नागरिकांनो, हे तुम्ही आणि हा तुमचा राजा. सर्व काही सांभाळा आता. मी आता थकलो, मोठ्या महाराजांनी दिलेली आज्ञा मी पूर्णपणे पाळली. माझे कर्तव्य मी पूर्ण केले. मी धन्य धन्य झालो ! महाराज, तुम्हाला उदंड यश, कीर्ती, आयुष्य आणि ऐश्वर्य लाभो ! बोला, वल्लभीनरेश श्री गुहादित्य महाराजांचा जयजयकार असो !"

सगळे सभागृह एकमुखाने गर्जून उठले, "वल्लभीनरेश महाराज गुहादित्यांचा जयजयकार असो . ."

हे सर्व सांगता सांगता दिनेश्वराचे अंत:करण भरून येत होते. त्याच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहत होत्या. हे सर्व ऐकता ऐकता सभागृहातील सर्व लोक अगदी तल्लीन झाले होते. गुहादित्य हा वल्लभीचा राजपुत्र आहे हे जेव्हा सर्वांना कळले तेव्हा सर्वांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. सगळ्यांचे बाहू स्फुरण पावू लागले. त्यांच्या आनंदाला सीमा राहिली नाही.

गुहादित्य सिंहासनावरून खाली उतरला. आत जाऊन त्याने आईचे पाय घट्ट धरले. आईने त्याला उचलून जवळ घेतले. त्याच्या मस्तकावरून तिने हात फिरविला आणि म्हटले, "बाळा, दीर्घायुषी हो, यशस्वी हो, कर्तव्यदक्ष हो, प्रजेला सांभाळणारा आणि सुख देणारा हो !"

दोन अश्रू गुहादित्याच्या मस्तकावर पडले. त्याने चमकून वर पाहिले आणि म्हटले, "नको, आई, दु:ख करू नको! तू किती भोगलेस, किती कष्ट सहन केलेस, त्याची मला कल्पनाही करवत नाही! आता यापुढे तुला कोणीही दु:ख देऊ शकणार नाही."



ती त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाली, "नाही बाळ, तू असल्यावर आता कोण मला दु:ख देऊ शकेल? पण

आता माझे काम संपले, हे तू लक्षात ठेव. तुझी पूर्ण व्यवस्था लागली. आता मी माझ्या घरी जाईन. तुझ्याकरिता म्हणून थांबले होते. ते माझी वाट पाहत असतील. . ."

"आई !" असे म्हणून गुहादित्याने पुष्पावतीला मिठी मारली. पुष्पावतीने शांतपणे त्याच्या डोक्यावरून हात फिरविला आणि म्हटले, "बाळ, तू क्षत्रिय आहेस, राजपुत्र आहेस, राजा आहेस आणि आता सम्राट होणार आहेस हे लक्षात ठेव आणि त्याप्रमाणे वाग. शांत हो. आणि आधी दिनेश्वरमामांना नमस्कार कर."

गुहादित्य बाहेर आला. धावत जाऊन त्याने दिनेश्वराच्या पायांवर डोके ठेवले. दिनेश्वराने त्याला उचलून घेतले व कडकडून आलिंगन दिले. पण लगेच स्वतःला सोडवून घेत तो म्हणाला, "महाराज, आपण सिंहासनावर बसावे."

गुहादित्य सिंहासनावर जाऊन बसला. दिनेश्वराने वल्लभी-नरेश या नात्याने त्याला झुकून प्रणाम केला आणि त्याच्या चरणांशी सुवर्णमुद्रा अर्पण केल्या. त्याच्या मागोमाग सुधीरसिंह व अधीरसिंह, कांचनलाल व श्यामगोपाल, गुणभद्र व मतिभद्र, सरदार माखनसिंह, या सर्वांनी सिंहासनापुढे येऊन प्रणाम केले व जवळ होत्या तेवढ्या सगळ्या सुवर्णमुद्रा त्यांच्या चरणाशी ओतल्या. भिल्ल राज्यातील सामंतांनी व गुहादित्याच्या सर्व बालमित्रांनी त्याचा मोठ्या आनंदाने सत्कार केला. आंधळा दर्शनसिंह तर आनंदाने नाचू लागला.

हा सर्व समारंभ होत आहे तोच सभागृहाच्या दारात साधु-महाराज येऊन उभे राहिले. गुहादित्य सिंहासनावरून उतरला.

धावत जाऊन त्याने साधुमहाराजांच्या चरणावर डोके ठेवले. साधुमहाराजांनी त्याला मुक्तकंठाने आशीर्वाद दिले.

## ३१ आक्रमणाची योजना

चार दिवसांत आक्रमणाची योजना तयार झाली. वल्लभीच्या नागरिकांचा यथायोग्य सत्कार करण्यात आला. आणखी चार दिवसांनी ते वल्लभी राज्यात जाऊन पोहोचले. त्यांच्याबरोबर दिनेश्वरही आला होता. दिनेश्वराने आपल्याबरोबर विपुल सुवर्णमुद्रा आणल्या होत्या.

सामंत माखनसिंहानी आपली सगळी सेना नीट सिद्ध केली. गुहादित्याने दिलेल्या द्रव्याच्या आधारे नवे सैन्य उभे करण्याचे काम त्यांनी जोरात सुरू केले. राज्याचा पश्चिम विभाग अर्थात राजधानी-पासून तो समुद्रापर्यंतचा सगळा भाग त्यांनी निर्यवन करायचा, असे ठरले होते. हे काम त्यांना पंधरा दिवसांत करावयाचे होते. त्या भागात असलेल्या पर्शियनांच्या सगळ्या छावण्या त्यांना कापून काढावयाच्या होत्या. पर्शियनांची ठाणी मोडून त्या जागी आपली ठाणी स्थापावयाची होती. माखनसिह मोठ्या उत्साहाने आपल्या उद्योगाला लागले.

अधीरसिह आणि सुधीरसिह यांना बरोबर घेऊन दिनेश्वर वल्लभी नगरीत येऊन पोहोचला. त्यांचा जुना वाडा उध्वस्त झाला होता. किशनचंद नावाच्या एका व्यापाऱ्याच्या ताब्यात तो सगळा भाग होता. सुधीरसिह आणि अधीरसिह त्याला आपला

वाडा मागू लागले. तेव्हा तो म्हणाला, "तुमच्या वडिलांना दिलेल्या कर्जापोटी मी आता त्याचा मालक झालो आहे. व्याजासकट तुम्ही माझी रकम मला द्या आणि आपला वाडा परत घ्या. मला हे पडके खिडार ठेवून काय करायचे आहे ?"

दिनेश्वर म्हणाला, "तुमची एकंदर रकम किती होते ?"

किशनचंद म्हणाला, "दहा हजार सुवर्णमुद्रा".

दिनेश्वर म्हणाला, "मी या मुलांचा मामा आहे. मी मालव राज्यात राहतो. हा घराण्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. संध्याकाळपर्यंत मी पैशाची काहीतरी जमवाजमव करतो आणि तुम्हाला येऊन सांगतो."

दिनेश्वर त्या दोघांना घेऊन तडक निघाला आणि वाड्याच्या आसपास फिरू लागला. त्या पडक्या वाड्यात वरखाली चढून सगळी जुनी रचना त्याने एकदा डोळ्यापुढे आणली. एके ठिकाणी बरीच काटेरी झुडपे उगवली होती. त्यांमध्ये तो शिरला. तिथला सगळा भाग बंद आहे हे पाहून त्याला मोठा आनंद झाला. तो तसाच बाहेर पडला आणि मग काही वेळ नगरात फिरत राहिला. त्याने काही महत्त्वाच्या जागा हेरल्या. खास विश्वासाच्या काही जुन्या मंडळींना तो भेटला नंतर त्या तिघांनी जेवणखाण आटोपून थोडी विश्रांती घेतली. मग ते पुन्हा बाहेर पडले. दिनेश्वराने आपल्याबरोबर दहा हजार सुवर्णमुद्रा घेतल्या होत्या. श्रेष्ठी किशनचंदाजवळ जाऊन त्यांनी त्या दहा हजार सुवर्णमुद्रा त्याला दिल्या व सुधीरसिंह आणि अधीरसिंहाचा जुना वाडा ताब्यात घेतला.

दुसऱ्या दिवशी त्यांनी फार मोठ्या संख्येने मजूर आणि गवंडी कामावर लावले. बाहेरच्या भिंतीपासून तो आतल्या दिवाणखान्यापर्यंत जिकडे तिकडे डागडुजी व स्वच्छता सुरू झाली. सगळी झाडेझुडपे जाळली गेली. साप, उंदीर, घुशी इत्यादी प्राणी मारले गेले. मग एके दिवशी सकाळी सुधीरसिंह आणि अधीर-सिंह यांना बरोबर घेऊन दिनेश्वर तेथील विहिरीत उतरला आणि तेथून गुप्त तळघरात शिरला. पडझडीमुळे ती वाट बुजली होती. ती त्यांनी स्वच्छ केली. अठरा वर्षांपूर्वीच्या आठवणीने इकडेतिकडे शोध घेत घेत दिनेश्वर नेमका हव्या त्या खोलीत शिरला.

मध्यंतरीच्या काळात तेथे अनेकदा पाणी साचले होते, गाळ जमला होता. मशाली घेऊन दिनेश्वराने त्या खोलीत सगळीकडे फेऱ्या मारल्या आणि मग कुदळीने जमीन उकरावयास सुरुवात केली. पहिली कुदळ मारताच खण्ण असा आवाज आला. तो ऐकताच दिनेश्वराचा आनंद गगनात मावेना. सुधीरसिंह व अधीरसिंह चकित नेत्रांनी पाहू लागले. तिघांनी मिळून भराभरा तेथील माती बाजूला केली. तेथे भला मोठा हंडा होता. कुदळी मारून दिनेश्वराने हंड्याचे झाकण फोडले. लखलखीत सुवर्णाच्या हजारो मुद्रा त्या हंड्यात भरल्या होत्या. त्यात हात घालून दिनेश्वर म्हणाला, "घ्या, तुम्हाला द्रव्य हवे आहे ना ? तुमच्याच घरचे हे द्रव्य आहे. त्याचा तुम्ही मुक्तपणे उपयोग करा व मोठी थोरली सेना उभारून वल्लभी राज्याची एकनिष्ठेने सेवा करा."

सुधीरसिंह म्हणाला, "नाही. हे धन आमचे नाही. हे राज्याचे धन आहे. भूमिगत धन राजाचे असते. हा वाडा आमच्या पूर्वजांचा असेल, पण आम्ही तो गमावला होता. तुम्ही आमच्या नावाने तो पुन्हा विकत घेतला असला तरी द्रव्य तुम्ही दिले आहे,

हे आम्हाला विसरता येत नाही. शिवाय आमच्या पूर्वजांनी अन्यायाने धन मिळविले होते, असे आम्ही ऐकत आलो आहोत. ते कलंकित धन आम्हाला नको आहे. आम्ही स्वत:च्या बळावर, पराक्रमाने व न्यायाने जे काही मिळवू तीच आमची खरी संपत्ती होईल. हे धनही आम्हाला नको व हा वाडाही आम्हाला नको. सध्या आम्हाला तुम्ही पाच हजार सुवर्णमुद्रा द्या. म्हणजे आम्ही शक्य तितक्या लवकर नवी सेना उभी करतो व योजनेप्रमाणे पौर्णिमेच्या आत वल्लभी नगरीचा पूर्वेकडील भाग निर्यवन करून तेथे आपली ठाणी स्थापन करतो."

दिनेश्वर म्हणाला, "हा वाडा तुमचाच आहे व हे धनही तुमचेच आहे. अजयसिंह आणि विजयसिंह कुमार्गी असले तरी त्यांचे वाडवडील चांगले होते. पण हा वाद येथे नको. गुहादित्य महाराज याचा काय तो निर्णय देतील."

मग ते बोलणे तेथेच थांबले. तिघेही कामाला लागले. त्यांनी ती खोली स्वच्छ केली. मोहोरांनी भरलेले एकशेवीस हंडे तेथे होते. खोलीचा मार्ग त्यांनी व्यवस्थित रीतीने बंद केला. ते वर आले आणि आपापल्या उद्योगाला लागले.

आवश्यक तेवढे द्रव्य घेऊन सुधीरसिंह व अधीरसिंह सेनेची जमवाजमव करू लागले. त्यासाठी ते गावोगावी हिंडू लागले. घोडे व शस्त्रास्त्रे विकत घेऊ लागले. दिनेश्वर वाड्यातच राहू लागला. जुन्या एकनिष्ठ लोकांचा शोध घेऊन तो त्यांच्या गाठीभेटी घेऊ लागला. त्यांची मने नव्या योजनेकरिता तयार करू लागला.

कांचनलाल आणि श्यामगोपाल नगरात जिकडे तिकडे गुप्त दूत पेरीत होते. यवनराज चांद्रायणाच्या सेवेत असलेल्या नोकरांना

विकत घेण्याचा प्रयत्न करीत होते. गुणभद्र व मतिभद्र दक्षिणेकडे गेले होते. गुहादित्य आपले सगळे सैन्य घेऊन उत्तरेकडून येणार होता. सगळेजण अतिशय उत्साहाने पण गुप्तपणे आपापली कामे करीत होते.

## ३२ व्यसनासक्त चांद्रायण

पौर्णिमा जवळ येत होती. यवनराज चांद्रायणाचा तो जन्मदिवस होता. त्या दिवशी सगळ्या वल्लभी राज्यात उत्सव साजरा केला जावा असा त्याचा आदेश होता. वल्लभी नगरीत विशेष उत्साहाने तयारी चालली होती. राज्यातील मोठमोठे सामंत आणि सरदार राजधानीत आले होते. दूरदूरच्या गाणाऱ्या व नाचणाऱ्या मंडळ्या आपापली वाद्ये घेऊन नगरात आल्या होत्या. गेल्या पंधरा दिवसांपासून त्यांनी आपला तळ नगरात ठोकला होता. मोहल्ल्या–मोहल्ल्यातून व लहानमोठ्या सरदारांकडे त्यांचे कार्यक्रम चालू होते.

राजवाड्यामध्ये जिकडे तिकडे चमचमाट आणि लखलखाट होता. सगळ्या नोकरांनी नवे कपडे घातले होते. सगळ्यांच्या अंगावर लहानमोठे दागिने चमकत होते. नाना प्रकारच्या खाद्यान्नांचा वास चहूकडे दरवळत होता. प्राय: सर्वजण कमीअधिक मदिरा प्यालेले होते. जुनी धुंदी उतरायच्या आत नवी धुंदी चढत होती.

गेले आठ दिवस झाले, चांद्रायणाने स्वत:ला जणूकाही जनानखान्यातच कोंडून घेतले होते. स्त्रिया, दासदासी आणि

मदिरा यांच्या उपभोगात तो मग्न होता. राज्यकारभाराची तेथे कोणालाच आठवण उरली नव्हती. कोणी मंत्री जर भेटायला आला, तर त्याला प्रवेश मिळणे कठीण होते.

उत्सवाच्या खर्चासाठी जमीनदारांकडून मोठमोठ्या रकमा घेतल्या जात होत्या. त्यासाठी नाना प्रकारचे अत्याचार केले जात होते. रतनपूरचा तेजस्वी तरुण जमीनदार दिलीपसिंह जेव्हा खंडणी देत नाही असे म्हणाला तेव्हा त्याला झाडाला उलटे टांगण्यात आले होते. त्याला फटके मारण्यात आले होते. त्याच्या म्हाताऱ्या आईने आपल्या लेकीसुनांच्या अंगावरचे सगळे दागिने काढून ते अधिकाऱ्यांसमोर ओतले. तेव्हा ते अधिकारी काहीसे समाधान पावले. त्यांनी दिलीपसिंहाला सोडले. पण दिलीपसिंहाच्या सुंदर लहान बहिणीला त्यांनी पळवून नेले. मिळालेल्या दागिन्यांपैकी त्यांनी अर्धे राजकोषात जमा केले व अर्धे आपसात वाटून घेतले.

असे प्रकार गावोगावी झाले. गावोगावचे दिलीपसिंह चवताळले होते. दातओठ खात होते. मुठी आवळत होते. "या दुष्टांना मारले पाहिजे, ठोकले पाहिजे. . . . हाकलून लावले पाहिजे. . . ." असे विचार हजारो तरुणांच्या अंत:करणात उफाळून येत होते.

पण चान्द्रायणाला या सगळ्या गोष्टींची वार्ता नव्हती. त्याला थोडीही चिंता वाटत नव्हती. त्याला आपल्या शक्तीचा गर्व होता. यवनसेनेचा आणि यवन अधिकाऱ्यांचा त्याला फार मोठा भरवसा वाटत होता. वल्लभी राज्यातले सगळे नागरिक दुर्बळ, भित्रे, स्वार्थी आणि स्वाभिमानशून्य आहेत याची त्याला

पुरेपूर खात्री पटली होती. या सर्वांवर कडी म्हणजे तो व्यसनात इतका जास्त गुरफटला होता की, दिवसाचे काही क्षणदेखील तो शुद्धीवर नसे. त्याचे हितचिंतक जरी त्याला काही सांगू लागले तरी तो त्यांचे मुळीच ऐकत नसे.

नाच व गाणे अगदी रंगात आले होते. एका दिवाणखान्यात भला मोठा गालीचा अंथरलेला होता. त्यावर जागोजागी गाद्या टाकलेल्या होत्या. त्याच्यावर लोड होते. लोडांच्या बाजूला गिर्द्या होत्या. अशा पंचवीस गाद्या तेथे होत्या. प्रत्येक गादीवर चांद्रायणाच्या पाच पाच बायका बसल्या होत्या. त्या सगळ्या दारूच्या नशेत होत्या. त्यांचे कपडे अस्ताव्यस्त होते. मध्यभागी एका मोठ्या गादीवर चांद्रायण बसला होता. त्याच्या दोन्ही बाजूंना त्याच्या दोन दोन बायका बसल्या होत्या. चांद्रायण एक-सारखी दारू पीत होता. त्याच्याजवळ बसलेल्या बायका स्वत: पीत होत्या व चांद्रायणालाही पाजत होत्या. महालाच्या मध्यभागी तीन स्त्रिया नाचत व गात होत्या. मृदंगाच्या तालावर सगळ्या जणी माना डोलवत होत्या. मधून मधून वाहवा म्हणत होत्या. एकमेकींना मिठ्या मारीत होत्या. तेथील कोणालाही आपल्या कपड्यांचे भान नव्हते की आपण काय बोलतो करतो आहोत याचे भान नव्हते. नाचणारीच्या गिरक्यांबरोबर सगळ्यांची मने गिरक्या घेत होती. ते सगळेजण जणूकाही हवेत तरंगत होते.

बाहेर कडेकोट बंदोबस्त होता. नागव्या तरवारी घेऊन काळ्याकुट्ट हबशिणी दारावर उभ्या होत्या. महालाबाहेर पार्शिक यवनांचे पहारे होते. सेनापतीचे व अमात्यांचे अनेक दूत त्यांनी परतवून लावले होते.

राज्यातील अनेक ठिकाणांहून विचित्र बातम्या येत होत्या. कोठे ठाणी लुटली जात होती, कोठे पर्शियन यवन मारले जात होते. अनेक ठिकाणी सांमंतांनी कर देण्याचे नाकारले होते. काही लोक उघड उघड बंडाची भाषा बोलू लागले होते. ह्या सगळ्या बातम्या ऐकता ऐकता चान्द्रायणाचा अमात्य अतिकाय अगदी संत्रस्त झाला. शेवटी त्याने स्वत: जनानखान्यात शिरून चान्द्रायण महाराजांची भेट घ्यायचे ठरविले.

त्याने आपल्याबरोबर आणखी दोघा मोठ्या अधिकाऱ्यांना घेतले. त्या तिघांनी जनानखान्यात प्रवेश केला व शिपायांना दमदाटी करीत ते चान्द्रायण महाराजांसमोर येऊन उभे राहिले.

त्यांना पाहताच चान्द्रायण महाराज ताडकन उठून उभे राहिले आणि म्हणाले, "तुम्ही इथे कसे आलात ? का आलात ? कुणी सोडले तुम्हाला आत ? तुम्हाला काही लाज शरम वाटते की नाही ? तुम्ही इथला नियम का तोडला ?"

अतिकाय हात जोडून म्हणाला, "महाराज, गेल्या पंधरा दिवसांत आमच्यासारख्या मोठ्या अधिकाऱ्यांनाही तुमचे दर्शन घडले नाही. अनेक गोष्टी सांगायच्या आहेत. अनेक गोष्टी विचारायच्या आहेत. सकळी कामे खोळंबली आहेत. गावोगावी बंडे होत असल्याच्या बातम्या येत आहेत."

त्याचे बोलणे तेथेच तोडून चान्द्रायण त्याच्या अंगावर खेकसला, "काहीतरी काय बोलता ? कोणाची हिंमत आहे माझ्याविरुद्ध बंड करण्याची ? तुम्ही कशाकरिता आहात ? लोक बंड करतात आणि तुम्ही काय करता ? राज्याची कामे का तुंबतात ? पौर्णिमा होऊ द्या. सगळी बंडे मी कशी ठीक करतो पाहा. आज आधी तुमच्यापासूनच सुरू करतो."

जवळच्या घंटेवर टोला मारताच नागव्या तलवारी घेतलेल्या व पुरुषी वेष घातलेल्या चार हबशिणी तेथे आल्या. चान्द्रायण ओरडला, "उडवा यांची मुंडकी."

ते तिघेही थरथर कापू लागले. अमात्यांबरोबर आलेला अधिकारी हात जोडून म्हणाला, "महाराज, हे अमात्य अतिकाय आहेत. दुसरे केशरसिंह आपले मोठे सामंत आहेत आणि मी आकाशदत्त आपल्या गुप्तचर विभागाचा मुख्य आहे. आम्ही जिवावर उदार होऊन येथे आलो याचे कारण तसेच महत्त्वाचे आहे. राज्यात सगळीकडे असंतोष आहे. जिकडे तिकडे गुप्त कट चालू आहेत. अनेक सामंत नव्या सेना उभ्या करीत आहेत. आपल्या ईशान्य सीमेवरील भिल्ल राजा आपल्यावर आक्रमण करण्याची योजना बनवीत आहे. महाराज सावध व्हा नाहीतर फार मोठा धोका होणार आहे. आपल्या जिवाला धोका आहे. कदाचित पौर्णिमेच्या दिवशीच सगळीकडे अंधार पसरणार आहे."

महाराज चान्द्रायणांनी पुन्हा एक प्याला मदिरा झोकली आणि मग ते रागावून म्हणाले, "इथे येतोस आणि मला शिकवतोस ? एवढी तुझी हिंमत आहे ?" हबशिणींकडे पाहून तो म्हणाला, "पाहत काय राहिला आहात ? तुम्हाला सांगितले ना ? उडवा या तिघांची मुंडकी !"

त्या राक्षशिणींनी सरसर तलवारी चालवल्या. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. अतिकाय, केशरसिंह आणि आकाशदत्त, तिघेही तेथल्या तेथेच ठार झाले. दहा दासी धावतच तेथे आल्या. त्यांनी ती प्रेते तेथून उचलली. ती जागा स्वच्छ करण्यात आली. तेथे सगळीकडे अत्तर शिंपडण्यात आले. धूपदाणीत सुगंधी द्रव्ये

टाकली गेली, तंतुवाद्ये बोलू लागली, तुंई कुंई----तुंई कुंई----तुंई कुंई. पायातल्या घुंगरांचा मंजुळ ध्वनी चहूकडे घुमू लागला. रुम झुम--रुम झुम रुम झुम . . . पेल्यावर पेले रिकामे होऊ लागले.

## ३२ जन्मोत्सवाऐवजी मरणोत्सव

चतुर्दशीच्या दिवशी वास्तविक जन्मोत्सवाची फार मोठी तयारी चाललेली असायची पण त्याऐवजी त्या दिवशी वल्लभी नगरीत चहूकडे नुसता हलकल्लोळ माजला होता. बातम्यांचे जणू काही पेव फुटले होते. समुद्राच्या लाटा एकामागोमाग येतात तशा नव्या नव्या वार्ता येऊ लागल्या.

"दक्षिणेकडील सगळ्या ठाण्यांवरचे पर्शियन अधिकारी मारले गेले. तिकडल्या भागात गुणभद्र आणि मतिभद्र यांनी मोठी सेना जमवली आहे. ते प्रदेश जिंकत राजधानीकडे येत आहेत."

"सामंत माखनसिंहांनी सगळा समुद्रकिनारा आपल्या ताब्यात घेतला आहे. सगळ्या जलदुर्गांवर वल्लभी राज्याचे ध्वज फडकू लागले आहेत. यवनदुर्गाधिपतींना मारून माखनसिंहांनी नवे दुर्गाधिपती नेमले आहेत. . ."

"सुधीरसिंह आणि अधीरसिंह यांनी बंड पुकारले आहे. घोडेस्वारांच्या टोळ्या जमवून ते सरकारी खजिने लुटत आहेत. अचानक छापा घालून त्यांनी चान्द्रायणाच्या दोन्ही पुतण्यांना कैदेत टाकले आहे. . ."

"भिल्ल राजाची सेना वल्लभी राज्याच्या सीमेवर गोळा झाली आहे. उत्तरेकडून फार मोठे आक्रमण होणार आहे. . ."

"महाराज ध्रुवभट सप्तम शीलादित्यांचा पुत्र प्रगट झाला आहे, राणी पुष्पावती त्याला घेऊन अज्ञातवासात राहत होती. ती लवकरच्च येथे येणार आहे. . .

अशा अनेक बातम्या वाऱ्यासारख्या पसरू लागल्या. जिकडे तिकडे भीतीचे वातावरण निर्माण झाले. धावपळ होऊ लागली. श्रीमंतांनी आपल्या धनदौलतीची लपवालपव सुरू केली. दुकाने बंद झाली. घराघरांतून लोक लपून बसले. दारे-खिडक्या बंद करून घरांच्या लहान लहान झरोक्यांतून लोक वाकून डोकावून पाहू लागले. अनेकांनी आपल्या गच्च्यांवर दगडधोंडे जमविले. अनेकांनी आपल्या ऐपतीप्रमाणे वाड्याभोवती पहारेकरी उभे केले.

चान्द्रायणाच्या राणीवंशात फारच गडबड उडाली. अनेक दासी राजवाडा सोडून पळून गेल्या. अनेक सेवकांनी पळायची तयारी केली.

रात्रीच कोठून तरी हूल उठली, "आले आले आले. नगरातील कल्लोळ ऐकू येऊ लागला. दूर कोठे तरी मोठमोठ्या आगी लागल्याचे दिसू लागले. चान्द्रायणाच्या राण्या रडू ओरडू लागल्या. उगीचच इकडून तिकडे पळू लागल्या.

इतके सर्व झाले तेव्हा चतुर्दशीच्या रात्री चान्द्रायण काहीसा शुद्धीवर आला. राणीवसा सोडून तो बाहेर पडला व राजसभेत आला. तेथे आल्याबरोबर अनेक सामंतांनी व सरदारांनी त्याला घेरले आणि वस्तुस्थिती सांगितली. तो एकदम त्यांच्या अंगावर खेकसला, "चूप बसा रडक्यांनो. तुम्ही सगळे लवकर जा आणि दोन घटकांच्या आत आपापल्या सेना घेऊन माझ्यापुढे उपस्थित व्हा."

महाराज शुद्धीवर आले हे पाहून सेनापती मयसेनाच्या अंगात नवा उत्साह संचरला. त्याने सगळ्या सेनाधिकाऱ्यांना बोलावून मोर्चेबंदी केली. नगराध्यक्ष हयसेनाने नगराचे सगळे दरवाजे बंद केले आणि सर्व महत्त्वाच्या ठिकाणी पहारा ठेवला. रात्रभर चान्द्रायण सगळ्या नगरात फिरत होता व सूचना देत होता. आपण नगराचा अगदी कडेकोट बंदोबस्त केला आहे अशा अभिमानाने मध्यरात्रीनंतर तो राजसभेत परत आला व सिंहासनावर बसला. शांत मनाने तो आता मदिरा पिणार होता. पण एकामागोमाग दूतांनी भयंकर पराभवाच्या बातम्या आणल्या. तो चरफडला, चवताळला आणि अधिकाऱ्यांना नवे नवे आदेश देऊ लागला.

दहा हजारांची सेना त्याने राजसभेसमोरील पटांगणात उभी केली. त्या सेनेला घेऊन तो सकाळी दिग्विजयासाठी निघणार होता. त्याप्रमाणे सूचना देऊन तो आता राजप्रासादात जाणार इतक्यात पहाट झाली. आकाशात लाल छटा दिसू लागली तोच एक भला मोठा अग्निबाण आकाश चिरत गेला. ती सांकेतिक खूण होती. तो जळता बाण पाहताच जागोजागी दडून बसलेले गुहादित्याचे सैनिक बाहेर पडले आणि त्यांनी जयजयकार केला, "वल्लभीनरेश अष्ट शीलादित्य श्रीगुहादित्य महाराजांचा जयजयकार असो." घराघरांतून, गल्लीबोळातून, तोच प्रतिध्वनी उमटू लागला. "वल्लभीनरेश अष्टम शीलादित्य श्रीगुहादित्य महाराजांचा जयजयकार असो. . ."

ते ऐकून चान्द्रायण रागाने लाल झाला. तो हयसेन आणि मयसेन यांना म्हणाला, "कोण आहेत हे लोक ? पकडा त्यांना, करा त्यांची कत्तल."

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा

पण तितक्यात शिंगे, कर्णे आणि तुताऱ्या ऐकू येऊ लागल्या. चान्द्रायणाने वळून पाहिले. हत्तीवर वल्लभी राज्याचा ध्वज उभारला होता. त्याच्या मागे पुढे प्रचंड सेना येत होती. त्या सेनेचे नेतृत्व एक कोवळा पोरगा करीत होता. धावत धावत अनेक दूत चान्द्रायणाजवळ आले आणि म्हणाले, "महाराज घात झाला. सगळे दरवाजे उघडले गेले. सगळ्या बाजूंनी गुहादित्याची सेना आत शिरली आहे. आपले अनेक सैनिक व अधिकारी गुहादित्याला वश झाले आहेत."

चान्द्रायणाने दातओठ खाऊन हयसेन व मयसेन यांना आज्ञा दिली, "ताबडतोब शत्रूवर आक्रमण करा." हयसेन व मयसेनांनी आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा दिली, "ताबडतोब शत्रूवर आक्रमण करा." सेनाधिकाऱ्यांनी सैनिकांना आज्ञा दिली," ताबडतोब शत्रूवर आक्रमण करा."

पण काय आश्चर्य, चान्द्रायणाच्या सेनेतील हजारो सैनिकांनी व अनेक सेनाधिकाऱ्यांनी आतापर्यंत लपवून ठेवलेले लहान लहान वल्लभी राज्याचे झेंडे उंच केले व त्यांनी गुहादित्याचा प्रचंड जयजयकार केला.

चान्द्रायणाला धरणी दुभंगल्यासारखे वाटले. पण आता काही केले तरी आपण मरणार हे त्याच्या लक्षात आले. दोन्ही हातांत मोठमोठ्या तलवारी घेऊन त्याने उडी मारली व समोर दिसतील त्यांना तो कापून काढू लागला. हयसेन आणि मयसेन यांनीही त्याचेच अनुकरण केले. अनेक पर्शियन यवनसैनिक त्यांना येऊन मिळाले. भयानक रण माजले. पण थोड्याच वेळात चान्द्रायण, हयसेन, मयसेन व त्यांना साथ देणारे यवनसैनिक ठार

झाले. राजवाड्यावर, महाद्वारावर व सर्व महत्त्वाच्या स्थानांवर वल्लभी राज्याचा गैरिक ध्वज फडकू लागला.

गुहादित्याच्या योजनेप्रमाणे सगळे काही व्यवस्थित पार पडले. विशेष रक्तपात न करता आपण वल्लभी नगर जिंकावे अशी त्याची इच्छा होती. त्याप्रमाणे सर्व घडले. गुहादित्याची कीर्ती ऐकून व त्याची तेजस्वी मूर्ती पाहून हजारो सैनिक त्याला येऊन मिळाले. जिकडे त्याने पाऊल टाकले तिकडे आपोआप दरवाजे उघडले गेले. सैनिकांनी आणि नागरिकांनी त्याचे स्वयंस्फूर्त स्वागत केले.

नगरात प्रवेश करताना गुहादित्य खाली वाकला आणि त्याने दारातील धूळ आपल्या मस्तकाला लावली. ते दृश्य पाहून सर्वांची शरीरे रोमांचित झाली. सभागृहासमोर त्याने साष्टांग दंडवत घातला. राणी पुष्पावती त्याच्या मागोमाग घोड्यावर बसून येत होती. नागरिक तिच्याही नावाचा जयजयकार करीत होते. ती खाली मान घालून बसली होती.

राजसभेत पोहोचल्यानंतर गुहादित्याने आपल्या सर्व अधिकाऱ्यांना बोलावून योग्य आदेश दिले. सगळीकडे विजयोत्सवाची तयारी होऊ लागली.

गुहादित्य आणि दिनेश्वराला घेऊन महाराणी पुष्पावती तडक कमलनेरला गेली. कमलनेर गाव केव्हाच उजाड झाले होते— पण दिनेश्वराने ते पडके जळके घर बरोबर शोधून काढले— तिघांनीही तेथे साष्टांग नमस्कार घातला.

## ३४ दोन तुळशी वृंदावने

एक महिनाभर सगळ्या वल्लभी राज्यात उत्सव साजरे होत होते. पहिले दहा दिवस जिकडे तिकडे विजयोत्सव साजरे झाले. त्या काळात गुहादित्याने सगळ्या मुख्य स्थानांची स्वत जाऊन पाहणी केली. सैन्यांची, ठाण्यांची व दुर्गांची नीट व्यवस्थ लावली. आवश्यक तेथे त्याने नवे अधिकारी नेमले. जे जुने चांगले अधिकारी होते त्यांची त्याने आस्थेने ओळख करून घेतली.

त्यानंतर लगेच विक्रमसिंहाच्या पुतणीशी गुहादित्याचा विवाह ठरला. अनेक मुली पाहून पुष्पावतीने आपल्या सुनेची निवड केली. तिचे नाव उमाकुमारी होते. ती सशक्त, सुशील, सुंदर व बुद्धिमती होती. ती घोड्यावर बसण्यात व भाला फेकण्यात निष्णात होती. लग्नाचा समारंभ आठ दहा दिवस चालू राहिला. अनेकांकडून अनेक प्रकारची स्वागते झाली. भोजने दिली व घेतली गेली.

त्यानंतर पाचच दिवसांनी गुहादित्याला सिंहासनावर बसविण्यात आले. देशोदेशीचे विद्वान पंडित जमा झाले. भारताच्या सगळ्या पवित्र नद्यांचे पाणी आणले गेले. गुहादित्याला अभिषेक करण्यात आला. पित्याची तलवार त्याच्या कमरेला बांधण्यात आली. सूर्यमणी त्याच्या गळ्यात चमकू लागला. होमहवन झाले. दाने दिली गेली. जेवणावळी झाल्या. लोकांनी स्वेच्छेने गावोगावी दिवाळी साजरी केली.

या तिन्ही उत्सवसमारंभांत गावोगावी विद्या आणि कलांची प्रदर्शने झाली. नाना प्रकारच्या स्पर्धा झाल्या. कुस्त्या झाल्या.

विविध शस्त्रांचे खेळ झाले. नाचगाणे, नाटके इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रमही विपुल झाले. पण कोठेही उन्मत्तता दिसली नाही. गळीकडे आनंदीआनंद होता पण सात्त्विकता होती. संयम-नियम होता. रंगेलपणा होता, रगेलपणा नव्हता. विकास करणारा विलास होता; विनाश करणारा विलास नव्हता.

इतके सगळे उत्सव चालू असूनही राज्याच्या कारभारात कोठेही ढिलाई नव्हती. स्वतः गुहादित्य दिवसाचे सोळा तास, वीस तास काम करीत असे. त्याचे सगळे अमात्य, सेनाधिकारी व सामंत त्याचेच अनुकरण करू लागले. जिकडे तिकडे उत्साहाचे आणि उद्योगाचे वारे खेळू लागले. सगळ्या राज्यात नवचैतन्य संचरू लागले.

पौर्णिमा जवळ आली. पुन्हा एकदा विजयोत्सव साजरा करावा असे अनेकांना वाटू लागले. तोच जणूकाही आकाशातून वीजच कोसळली. राज्यभर वार्ता पसरली, "येत्या पौर्णिमेला राजमाता पुष्पावती सती जाणार."

गुहादित्याने आईला नाना प्रकारे विनविले. नव्या सुनेने आग्रह केला. दिनेश्वराने समजविण्याचा प्रयत्न केला. पण पुष्पावतीने आपला निश्चय बदलला नाही. ती म्हणाली, ज्या कामासाठी मी इतके वर्षे थांबले होते ते झाले. आता मी जाते. आपल्याला मरणाचे भय ? आपल्याला देहाचा मोह ? मग कशाला आपण या देशात जन्मलो ? लक्षात ठेवा. आपले कर्तव्य करण्यास कधीच चुकू नका."

गावोगावचे हजारो लोक राजमातेचे दर्शन घेण्यासाठी येऊ लागले. राजमातेने सगळ्यांना आशीर्वाद दिले. तिने नाना प्रकारची



दाने दिली. अनेक व्यवस्था गुहादित्याला समजावून सांगितल्या. वल्लभी घराण्यातील अनेक चालीरीती तिने आपल्या सुनेला सांगितल्या. सगळ्या अमात्यांना व सामंतांना बोलावून तिने आपला बाळ त्यांच्या स्वाधीन केला. मग सगळ्यांचा तिने मोठ्या प्रेमाने पण दृढतेने निरोप घेतला.

पौर्णिमा उजाडली. पुष्पावतीने मंगलस्नान केले, शुभ्र वस्त्रे परिधान केली. गळ्यात मोत्याचा हार घातला. नाना प्रकारची सौभाग्यचिन्हे तिने धारण केली. अनेक सुवासिनींनी तिची पूजा केली. तिने सुवासिनींना वाणे दिली. मग कुलदेवतेला नमस्कार करून तिने आपल्या पतीच्या खडावा उराशी धरल्या आणि ती निघाली. तिच्या मागोमाग महाराज गुहादित्य, महाराणी उमाकुमारी, दिनेश्वर, सर्व अमात्य आणि सामंत चालले होते. त्यांच्या मागे हजारो नागरिक चालले होते. कोणीही रडत नव्हते की काही एक बोलत नव्हते.

ती विशाल मिरवणूक वल्लभीहून निघाली आणि दोन तासानंतर कमलनेरला पोहोचली. तेथे सर्व सिद्धता आधीच केलेली होती. चंदनाची मोठी थोरली चिता तेथे रचलेली होती. पुष्पावतीने आपल्या पतीची वस्त्रे चितेवर ठेवली व त्यांचे पूजन केले. शेकडो ब्राह्मण वेदमंत्राचा उद्घोष करीत होते. राजपुरोहित तिला एकामागून एक क्रिया सांगत होते. सर्व विधी संपला. तिने ब्राह्मणांना नमस्कार केला. सूर्यदेवाला नमस्कार केला आणि शेवटी सगळ्या जनतेला नमस्कार केला. मग ती शांतपणे चितेवर जाऊन बसली. आपल्या हाताने तिने चहूबाजूला अग्नी लावला. कापराच्या वड्या भरभर पेटल्या. सनकाड्या पेटल्या. चंदनाची लाकडे पेटली. ज्वाळा आकाशाला भिडू लागल्या.

ज्वाळामध्ये बसलेली ती शांत गंभीर मूर्ती ज्यांनी ज्यांनी पाहिली ते जन्मभर ते दृश्य विसरले नाहीत. पुन्हा पुन्हा प्रणाम करीत सर्वजण आपापल्या घरी परतले.

कमलनेर येथे त्या जागी दोन सुंदर तुळशीवृंदावने शोभू लागली. केवळ गुहादित्याचेच नव्हे तर सगळ्या वल्लभी राज्यातील नागरिकांचे ते चिरंतन प्रेरणास्थान बनले.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ........ नों. दि. ........
वि. ........ क्र. ........

IRBK-0115499